Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १५ जून सन १८७३ इ० | अंक २४

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| कुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरनामे.

### खानदेशचे कलेक्टर साहेबांकडून.

जाहिरनामा—प्रगट करण्यांत येतो कीं खानदेश जिल्ह्यांतील मध्यम प्रतीचे गाव व खेड्यांत दारू आणि भांग गांजा विकण्याबद्दल हक्क तारीख ३० जुलई सन १८७३ रोजीं आणि नंतर धुळें एथें कलेक्टर साहेबांचे कचेरींत लिलावानें तारीख २६ जुलई सन १८७३ पासून सुरू होणारे सालाबद्दल विकला जाईल. विक्रीच्या वेळीं शर्ती समजाविण्यांत येतील.

लिलावांत जी बेरीज होईल त्या रकमेवर दरशेकडा १० रुपये प्रमाणें होईल तो आकार लिलावाचे वक्तीं अमानत ठेविला पाहिजे. जर लिलाव खानदेशचे कलेक्टर साहेब यांणीं कायम केले नाहींतर अमानत ठेवलेले रुपये परत मिळतील तारीख ९ जून सन १८७३ इ०

J. Moore
असिस्टंट कलेक्टर
खानदेश.

### खानदेशचे कलेक्टर साहेब यांजकडून.

जाहिरनामा—सर्व लोकांस कळविण्याकरितां प्रगट करण्यांत येतो कीं, तारीख १६ माहे जुलई सन १८७३ इसवी पासून शुरू होणारे सालाबद्दल खानदेश जिल्ह्यांतील निरनिराळे रस्त्यावरील नाके दस्तुरी घेण्याबद्दलचे हक्काचा जाहिरलिलाव तारीख ३० माहे जून सन १८७३ इसवी रोजीं आणि नंतर धुळें येथें कलेक्टर साहेब यांचे कचेरींत होईल.

लिलावांत जी बेरीज होईल त्या रकमेवर लिलाव वक्तीं दर शेकडा दहा रुपये प्रमाणें होईल तो आकार अमानत ठेविला पाहिजे. जर लिलाव खानदेशचे कलेक्टर साहेब यांणीं कायम केला नाहीं तर अमानत ठेविलेले रुपये परत मिळतील.

लिलावाचे शर्तीअन्वयें चालण्यास जामीन दिला पाहिजे. विक्रीच्या वेळीं लिलावाच्या शर्ती समजाविण्यांत येतील.

पूर्वी शर्तीअन्वयें वर्तणूक न जालेल्या मनुष्यानें ह्या लिलावास येण्याची जरूर नाहीं.

तारीख ९ माहे जून सन १८७३ इसवी.

J. Moore
असिस्टंट कलेक्टर,
खानदेश

## नोटिस.

नोटिस—म्यान महमद लोढारी वस्ती तालुके खामगाव यास खालीं सही करणार यानकडून अशी नोटिस देण्यात येते कीं, आमचे ऐकण्यांत आले आहे कीं, तुम्ही कोल छब्नू याची लेक आपले लेकास केली आणि निकेवाची तारीख २१ माहे रबिलालरची नेमली आहे असें मालुम जाले तर तुम्हास या गोष्टीची समजुत देतां ती येणेप्रमाणें:—

छब्नुबाई यांणीं आपली लेक मजला दिली आहे तिची सोडचिठ्ठी मजकडून कांहीं झाली नाहीं सोड जाल्यावांचून आपण करणें ही गोष्ट कायदेशीर होत नाहीं. माझा हक्क इसमजकुराचे लेकीवर बरोबर आहे कारण सर्व तऱ्हेनें मजला खर्च लागून लगाई वगैरे सर्व झाली आहे. तर तुमचा खर्च व्यर्थ जाऊन मी तुम्हांवर शिरस्त्याप्रमाणें फिर्याद करून अमरत आणि खर्च भरून घेईन हें खूप समजावें आणि जितें नवऱ्याची अमरत केली अशी फिर्याद होऊन नोटिशीच्या खर्चासुध्दां पैसा भरून घेतला जाईल. तारीख ९ माहे जून सन १८७३ इसवी

( सही ) सितलखा वल्द बुढनखा
मात्रन निशाणी कटार

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळतच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते मुक्काम अकोला यांस:—

एका फिरस्त्या गरिब भटाचा नमस्कार वि. वि. मी फिरत असतांना कांहीं गोष्टी आपले पत्रात छापून त्या शाळांच्या त्यावरिष्ठ अधिकारी यांचे कानीं जाऊन त्याबद्दल विचार व्हावा असें वाटल्यावरून खालील ओळी पाठविल्या आहेत तर त्यास जागा मिळेल व येते अंकात प्रसिद्ध होतील अशी आशा आहे.

वऱ्हाड प्रांतांत शाळा, आहेत खऱ्या परंतु लोकांस अजून विद्येची अभिरुचि नाहीं, तथापि खुदावंत क्यांडी साहेब डायरेक्टरच्या जागेवर आल्यापासून एकंदर पुष्कळ फेरफार होऊं लागला व झाला हें सुधारणेचें लक्षण आहे व याबद्दल वऱ्हाडवासी लोकांनी त्यांचे अतिशय आभार मानले पाहिजेत.

नवीन अभ्यासाच्या यत्ता काढल्या व अमुक प्रतीच्या शाळेंत अमुक यत्तेपर्यंत शिकवावें असा ठराव केला हेंही उत्तमच आहे परंतु यावरून आणखी इतकें पाहिजे तें हें कीं, सर्व शाळांची वार्षिक परीक्षा झाल्यावर प्रत्येक जिल्ह्याचे डिपुटि इन्स्पेक्टर यांणीं एका प्रतीच्या जितक्या शाळा असतील, तितक्या शाळांचे मुलांचे संख्येवर प्रत्येक यत्तेंत मुलें उतरतील त्या एकंदर संख्येवर शाळांचे नंबर लावावे. व प्रत्येक मास्तरास तुमचे शाळेचा, शाळेची ग्रेड असेल तींत अमुक नंबर या सालांत आला आहे असें हुकुमानें कळवावें. व नंबरवार यादी आपले वऱ्हाडसमाचार अंकांत एकवार छापावी. असें केल्यानें मास्तर लोकांस अतिशय उत्तेजन येईल. व आपआपले शाळेचा नंबर आपल्या बरोबरीच्या शाळा आहेत त्यांत वर यावा अशी इच्छा उत्पन्न होऊन ते श्रमही आतापेक्षां जास्त करतील यांत संशय नाहीं. तर ही आमची सूचना डायरेक्टर साहेब व डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर साहेब लक्षात घेतील तर या खात्यास खचीत उत्तेजन येईल.

हेडमास्तर लोकांस हाताखालील असिस्टंट मास्तरास निदानपक्ष एक दिवसाची रजा देण्याचा अधिकार द्यावा. कारण असे प्रकार बहुत घडतात. व कदाचित हेडमास्तर लोक कारणपरत्वें तसे कितीही असतील परंतु स्पेशियल हकूम नसल्या कारणानें त्याचा जीव चाकबुक करीत असेल व नकरून उपाय नाहीं. कारण एकादेवेळेस प्रसंग तसा येतो. हुजुर लिहून रजा येईपर्यंत अवकाश नाहीं. मग तसें न करून इलाज नाहीं. तर निदानपक्ष एक दिवसाची रजा हेडमास्तरांनीं असिस्टंट मास्तरांस द्यावी. व हुजूर रपोट करावा. असो पत्रविस्ताराबद्दल माफी मिळावी. व एवढा मजकूर छापावा. हाणून शाळाखात्यांतील वरिष्ठ अधिकारी त्याजबद्दल विचार करून कांहीं तजवीज करतील यांत संशय नाहीं. पत्रविस्ताराबद्दल माफी मिळेलच लोभ असावा हे विनंती.

आज मुक्काम अकोला

एक फिरस्ता
भिक्षुक.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपणाकडे खालीं लिहिलेल्या च्यार ओळीं पाठविल्या आहेत पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

• पत्रकर्ते महाराज, मी फिरत असतां ह्या मूर्तिजापूर तालुक्यांत कारंजे नजीक तिन च्यार खेड्यांनीं पांच च्यार माणसें विज पडून मेलेलीं माझे दृष्टीस पडलीं, तसेंच पुढें कारंजे एथें तारीख ४ माहे मजकूर रोजीं आलों तो एथें तेच दिवशीं सायंकाळीं पेठेंत एका लिंबाचे झाडावर वीज पडून ओले लिंबाचे झाड जळत होत, हाच चमत्कार पहाण्यास मोठी गर्दी जमली होती, मी ही तेथें पहाण्यांत मिळालों होतों. तर पत्रकर्ते महाराज आजपर्यंत माझे पहाण्यांत असा चमत्कार आला नव्हता तो आपणास कळविला आहे. पुढें दुसरे दिवशीं एथील रा. रा. बापुसाहेब यांचे कोडतांत गेलों, तों तेथें एक चमत्कारीक फिर्यादी फौजदारींत दृष्टीस पडली ती अशी कीं, येथील एक रहिवासी जंबुरभट नामधारी एक गाळीव ब्राह्मण यणील्, नगाराव बुरळ नावाच्या प्रथमशाखी ब्राह्मणाची बायको नामे शेंगी हिजपाशीं किंनिएक महिने लागू असून, पुढें तिजला त्यानें, घरांतून काढून नेली त्याजबद्दल तिचे नवऱ्यानें येथील कोडतांत फिर्याद केली होती, त्यावरून सदर्हू इसमास धरण्यास वारंट ही निघालें असून तीन महीने पर्यंत तो सांपडला नाहीं हल्लीं ता आमचे हुशार पोलीस लोकांनीं त्याजला असा चतुराईनें धरला कीं, तो आणि ती असे उभयतां एका बिछान्यावर आनंदात निमग्न असता धरलीं गेलीं आहेत. तर एडिटरराव सदर्हू इसमास जरकरितां योग्य शिक्षा न झाल्यास येथील मोठ मोठ्या संभावित ब्राह्मण लोकांच्या स्त्रिया आठ दहा जणी आपले नवरे टाकून इतर जातीचे लोकांबरोबर बाहेर निघणार आहेत. व त्या सर्व स्त्रियांचें लक्ष्य ह्या खटल्याकडेस लागलें आहे. तर आमचे रा० रा० बापुसाहेब सदरहु इसमास योग्य शासन करतील अशी आशा आहे. नाहीं पेक्षा ब्राह्मण मंडळींत मोठा गोंधळ होणार आहे. व जर कदाचित त्या जंबुरभटास शिक्षा झाली तर त्या बिच्याऱ्या ज्यारिणी स्त्रिया आपआपले ठिकाणी चुपचाप खास बसतील; ह्या खटल्याची चौकशी तारीख १० माहे मजकुर रोजीं होणार आहे. तेव्हां त्याचा जो कांहीं परिणाम होईल तो आपणास लिहून कळवीन; व पत्रकर्तेराव ह्या कारंजे शहरांत दुसरा असा कांहीं चमत्कार होऊन गेला आहे, कीं जिकडे पहावें तिकडे गल्लो गल्लीं कीर्तनें सुरू आहेत. व हरदास बोवांच्या टोळ्या भरारी अर्धा डजन असून त्यांची बरोबरींची मंडळी सुमार तीन डजन होईल व शहरांतील लोकांस व बायकांस कीर्तनावांचून दुसरें कांहीं सुचत नाहीं. व एक जंगम हरदास जो नवा आले आहेत त्यांचे कीर्तनास पुरुषांपेक्षां बायकांची गर्दी इतकी होते कीं जणू हें कृष्णाचें गोकुळच आहे कीं काय? असा भास होतो. याचें कारण त्या हरदास बोवांचे मागें दोन असे काही गुंडे आहेत कीं पुण्यातील पोळच आहेत कीं काय? व ह्या पोळांनीच सर्व स्त्रियांचीं मनें वेधून घेतलीं आहेत तर एडिटरराव अशा हरदासापासून स्त्रियांस व आमचे सारखे तरुण पुरुषास सुमार्गी लागणें एकीकडे राहून कुमार्गी

कोंस आलें तर घेतील अशी आशा आहे चुकीचा धोका काम करणारास न राहतां मकत्यासारखें काम रात्रंदिवस खासगी वेळ सरकारी कामांत घालणें दूर होईल, त्याप्रमाणें काटकोचें उलमही दुप्पट होईल. न्यायी शिशावी कवताई वऱ्हाड प्रांतास आहे असें नाहीं एक दोन फालतूही इकडे तिकडे दिवस घालवित फिरतात तेच जर नेमले तरी सरकारास सांगण्याची अडचण पडणार नाहीं. नेमणुक मात्र मंजूर केली पाहिजे तर पोलेस फी पाभारें आहेच त्यांतून इस्टाब्लिशमेंट आणि शिपाई कुरक आमीन वगैरेचा खर्च भागून वचत रक्कम राहील असें असोन सरकारास कोणी कळविणार आपल्या सारखा भागल्याचा पाहिजे. रयतेच्या हाकेस कोणी ओ देणारा भेटेल असें नाहीं. सरकारी काम करणारे लोकांस जीव काढून आलेलें काम करणें भागच आहे ते रात्रंदिवसाचा पगारच खातात तेव्हां त्यांस कोणतेही प्रकारें हरकत दाखवितां येत नाहीं. कळावें हे विनंती.

जुना रिकार्ड कीपर.

## नोटिस.

नोटिस—राजश्री मुरलीधर गोकुळदास दुकान पेठ उमरावती यांस खालीं सही करणार नोटिस देतो असा कीं, उमरावती येथील मडापा चाकेभूचे वाड्यांत गाळ्यानें तुमचे मार्फत आम्ही राहत असोन तुमचे संकेताप्रमाणें भाडेचिठ्ठी पुरणमल प्रेमसुकदास साहू यांचे नावची लिहून तुमचे स्वाधीन केली होती. भाड्याचे रुपये दर महा ६ रुपये प्रमाणें देत आलो असतां पुरणमल प्रेमसुकदास साहू दुकान पेठ उमरावती यांणी भाड्याचे रुपये पूर्वीच एकंदर देऊन नागा खालीं करून द्यावी. ह्मणून तारिख १८ माहे मे सन १८७३ इसवीचे वऱ्हाडसमाचारद्वारें नोटिस दिली; त्यावरून तुह्मास तारिख २३ । २४ माहे मे सन १८७३ इसवीची नोटिस दोन दिवसाचे मुदतीची दिली असोन तिचा जबाब अद्याप दिला नाहीं. याजकरितां ही नोटिस देण्यांत येते कीं, सदर्हू भाडेचिठ्ठी तुह्मी पुरणमल प्रेमसुकदास साहू यांजला दिली काय? दिली असल्यास कधीं दिली? आणि तुह्मास आमचे अवळून भाड्याचे पावलेले रुपये पुरणमल यांस कां दिले नाहीं? आतां तो सर्व हिशोब चुकता करून देऊन आह्मास या नोटिसीचे तारखेपासून ८ दिवसाचें आंत रुपये पावल्याची रसीद पुरणमल याची दाखल करून द्यावी; नाहीं तर पुरणमल यांणीं आह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद केल्यास तें व या नोटिसीचे खर्चासुध्दां रुपये तुह्मास भरून द्यावे लागतील. कळावें तारिख ६ माहे जून सन १८७३ इसवी मुक्काम उमरावती.

[सही] विष्णु बाळकृष्ण कोर्ट इन्स्पेक्टर पोलिस जिल्हे उमरावती.

नोटिस—गंगाराम बाबन सोनार अकोलेकर यास खालीं सही करणार याजकडून. तूं वऱ्हाडसमाचारपत्रांत ता० २१ माहे मे रोजीं नोटिस दिली तिचें उत्तर देतो तें येणेंप्रमाणें—

तुझे आम्हास कांहींच देणें नसून उलटें आमचे तुजकडेस घेणें आहे तें द्यावें न दिल्यास तुजवर दावा करूं.

इनाम तेव्हांच दिल्याचे लिहिलें ते सर्व दिले नाहीं ह्मणोनच आमची तुजकडेस-बाकी येणें राहिली आहे. आरोपी नबूलाल याजला तूं तीन रुपये किंमतीचा माल बारा रुपयास विकला असे विषयीं तो तुजवर ठकबाजी केल्याबद्दल खटला करणार होता. त्यापूर्वींच तूं त्याजवर फिर्याद केल्यापुळें त्याची फिर्याद होणें राहिली. असे भयंकर खटल्याचे स्वरूप होतें. याचें स्मरण कर ह्मणजे आम्ही ह्मणतो तो इनाम तूं कबूल केल्याचें तुला स्मरण होईल.

तुझे कांहीं देणे नसतां तूं खोटी नोटिस दिली आहे. अशी खोटी नोटिस देणें व खोटी फिर्याद करणें याचा परिणाम काय याचा विचार कर. कळावें ता० ७ माहे जून सन १८७३ इसवी.

( सही ) भवानी गैराळ वकील.

## वऱ्हाडसमाचार.

मिती ज्येष्ठ शुद्ध १३ शके १७९५.

## व्यापार व कौशल्य यांस उत्तेजन.

मुंबई पुण्याकडे या कामीं लोकांचें लक्ष पुष्कळ अंशीं लागण्यासाठीं मोठी गडबड चालू झाली आहे. पुण्यास व्यापारोत्तेजक मंडळी व मुंबईस कौशल्योत्तेजक मंडळी स्थापित झाली आहे. पुण्यास एक अशा प्रकारची शाळा झाली आहे. मुंबईंत चांगले शिकलेले चार गृहस्थ लोखंडाच्या कारखान्यांत व कापड विणण्याच्या कारखान्यांत माहितीकरितां ठेविले आहेत. पुण्यास कापड विणण्याचें एक लहानसें यंत्र आणिलें आहे. व रा. रा. गणेश वासुदेव जोशी या नावाचे एक गृहस्थ पुण्यास वकील आहेत ते व्यापार वृद्धीच्या व सार्वजनिक हिताच्या कामासाठीं केवळ वाहिले गेल्यासारखे सर्वत्र विख्यात होत चालले आहेत. ते सभांतून व्याख्यानें देतात, वर्तमानपत्रांतून लिहितात, राजे रजवाडे, सरदारलोक, यांस पत्रें लिहितात, पदरचे पैसे खर्चितात व या सर्वांपेक्षां विशेष हें कीं त्यांनीं हा आपला हेतु सफळ व्हावा ह्मणून पाद्री लोक रस्त्यावर चार माणसें गोळा करून लेकचरें देतात त्याप्रमाणें त्यांनीं लेकचरें देण्याकरिता पगारदार माणसें ठेविलीं आहेत. व तीं माणसें पुण्यांत भररस्त्यावर लोकसमाजांत बोध करित असतात. आतां यापासून कांहीं विशेष फळ होईल असें नाहीं तरी ही टूम मोठी चमत्कारिक आहे खरी, व गणपतराव जोशी या कामीं इतके पुढें आले ह्मणून त्यांची तारिफ केली पाहिजे खरी यांत संशय नाहीं. आमचे बंधु ज्ञानप्रकाश कर्ते यांनीं असें लिहिलें होतें कीं, पुण्याचे लोकांनीं एक सभा भरवावी व गणपतरावजींचें ह्मणणें नीट ऐकून घ्यावें. आणि तें सयुक्त असेल तर त्याप्रमाणें कांहीं तजवीज करण्याच्या मार्गास लागावें. व त्यांचें ह्मणणें अयुक्त किंवा न होण्याजोगें असेल तर ते त्यांस समजून सांगून त्यांचा तो नाद सोडवावा. ही सूचना योग्य होती पण त्याप्रमाणें घडून आल्याचें अझून कांहीं दिसत नाहीं. लोककल्याणेच्छुमध्यें एकदां असें लिहिलें आहे कीं या कामास जें अपार द्रव्य पाहिजे ते वेगवेगळ्या लोकांकडून गोळा होण्यास विश्वासाचें स्थळ कोठें आहे? त्याविषयीं लोकांनां भरवसा आला तर रकमाही गोळा होतील. ही लोकांची अडचण गैरवाजवी नाहीं. सबब याविषयीं चांगला निर्णय होऊन जिंमेदार लोक पुढें व्हावेत व पैसेही जमा व्हावेत असें आह्मी इच्छितो. आतां हा ओघ पुढें कितपत दकलतो किंवा जागच्याजागीं अटतो हें पाहिलें पाहिजे.

आमच्या देशाच्या आजच्या स्थितीवरून अल्प स्वल्प ह्मणजे पन्नास शंभर असा रकमेचे विभाग जमा करण्याची खटपट झाली तर लक्षावधीही रुपये जमा होण्यास अशक्य आहे असें नाहीं. पण तसें करण्याची लोकांस अजून सवय झाला नाहीं. व ती होऊन चांगली दृढ झाल्याखेरीज विलायतेसारखे मोठाले कारखाने आपले देशांत उभारणार नाहींत यासाठीं प्रथमत: आमचे देशांतील राजे, संस्थानिक यानीं या कामाची सुरवात करून लोकांस उदाहरण दाखविल्यास लोकांवर त्याचे अगण्य उपकार होतील. त्यांनां लाख दोन लाख रुपये अशा कामाकडे लावणें फार सुलभ आहे. सबब तें ह्या मार्गानें व्यापार करण्याचा विश्वास उत्पन्न होईपर्यंत नेटीव राज्यांत व संस्थानांत जे प्रमुख सद्गृहस्थ आहेत त्यांनीं हें काम मनावर घ्यावें अशी आमची त्यांस अत्यंत नम्रतेनें प्रार्थना आहे.

## छापण्याचे कागद.

वर्तमानपत्रास व छापखान्यांतील इतर कामास जे कागद लागतात ते सर्व परदेशाहून येत असल्यामुळें महाग पडतात व त्यामुळें वर्तमानपत्रें विशेष स्वस्त किंमतीस देतां येत नाहींत याजकरितां व या देशांत व्यापार वाढावा, कौशल्य वाढावें, यंत्रें आणावीं अशी लोकांस वर्तमानपत्र कर्ते हमेशा शिफारस करितात त्याच उदाहरण त्यानींच लोकांस दाखविलें असें व्हावें याकरितां सर्व छापखाने वाल्यांनीं एकत्र मिळून कांहीं भांडवल जमवावें व कागदाचा मोठा विलायती कारखाना नवा काढावा अशी आमचे ठाण्याचे बंधु अरुणोदय कर्ते यांणीं एतद्देशीय पत्रकर्त्यांस विनंती केली आहे.

याजवर मुंबईचे इंदुप्रकाशांत असें लिहिलें आहे कीं मुंबईंत हल्लीं "बांबे पेपर मिल" व "बाबाजी काशिनाथ पेपर मिल" या नावाचे दोन कागदाचे कारखाने नेटिवांचे चालू असून त्यांत मध्यम प्रतीचे कागद निघतात. हे कारखाने नेटिवांचे आहेत सबब नवा कारखाना घालण्याची जरूर नाहीं. एतद्देशीय छापखान्यांनीं व वर्तमानपत्रांनीं सदर्हू दोन कारखान्यांस मदत केली असतां फार चांगलें होईल. व त्यांत कागदही चांगले निघूं लागतील,

नेटिव लोकांचे कागदांचे कारखाने झाले आहेत हें अरुणोदयकर्त्यांस ठाऊक नसोंन असें वाटतें असो. इंदुप्रकाशाची सूचना विशेष चांगली आहे. कारखाने पुष्कळ होऊन मदत न मिळाल्यानें त्याचा खराबा होण्यापेक्षां ते थोडेच असावे आणि चांगले भरभराटीनें चालावे हें फार चांगलें. सबब चालू कारखान्यांस छापखानें वाल्यांनीं मनापासून मदत केली व बाजारांत मांडलेले विलायतचे कागद घेतले नाहींत तर ते नेटिवांचे कारखाने उत्तम रितीनें चालतील व त्यांत सर्व प्रकारची सुधारणा होईल असें आह्मास वाटतें.

तसेंच नुसता कारखाना मांडणें हेंही चांगलें नाहीं. तो मांडल्यावर त्यांत काम चांगलें व नियमित प्रकारें करून देऊन त्यांची स्थिती सुधारली पाहिजे. पण हें आमचे नेटिव लोकांचे हृदयांत चांगलें अजून ठसलें नाहीं आळस व ढिलेपणा हे दुर्गुण अह्मामध्यें जागृत आहेत ते आम्ही सोडिले पाहिजेत. इंदुप्रकाशकर्ते ह्मणतात कीं, बांबेपेपरमिल्सच्या कारखान्यास मदत करण्याच्या हेतूनें आम्ही जाऊन चौकशी केली व रा[...] रिमांच्या वीस प्रतींची मही दिली त्या[...] दोन तीन महिने झाले अजून रिमांविषयीं कांहीं कळलें नाहीं. हें आह्मा नेटिव लोकांस बरें नाहीं. काम वक्तशीर देण्याची सवय चांगली लागली पाहिजे. आ[...] आमचे सर्व वर्तमानपत्रकर्त्या बंधूनीं मुं[...]च्या या नेटिव कारखान्याची माहिती मिळवून घ्यावी व त्यास चांगली मदत करावी कीं जेणेंकरून ते कारखाने आ[...] देशांत कायमचे होतील व त्यांचे कामाची आपल्या देशांत आख्या हो[...] आणि त्यांचे उदाहरण घेऊन दुसरे कित्येक यांत्रिक कौशल्याचे कारखाने आपले देशांत उभारले जातील.

## वऱ्हाड

परजन्यकाळ सुरू झाला. रोहिणी एक दोन पाउस येथें चांगले पडले. मृगाचाही घाट बरा आहे. हवा थंड[...]ली आहे.

—०००—

मागील अंकांत लिहिल्याप्रमाणें [...] सोमवारीं सायंकाळीं रा. रा. विष्णु

पेसोळकर रेसिडेंट साहेबाचे क्लार्क धि कोर्ट हैदराबादेस जाण्याकरितां निघून गेले. त्यांस पोचविण्याकरि स्टेशनावर पुष्कळ मंडळी गेली हो रा. रा. माधवराव हरी कमिशनर चे क्लार्क आफ धि कोर्ट त्याच दि आपले कामावर रुजू झाले. व रा. विष्णु सखाराम बापट डिपुटि कमिश साहेबाचे क्लार्क आफ धि कोर्ट मंगळ येथें येऊन आपले कामावर रुजू .

—०००—

अकोला रेल्वे स्टेशनावर रा. रामचंद्र देव हे च्यार वर्षे स्टेशनमास्तर होते ची बदली या आठवड्यांत वर्धा येथें ऊन नांदगांवचे असिस्टंट स्टेशनमास्तर आले. हे युरोपियन आहेत. व युरो नाचे सोयीकरितांच हुशार व अनुभवी शनमास्तर रामचंद्र धोंडदेव यांस येथून दलले असे म्हणतात. त्यांस पगार ९० पये होता तितक्यावरच त्यांची बदली के व नवीन मास्तरांस शंभरावरही कांहीं ार मिळणार असें ऐकतो.

—०००—

येथील तुरुंगावरील असिस्टंट जेलर आठवड्यांत मरण पावले.

—०००—

इचलकरंजीकर नाटकवाले उमरावती न परत जाण्यास निघाले. त्यांचा क्काम हल्लीं मलकापुरास आहे. उमरा तीस त्यांणीं तेरा खेळ केले. रुपये ७०० मिळाले. शेवटीं एक चौदावा ळ त्यांणीं धर्मार्थ केला. त्यांत १८० पये मिळाले त्यांतून १०० रुपये तेथील वीला रोख दिले. १० रुपयांनें चौ ी पातळ दिलें. जुन्या देवीला ५ रु० दिले. मारुतीच्या देवालयाला २० रु० दिले. व भेट भिक्षुकास १५ रुपये दि ले असें कळतें. हें त्यांणीं चांगलें केलें ण राहिलेले ३० रुपये तथील लायब्ररी ला देते तर याहून चांगले झालें असतें. ण हा मंत्र त्यांस सुचला नाहीं. आतां या काळांत अशाप्रकारें दान विशेष आवश्यक व स्तावक होय.

—०००—

मि० इलियट साहेब रत्नागिरीकडील असिस्टंट कलेक्टर यांस वऱ्हाडांत वि द्याखात्याकडे ७५० वर इन्स्पेक्टर नेमिले.

—०००—

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधाने यवत माळचे डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर वा शिमाहून आपले नवे जागेवर जाऊन ह जु झाले त्यांनीं आपले कामाचा च्यार्ज नाशिमास रा. रा. वामनराव प्रभाकर मा स्तर यांस तूर्त दिला आहे. तेथील नेम णुकी डि० इ० रा. रा. विनायक रामचंद्र भाटवडेकर रजेवरुन अजून परत आले नाहींत.

—०००—

रा. रा. श्रीराम भिकाजी भटार डि. इ. इन्स्पेक्टर अकोला यांचे तीर्थरूप काशी क्षेत्रीं आजारी असल्याचें पत्र आल्या वरुन ते तिकडे गेले होते पण भेट हो ण्यापूर्वीच ते मरण पावले. श्रीरामपंत से मवारीं येथून जाऊन शुक्रवारीं परत आले.

—०००—

रा. रा. परशराम सखाराम उमरावती डिपुटि कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट यांची चौकशी पुरी झाली व कमिटींतील मेंबर आप आपले स्थळीं गेले. कमिटीनें रेसिडेंट साहेबाकडे आपला अभिप्राय लिहून कळविला आहे. तिकडून ठराव होईल तो आह्मी आपले वाचकांस पुढें कळवू.

—०००—

मि० आलेकझांडर साहेब इलिचपूरच्या स्मालकाज कोर्टाचे जडज गेल्या आठवड्यांत विलखद्न्यास मरण पावले.

—०००—

घराबाहेर ऐकू जाणारीं वाजंत्रें रात्रीं दहा वाजल्यापुढें परवानगी शिवाय वाजवू नये अशा बद्दल डिपुटि कमिशनर साहेबांनीं ठराव केला होता व त्या संबंधानें आह्मी मागें कांहीं लिहिलें होतें. त्याचा डिपुटि कमिशनर साहेबांनीं विचार करुन वेगवेगळ्या प्रकारचीं वाद्यें समक्ष आणवून पाहून ठराव केला कीं ताते गर्फे वगैरे कर्कश व त्रासदायक वाद्यें मात्र रात्रीं परवानगीशिवाय दहा वाजल्या पुढें वाजवू नये. बाकीच्यास हरकत नाहीं. क्या० बुलक साहेबांची या फेर फारीबद्दल आह्मी तारिफ करितों.

—०००—

क्या० ई० जे० गनत्राप पोलिसचे असिस्टंट सुपरइंटेंडंट यांस आजारीपणाकरितां विलायतेस जाण्याचें आहे त्याचे तयारी करितां ३० दिवसाची रजा दिली आहे.

—०००—

मि० ई० ए० हापसन पैगाशी कडील असिटंट सुपरइंटेंडंट यांस तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली.

—०००—

क्या० डब्ल्यू लाटन असिस्टंट कमिशनर मेळघाट हे आजारीपणा करितां विलायतेस जाण्याचे तजविजीस लागणार ह्मणून त्यांस ३० दिवसाची रजा भर पगारी दिली आहे.

—०००—

मि० ताराचंद, व मि० जवाहिरमल यांस उमरावती म्युनिसिपालिटींत मेंबर नेमिले.

—०००—

मि० अबदुल रहिमानखां चिखलीचे तहशिलदार यांस १४ दिवसांची हक्काची रजा मिळाली.

—०००—

क्या० ग्रांट साहेब रजेवरुन परत आल्यानें मि० ताजुदीन साहेब आफिशियटिंग सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर होते ते थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

—०००—

क्या० जी. एफ, लेन. फर्स्ट ग्रेड पोलिस सुपरइंटेन्डेन्ट रजेवरुन परत आल्यानें खालील वर्गावर्गी झाली..

मि० एफ. डब्ल्यु. राइट हे आफिशियटिंग फर्स्ट क्लास झाले होते ते सेकंड क्लास पोलिस सुपरइंटेंडेंट झाले. मेजर नेमिसन आफिशियटिंग सेकंड ग्रेड होते ते थर्ड ग्रेड झाले.

क्या० ई. जे. गनत्रोप आफिशियटिंग थर्ड ग्रेड सुपरइंटेंडंट होते ते असिस्टंट सुपरइंटेंडंट झाले.

—०००—

मि० जे. भरताम यांस पब्लिक वर्क्स खात्यांत फर्स्ट ग्रेड प्रोबेशनरी ओव्हरसियर नेमून पश्चिम वऱ्हाडाकडे दिले.

—०००—

जनरल स्टांप अक्टाच्या ४८ वे कलमावरहुकूम रेसिडेंट साहेबांनीं तारिख २० माहे जुलई सन १८७० इसवीचे रेसिडेन्सी गाईटचे पृष्ट २५९ यावर छळ छापून प्रसिद्ध केली आहे. तिचें ७ वें कलम बदलून खालीं लिहिल्या प्रमाणें नवीन केलें आहे.

कलम ७—सरकारांत रोख पैसा भरून पाहिजे प्रतीचें स्टांप जे वेंडर व इतर लोक घेतात त्यास खालीं लिहिल्या दरा प्रमाणे वर्तळा मिळेल.

लायसेन्सवाले वेंडर लोक.

शेकडा

१ आठ आण्याहून अधिक दराचे नाहींत असे स्टांप एके वेळीं पांच किंवा अधिक रुपयांचे घेतल्यास ६।४

२ आठ आण्यावर व पांच रुपयाचे आतील दराचे स्टांप ५० किंवा अधिक रुपयाचे घेतल्यास ४

३ पांच रुपयाचेवर व ५० रुपयांचे आतील दराचे १०० रुपयाचे किंवा अधिक स्टांप घेतल्यास २

इतर लोक

१ आठ आण्याच्या खालचे दराचे ५ रुपयांचे एके वेळीं घेतल्यास ३।२

२ आठ आण्याचे वरील व पांच रुपयांचे आतील दराचे ५० रुपयांचे घेतल्यास १।८

३ पांच रुपयावरचे व ५० रुपयांचे आतले दराचे १०० रुपयांचे स्टांप घेतल्यास १

(हुकूमावरुन)

डब्ल्यु. टवुड्डी, मेजर

फर्स्ट असि० रेसिडेंट

—०००—

आमचे पश्चिम वऱ्हाडांत कपाशीचे बाबदींत शेतकरी लोक व व्यापारी यांचे दरम्यान जे सट्टे होत असतात ते साधे कागदावर होण्यास कांहीं हरकत नाहीं. पण ते दुसऱ्याचे नावें सोपा लिहून वेची करितात तेव्हां त्याला स्टांप पाहिजे किंवा नको तें आम्ही सांगू शकत नाहीं. तो कायद्याचा मुद्दा आहे असें हिंदुस्थान सरकारानें ठरावलें आहे.

## वर्तमानसार

ग्वालेरीस आग लागून पुष्कळ नुकसान झाले पण कोणाच्या जिवास इजा झाली नाहीं.

सुरतचे लोकांनीं मि० जष्टीस नानाभाइ हरिदास हायकोर्टाचे जडज झाले ह्मणून त्यांच्या आदरार्थ कांहीं स्मारक करण्याची तजवीज चालविली आहे.

गयत करसनदास मुळजी हे विलायतेस जाऊन आल्यानें जातीवाल्यानीं त्यांस बहिष्कृत केले होते व प्रायश्चित्त घेतल्या वाचून जातींत घेत नाहीं असा आग्रह धरिला होता. त्या वेळीं त्यांचें ह्मणणें असे होतें कीं आह्मी प्रायश्चित्त घेणार नाहीं. तथापि आह्मी विलायतेसही स्वधर्मानें वागलो अशी शपथ पाहिजे तर घेऊं. ती गोष्ट त्याचे जातीवाले कपोल वाणी यांनीं कबूल केली नाहीं. व करसनदास यांनीं ही त्यांची परवा केली नाहीं. पुढें ते मरण पावले. हल्लीं त्यांच्या नायकोनें आपल्याला व आपल्या मुलालेकरांना जातींत घेण्याविषयीं विनंती केली आहे पण वाणी लोक ती मान्य करुन त्यांना जातींत घेत नाहींत. हा केवढा निर्दयपणा आहे! ती नायको व तीं मुलें विलायतेस गेलीं नव्हतीं तेव्हां त्यांकडे काय दोष आहे? पण हें जातबंड ह्मणजे मोठें खूळ आहे.

जुनागडच्या नबाब साहेबांच्या मुलीचें लग्न झालें त्याकरितां कित्येक राजे व सरदार लोक जुनागड येथें गेले होते. लग्नाकरितां ३०००० रुपयांचा मंडप घातला आहे.

गेले आठवड्यांत पुणे जिल्ह्यांत नेळगाव जिल्ह्यांत व नगर जिल्ह्यांत विजा पडून कित्येक मनुष्यें मरण पावलीं असें कळतें.

मि० सत्येंद्रनाथ टागोर यांस कलादगीस सितियर असिस्टंट जडज नेमिले.

रशियाच्या राजाच्या शिक्याचीं नाणीं लाहोरास लोकांच्या प्रचारांत आलीं आहेत व व्यापारीलोकही निःशंकपणें तीं वापरतात असें औधअकबार पत्रावरुन समजतें.

मद्रास इलाक्यांतील शेशिगा आयंगर नावाच्या ब्राह्मण जातीच्या वकीलानें आपल्या बालविधवा मुलीचा पुनर्विवाह केला ह्मणून त्या इलाक्यांत पुनर्विवाहाच्या संबंधानें बरीच गडबड चालू आहे

फ्रान्सदेशांत पुनः किंचित अस्वस्थता उत्पन्न झाली आहे फ्रान्सचे प्रजासत्ताक राज्याचे प्रेसिडेंट एम थियर्स यास प्रेसिडेंटच्या कामा वरुन काढून त्यांच्या जागीं मार्शल माकमोहन यांची नेमणूक झाली. थायर्स यांच्या वेळच्या सर्व प्रधानांनीं राजीनामे दिले.

इराणच्या बादशाहाची स्वारी रुस लोकांच्या मुख्य शहरीं जाऊन पोंचली व तेथें त्यांचें आगत स्वागत मोठ्या थाटानें ठेवलें.

सिंधच्या सरहद्दीवरील खेलात संस्थानात अव्यवस्था फार झाली आहे या संस्थानातील इंग्रज सरकारचे पोलिटिकल एजंट यांस कदाचित दगा फटका होईल ह्मणून ते संस्थान सोडून परत आले. याच्या बरोबरच संस्थानचे दिवाणही इंग्रजसरकारच्या हद्दींत आले. दिवाण व खान यांचें वांकडें असून दिवाणास इंग्रजसरकारचें अंग आहे.

मुंबई एक्झिबिशनचें एकंदर उत्पन्न ३३,००० होऊन खर्च २८००० रुपये झाला.

मुंबईंत हल्लीं नाटकांस चांगलें पीक आलें आहे. पारशी लोकांची व हिंदूंचीं नाटकें नेहमी होतात. तीं इतकीं नाटकें करण्याकरितां नाटकगृहें नाटकवाल्यांच्या वाटणीस येईनाशी झालीं आहेत. शिवाय मधून मधून इंग्लिश नाटकेंही होत आहेत. हल्लीं नाटकांची फार गर्दी झाल्यामुळेंच मुंबईंत तिसरें नाटकगृह तयार होत आहे. ग्रांटरोड व विक्टोरिया नाटकगृहांच्या शेजारीच तिसरें नाटकगृह, कोणी दादाभाई रतनजी नावाचा पारशी बांधीत आहे. यांत सुमारें १००० मनुष्यें बसण्यासारखी जागा होणार आहे.

हल्लीं तालुक्याहून रोज जमाखर्चाचा जसा कागद येतो तसा यापुढें प्रत्येक जिल्ह्यांतून आकौन्टन्ट जनरलकडे जावा असा विचार चालला आहे व असें कें ल्यावर प्रत्येक डेपुटी कलेक्टर कडील किती एस्टाब्लिशमेन्ट कमी करतां येईल असें विचारणें झालें आहे.

ने. ओ.

आम्हास लिहिण्यास आनंद वाटतो कीं, पुणें म्युनिसिपालिटीनें मागें घरोघर पाणी देण्याचा जो ठराव केला होता त्याप्रमाणें नारायण पेठेंत अण्णासाहेब हैद्राबादी यांचे घरीं पाणी दिलें. पाणी देण्यास आरंभ झाला आतां कोण येतो तें पहावें.

पुणें डाक्तर फ्रेजर रेल्वे माजिस्त्रेट यांजकडे खोटे कागद करून चालविले असे खटले २ होते. ते त्यांणीं सेशन कमिट केले. त्यांतील पहिल्यांत आरोपी गजर, डावरे, पांढाचा क्लार्क व गुजराथी असे ४ जण आहेत. त्यांवर चार्जें ९९ एकंदर केले आहेत त्यांत साक्षीदार ३० आहेत.

दुसऱ्यांत आरोपी डंगरजकर, व दुसरा एकजण आहे. त्यांवर २९ चार्ज केले आहेत साक्षीदार २० जण आहेत.

सोन्याची खाण. केप आफ गुडहोप येथें नवीन खाण मिळाली आहे. त्या जमीनीची लांबी ३० मैलांवर आणि खोली ४ फुटांची आहे.

नडोदें—ता० २८ मे सन १८७३

महाराज यांणीं गेल्या रविवारीं दक्षणी व सोमवारीं गुजराथी ब्राह्मण भोजन करविलें. दक्षणा दर एकास ९ रुपये दिली. ब्राह्मणांची संख्या १८००० होती. राहूरकर यांणें महाराजांस आरोग्य झालें म्हणून खंडेराव व बेचराई देवापाशीं दंडवत घातले.

नागाचें विषांत काय घटकावयव आहेत व विष किती दिवस टिकतें ह्याचा अजमास पाहिला. ठेविलें विष जनावरांच्या कातड्यांत घातलें कीं, लागलेंच जनावर मरून जाई त्याचे घटकावयव पाहिले तों कार्बोन ४६ नैट्रोजन १३०, आक्सिजन ६०, गंधक २९०, आणि बाकी हैड्रोजन. ज्ञा. प्र.

गायकवाड सरकार यांनीं हरिबादादा यांच्या जागीं गोविंदरावजीस फौजेचे सेनापती नेमिलें.

तुर्कस्थान स्पाक्टेटर्स म्हणतात कीं, खान यांनीं रशियाशीं लढण्याकरितां एकंदर १४,००० फौजेच्या तीन टोळ्या केल्या आहेत.

इंदुरास नवीन नेमणुका—रा. रा. धोंडो शामराव यांस इंदुरच्या हायकोर्टाचे चीफ जस्टिस, हरि भगवंत नाशीकर हे इनास्तर यांस राणीपुरचे डिस्ट्रिक्ट जज्ज व सर टी. माधवराव यांचे चिरंजीव रा. रा. आनंदराव बी. ए. यांस राजपुत्राचे इंग्रजी शिक्षक अशा नवीन नेमणुका होळकर सरकारांनीं केल्या असे टैम्सचा इंदुरचा बातमीदार लिहितो.

मुंबई कौशल्योत्तेजक मंडळी—इचे एक चिटणीस रा. रा. विनायक रामचंद्र पटवर्धन बी. ए. व रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे यांनीं विश्रामबागच्या वाड्यांत ता. २९ मे रोजीं सभा भरविली होती त्यावेळीं उत्तम संभाषणें होऊन तेथेंच दरमहा २० रु० मिळण्याचें आंकडे पडले आणखी जास्त मदत मिळण्याकरितां पुण्यात याद फिरत आहे. या मंडळीनें सुताच्या कारखान्यांत २ व लोखंडी कामाच्यांत २ असे ४ विद्यार्थी अभ्यासाकरितां ठेविले आहेत.

वियेन्ना प्रदर्शन या प्रदर्शनांत हिंदुस्थानांतून गेलेल्या पदार्थांची फारच वाहवा झाली. इकडून गेलेले पदार्थ व त्यांची मांडणी सर्व प्रदर्शनांत उत्तम आहे असें या प्रदर्शनाचे मुख्याधिकारी आर्चड्युक लुइस आस्त्रियाच्या बादशाहाचे बंधु बोलले. इं. प्र.

धुळे—या आठवड्यांत तारीख २६ रोजीं उष्णतेचें मान इतकें वाढलें होतें कीं डिग्रींतील पारा ११७ अंशावर होता. तारीख २७।२८ रोजीं ११६ अंशावर होता त्या तारखेपासून एकेक अंश कमी होत होत आजतारखेस ११० अगर १११ अंशावर पारा आहे असें उष्णतेचें प्रखर मान वाढल्यानें लोकांत लाहा लाहा करीत दिवस काढावे लागले. व अंगांतून सतत घामाच्या धारा चालू लागल्या. तारीख २६ पासून पाणी मात्रांस उष्णतेमुळें गार पाणी प्यावयास मिळालें नाहीं. घरांत बाहेर वगैरे सर्व ठिकाणीं उष्णतेच्या वाफाच चालल्या. रात्रीच १२ वर दोन वाजे पर्यंत लोखंडी सामान व इतर धातूंचीं जाड भांडीं तापलीं होतीं. याच वेळीं आजारी झालेलीं मुलें वांचलीं नाहींत; च्यार पांच ठिकाणीं स्त्रियांस गर्भपातही झाले व गाईचे गर्भ पडले इतका प्रकार या प्रखर उष्णतेमुळें घडून आला. अशा कडक उष्णतेनें लोक पराकाष्ठेचे घाबरले. असेच पांच सात दिवस जर मान राहील तर रक्ताचें पाणी होऊन रोगही उत्पन्न होतील परंतु तारिख २८ पासून आकाशांत अभ्रें येऊन वारा वाहूं लागला व तुरळक तुरळक जागजागीं वृष्टीही झाली. आजतारखेस तीन वाजल्यापासून अभ्रें येऊन साधारण पर्जन्य पडला. बाजारभाव मागील भावापेक्षां दोन रुपयांनीं अधिक आहे. गुळाचा भाव मात्र दिढीनें वाढला आहे. रोगराई शहरांत बिलकूल म्हणण्यासारखा नाहीं.

मे० एन्टी साहेब हुजूर डेपुटी कलेक्टर व राव बहादुर शंकर पांडुरंग पंडित दिस्त्रीक्ट डेपुटी कलेक्टर यांची नेमणूक सुरतेस सिटी सर्वे करण्या करितां थोडे दिवस तिकडे केली असें समजतें.

येथें एक ओतुरकर वैदिक भिक्षुक आले आहेत ते वेदाचा अर्थ करून सांगतात तो ऐकण्या करितां तारिख २९ रोजीं रा० रा० गणेश आत्माराम नाईक दुकानदार यांणीं शहरांतील सर्व भिक्षुकांस बोलावून मंत्र जागरणाचा समारंभ केला व भटजीनीं संहितेंतील एक अध्यायाचा अर्थ करून सांगितला तसेच रुद्रांतील कांहीं ऋचांचा अर्थ केला. भटजी डोळ्यांनीं अपंग आहेत. या समारंभास गावांतील सभ्य गृहस्थ मंडळी ही होती. खा. नै.

रेशमाच्या किड्याचें तेल—ज्यापान देशांत रेशमाच्या किड्यापासून रेशिम काढून घेतल्यावर त्यांचें तेल काढतात १६९ पौंड (रतल) किड्यापासून १९ पौंड तेल निघतें. हें तेल दिव्यांत फार चांगलें जळतें हें खरें असेल तर या देशांत मुरशदाबाद व बऱ्हाणपुर एथेंही रेशमांच्या किड्याचें तेल काढतां येईल. ज्ञा० द०

## कायद्याविषयींमाहिती

(मागील अंकावरून पुढें चालू)

सुधारलेल्या देशांत कायद्याची माहिती करून घेण्याची सोय असते. पहा. आपले देशांत मोठमोठाले विद्वान बारिष्टर न्यायाधीश येतात यांची विद्या, यांची माहिती, यांचा शोध, यांचा तर्क आणि यांच्या कल्पना किती सर्वमान्य असतात. विलायतेंत कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी एकत्र जमतात व त्यांना कायद्यांतील नाना प्रकारच्या विषयांवर जो कोणी पंडित असेल तो व्याख्यानें देत असतो. अशी योजना आहे. ह्या स्थळास 'इन' असें म्हणतात. इनमध्यें कांहीं एक नियमित मुदतीपर्यंत अशा रितीनें अभ्यास केला म्हणजे तो विद्यार्थी बारिष्टर होतो. बारिष्टर होण्यास प्रत्येक वर्षी अभ्यास करावा लागतो ह्मणांची कित्येक पार्टी रिकामी करून टाकावी लागतात. तेव्हां तो पदवी मिळती तरीही ते सर्वच विषयांत निष्णात असतात अथवा सर्वच गुणांनीं युक्त असतात असें नाहीं. साधारण दिवाणी फौजदारी आक्टांची नुकें घोकून करणें पाठ केल्यानें कायदे पुरुष बनणें कठीण आहे.

जशी साधारण खेड्यांतील पंचांग सांगणारे जोशाच्यानें, कौमुदी, शेखरपर्यंत व्याकरण, भाष्यापर्यंत वेद, गदाधरीपर्यंत न्याय, प्रस्थानत्रयपर्यंत वेदांत व सोमापर्यंत श्रौत इतकेच पढलेल्याशी बरोबरी होणार नाहीं. तशीच आक्ट व इंटर प्रिटिशनें सर्व्हे नजणाराच्यानें इंग्लिश विद्वान बारिष्टर व जडज ज्यांनी वरील सर्व शास्त्रें अवगत आहेत त्यांच्याशी बरोबर करवणार नाहीं.

आतां एव्हां पर्यंत जो कायद्याचा अतिशयितपणा दाखविला याचें मूळ काय आहे हे त्या त्या ठिकाणीं दर्शविलेंच आहे. व थोड्यांत सांगूं लागलें तर इतकेच आहे कीं, देशांत स्वस्थता रहावी. राजा आणि प्रजा यांस सौजन्य वाढावें प्रत्येकास आपलें स्वातंत्र्य असावें. एका

पासून दुसऱ्यास पीडा होऊं नये. आ
हित करीत असतांनां दुसऱ्याचें अ
होऊं नये. सत्यतेची वृध्धी व्हावी.
त्याचा मोड व्हावा. आणि व्य
सुरळीत चालावें.

कायद्यासंबंधीं प्रसिद्ध अशा ज्या
त्याजविषयीं एक ग्रंथ आहे
लीगल म्याक्झिमस ह्मणतात. हा
ब्रूम साहेब मोठे ज्ञानवेत्ते होऊन
त्यांणीं केला. त्यांत कायद्यांचें
काय आहे व हेतु काय आहेत हे त्यां
सांगितलें आहे. त्यांपैकीं कित्येक
येथें घेऊं.

१ लोकांचें हितावर लक्ष्य असणें
मुख्य कायदा आहे. २ अडचणी
मनुष्य सापडला असतां त्याजला वि
अधिकार मिळतात. ३ व्यवहार प्र
अनुसरून असावा. ४ नवीन काय
मागील कायद्याशी विरुद्ध असल
पहिला रद्द झाला असें समजावें.
कायद्याचा अमल पुढें असावा मागें
नये. ६ कायद्यांत नेहमी घडणा
गोष्टी येतात. ७ राजास मृत्यु ना
८ राजाचे हातून अपराध घडत ना
राजा एकाचें घर धुऊन दुसऱ्याचें
शकत नाहीं. १० राजाचें द्रव्य
मुदत नाहीं. ११ राजा आणि प्र
यांपैकीं कोणी यांचे हक्क एका मिळकती
असल्यास प्रथम हक्क राजाचा.
कायदा प्रजेकरितां आहे. राजाचें
यांत नसलें तर त्यास लागू नाहीं.
मूळचें खोटें तें जुने झालें ह्मणून खरें
नाहीं. १४ ईश्वर इच्छेनें घडे
नुकसान कायद्याप्रमाणें नुकसान म्हण
येत नाहीं. १५ ज्याचे योग्य पहि
मागल्याशीं संबंधानें विळत नाहीं तें प्र
नाहीं. १६ वादीची चूकी प्रतिवादी
च्या कबुलायतीनें नाहींशी होते.
प्रत्येक नुकसानीस कायद्यांत उपाय आ
१८ कबुलायतीनें घडलें तें नुकसान न
करारनाम्यांतील लाभ जिकडे तिकडेच
नुकसान. २० चाकरानें केलें तें ध
नें केलें. २१ कायदा सावधाचा सा
कारी पण आळशाचा नव्हे. २२
जमीनीचा मालक तो तींतील सर्व वस्तू
मालक २३ आपली चूक आपल्या
दाव्यात कारण होत नाहीं. २४ क
रून हेतु जाणावा. कर्मावरून दो
दिसत नाहीं पण हेतूवरून दोष दिसतो
२६ मुख्य पदार्थ दिला म्हणजे आ
अजूबाजूचे सर्व दिले असें जाणावें; प
अजुबाजूच्या पैकीं कांहीं दिलें ह्मण
मुख्य दिलें असें समजूं नये. २७
टावर दावा उभा राहत नाहीं. दोघां
व्यवहारानें तिसऱ्याचें नुकसान होऊं न
२८ स्वत:करितां झालेले कायदे केल्या
रद्द होतात. अशा पुष्कळ म्हणी म्हण
कायद्याचीं मूलतत्वें असून त्या प्रत्येकाची
व्याख्या केलेली आहे.

एकंदरींत कायदा प्रजेच्या नफ्याक
ता असतो. नुकसानी करितां बन
नाहीं हें सिध्द आहे.

( पुढें चालू. )

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी
फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा० छा.

Registered No. 4—१८५०

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १ जून सन १८७३ इ० | अंक २२

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| कुटकळ अंकास | ४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | १८ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | १ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ४ |
| ,, दुसरे खेपेस | २ |

## श्रीमद्विद्यारण्यकृत पंचदशी.

महाराष्ट्र व्याख्येसह.

चांगल्या वेदांतनिपुण विद्वानांनीं मान्य केली आहे. कागद जाड, बांधणी सुरेख, मोठ्या सांचाचीं पृष्ठें ५०० ग्रंथसंख्या सुमारें तेरा हजार. किंमत रुपये ५ व टपालाबद्दल ॥ असे ५॥ रोख पाठविले असतां पुस्तक रवाना होईल अगाऊ पैसा न पाठवितां फक्त सह्या ज्या लोकांनीं पाठविल्या आहेत त्यांणींही जलदी करावी. पुढें पत न मिळाल्यास आम्ही जबाबदार नाहीं. प्रति फार थोड्या आहेत.

रघुनाथ शंकर.

मु. ज्ञानपदीप कचेरी.

## जाहिरनामा.

अकोला शहरांतील व ताजनापेठेंतील सर्व लोकांस कळावें कीं, पैवाचे पायखानें बंद करण्या विषयीं मागें तारीख ७ माहे मे सन १८७३ इसवीची नोटिस झाली आहे तिच संबंधानें आणखी खुलासा कळविण्यांत येतो तो येणे प्रमाणें.

नुसते खळग्यांचें ज्यांचे पायखाने आहेत ते त्यांनीं ताबडतोब बंद करावे ते चालूं ठेवणें अत्यंत पीडाकारक आहे सबब तारिख १० जूनचे आंत सदरील प्रकारचा गड्याचा पायखाना कोणाचेही येथें शिल्लक राहूं नये असा स्पेशियल कमिटी भरून ठराव झाला आहे.

ज्यांचे पैवाचे पायखाने आहेत त्यांनीं ते बंद करण्याविषयीं ७ वे तारखेची नोटिस दिलेली आहे. त्याप्रमाणें ते बंद करण्यास ज्यांना सोय नसेल म्हणजे ज्यांचे येथें निकालाचा पायखाना करण्यास बिलकुल जागा नाहीं व कोणाचे येथें जागा आहे पण भंगी तेथें जाण्यास दुसरें दार नाहीं, व नांदत्या घराच्या ओटीवरून वगैरे भंग्यास जाऊं देणे योग्य नाहीं अशी ज्यांची अडचण असेल त्या सर्व लो..... तारिख १० जूनचे आंत साधकागदावर एकक अर्ज लिहून व त्याचें पाठीवर आपले घराचे स्वरूप समजावून देण्याकरितां एक साधा नकाशा काढून तो म्युनिसिपलकमिटीचे व्हाइस प्रेसिडेंट मे० नौलिस साहेब बहादूर यांकडे पाठवावीं म्हणजे त्या लोकांचीं घरें व त्यांच्या सोयी पाहून त्यांना दुसरी जागा मिळविण्या करितां व निकालाचे पायखाने करण्या करितां सात महिने पर्यंत मुदत देण्याची तजवीज केली जाईल. पण जे लोक अशा गैरसोयी कळविणार नाहींत त्यांस मुदत न मिळतां त्यांचे पैवाचे पायखाने पेशजीचे नोटिशींत लिहिल्या प्रमाणें अवश्य बंद करविले जातील हें सर्वांनीं पुरें लक्षांत ठेवावें.

निकालाचे पायखाने नवीन होणार व पाहिले ज्यांचे आहेत त्यांची नित्य चांगल्या प्रकारें सफाई राहण्या करितां कमिटीकडून भंगी देवविण्याची तजवीज ता० १ माहे जुलाई पासून होईल व त्या करितां फार जुजबी कर त्यांपासून घेतला जाईल सर्वांस कळावें तारीख २८ माहे मे सन १८७३ इ०

Padurang Damodar Davankar

आनररी सेक्रटरी.

## पत्रव्यवहार.

या सदरांतालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### वऱ्हाडांतील टपालाच्या सुव्यवस्थेबद्दल.

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्राचे एडिटर यास:—

वि. वि. आपण तारिख ११ माहे मे सन १८७३ इसवीचें अंकांत खेडेगावचें टपाल या सदराखालीं आम्हास सूचना केली ती पाहून आम्ही फार खूश झालों. तर त्याप्रमाणें बेळगांव जिल्ह्याचे सबइन्स्पेक्टर आपल्या जिल्ह्यांत सुधारणा करण्याविषयीं झटताहेत त्याप्रमाणें आम्हीही झटत आहोच. आजपर्यंत ज्यांचेकडून फिर्यादी आल्या त्याबद्दल वेळच्यावेळेस बंदोबस्त होतच गेले. कित्येकांनीं फक्त तोंडी मजकूर जाहीर केला त्यावरून अमुकच मनुष्य गुन्हेगार व अमुकच इसमाची चूक असें बरोबर न समजल्यामुळें कांहीं तजवीज करतां आली नाहीं. तथापि आपणास कळविण्यांत येते कीं, आपण लोककल्याणाचे हेतूनें आमचे वतीनें अगर आपले वतीनें आपले पत्रांत खालील मजकुराची जाहिरखबर प्रसिद्ध केल्यास लोकांवर उपकार होतील व त्यांच्या टपालसंबंधीं गैरसोयी दूर होण्यास उत्तम मार्ग होईल.

#### जाहिरखबर

या जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्यांत खेडेगांवचीं पत्रें वाटण्यास काम पाहून एकापासून चार पर्यंत सिपाई ठेविले आहेत व त्यास वेळोवेळीं प्रत्येक गावांतून महिन्यांतून सहा अगर सात वेळ जाऊन त्या गावची पत्रें वाटावी व त्या गावांतून पत्रें रवाना करण्यास घेऊन यावीत असे बद्दल सरक्युलरें केलीं आहेत व त्या लोकांस हमेश ताकिदी दिल्या आहेत शिवाय ते लोक त्याप्रमाणें वर्ततात किंवा नाहीं हे पाहण्याकरितां प्रत्येक शिपायाजवळ प्रत्येक गावचे पाटलाच्या सह्या घेण्याविषयीं एक बुक बांधून दिलें आहे त्यावरून त्या लोकांची वर्तणूक दृष्टीस पडते. कितीएक वाईट बुद्धानें पत्रें बुद्धिपुरस्कर पोचविणार नाहींत अगर पोचविण्यास देर करतील अशा प्रकारचे गुन्हे पत्राचे मालकाकडून फिर्याद आल्याशिवाय किंवा आमची स्वारी फिरण्याचे वेळेस त्या गावास गेल्याशिवाय नजरेस येऊ शकत नाहींत. या करितां आपण या जाहिरखबरेनें ज्या लोकांस ज्या गैरसोयी असतील त्या पत्रानें त्यांणी आम्हास कळवाव्यात व त्या फिर्यादीबरोबर त्या पत्राची पाकिटें असावीत असें प्रसिद्ध करावें. अशा प्रकारच्या फिर्यादी आल्याबरोबर त्यांचा बंदोबस्त करण्यांत आम्ही फार तत्पर आहोत. खेडेगावचे लोकांस पत्रास तिकिटें लावण्याविषयीं गैरसोय असते या करितां जे शिपाई पत्रें वाटण्यास जातात त्यां बरोबर विक्रीकरितां तिकिटेंही दिलीं जातात व त्यांनां म्हणजे बाहेरील लोकांनां अशा गाऱ्हाण्याबद्दल हशील पडूं नये म्हणोन सरकारांनीं ठराव केल्याप्रमाणें त्यांणीं पत्राचे पाकिटावर "पोष्टाविरुद्ध फिर्याद" अशीं अक्षरें लिहिलीं म्हणजे आम्हास व त्यांना हशील न पडतां त्या फिर्यादी येऊन पोहोंचतील कळावें. तारीख २७ माहे मे सन १८७३ मुक्काम अकोलें.

गोपाळ नारायण

सब इन्स्पेक्टर पोस्टमास्तर

पश्चिम वऱ्हाड.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि. वि. आपली माझी ओळख नाहीं तरीं गरिब लोकांचें. दुःख सरकारापुढें ठेवण्याचे कामीं आपलें लक्ष्य आहे. म्हणून हें पत्र आपणाकडे पाठविलें आहे. प्रसिद्ध करावें.

महाराज आपले ह्या वऱ्हाडांत कोण कोणते वेळेस काय हुकूम होईल व तो केव्हां फिरेल याचा कांहींच नेम नाही. मी थोडे दिवसां पूर्वीं या मोर्सी तालुक्यांत फिरत फिरत आलों होतों. ते वेळेस तूर्तच दिवाणी १०० रुपये पर्यंत अधिकार नवीन आलेले. मि० भास्कर महेश्वर तहशिलदार यांस रयतेचे सुखासाठीं मिळाल्या मुळें कामाची मोठी गर्दी असे. आंत तहशिलदार यांस इनसाफी कामाचा उल्हास. शिवाय त्याना निस्पृहता अनकुळ असल्या मुळें फार जलद आणि सुशीलपणानें वागून उत्तम प्रकारचें काम करणार माझे दृष्टिस पडले. ह्या सालास पुन्हा एकदां आलों तर असें समजलें कीं मोर्शी एथील दिवाणी अधिकार सरकारांनीं कमी केला त्यामुळें मागील प्रमाणें इनसाफाचा चमत्कार दृष्टीस पडणार नाहीं असें बहुतेक लोकमुखें माझे श्रवणीं आलें. काय हें आश्चर्य! अहो एक वर्ष झालें न झालें तर पुन्हां तोच हुकूम तेच सरकार बदलतात असा प्रकार मुंबई इलाख्यांत किंवा मध्य प्रांतांत माझे ऐकण्यांत कांहीं कधीं आला नाहीं दिवाणी अधिकार सरकारांनीं या तालुक्यांतून कमी करणें मनावरें घेतलें. हें एक प्रकारें रयतेस दुःख दिलें इतकेंच नाहीं तर सरकारचे ब्रीद रयत पर वर्षींचे आहे व त्याकडे सरकारांनीं दुर्लक्ष केलें असें मला वाटतें.

इकडील सहगासानें असें समजतें कीं जेव्हां ह्या तालुक्याचें काम उमरावती जिल्ह्यांतील कोडतांत चालत होतें तेव्हां फिर्याद करणें हें काम मोठे फायद्याचें नवतें ह्मणजे उमरावती पासून ह्या तालुक्याची सरहद ४० कोसावरही लांब आहे. तेव्हां मोठे श्रमानें फिर्याद मुख्य दिवाणी कोडत जिल्हेस पाठवील त्या कोडतांत झटके खात पक्षकार लोकांस जावें लागत असे त्या नंतर कांहीं दिवस बंगला सेवन केल्यावर नशिबानें त्या पासून फायदा झाल्यास उत्तम, न झाल्यास घरीं बसणें प्राप्त होतें. असो त्यांत हो ज्याच्या मुदती जावात व ज्याची वाट घरांत निघतच नाहीं किंवा जे लोक पैसेकरी आहेत तेचमात्र असे प्रकारचे त्रास सोसून दावे करित असत. मग या गरिब रयतेची दाद कोठून लागणार? तथापि गेले किंवा प्रतिपक्षकार असल्यामुळें पुरावा व साक्षीदार देऊं लागले असता भत्ता खर्च व त्याचीं पोट, खर्च व स्वतां खाण्यांत खर्च यातच रयतेची लावी व्हावी. त्यांतही कोडत लांब असल्यामुळें साक्षिदार मुळींच जाण्यास नाकबूल, तथापि जाऊं लागले तर त्यांना पक्की जरी माहिती आहे तरी ते एकदम नाहीं म्हणून सांगतात त्यांचा इरादा असा कीं पुन्हा कोणी आपली साक्षी घालू नये व ह्यामुळें रयतेस न्याय जसा मिळावा तसा मिळत नाहीं आणि तेणेंकरून त्यांचें फार तोटे होतात. शिवाय या कामास जाणें येणें किमान पक्ष १९ दिवस लागतात व तितके अवसरांत त्याचे शेतकीचे काम बंद राहून वक्त गेल्यामुळें नुकसान होत असतें.

आता कारणपरत्वें जतो काढली तर प्रथम येण्यासच जास्त अवकाश लागल्या मुळें माल सापडत नाही. दैववशांत सापडला तर तो उमरावतीस नाजराकडे नेण्यांत खावटी खर्च आणि किराया लवंच असेच त्याची किंमत पुरत नसून उलटा मालही खराब होतो. मग पक्ष का

रास काय मिळणार ! तात्पर्य दूरचे कोडतांत या प्रकारे तोटे होत असून पुष्कळ हाल भोगावे लागतात.

मोर्शी तालुक्यांत ५०० रुपये पावे तो अधिकार होता तेव्हां फारच जलद आणि पुष्कळ दावे लवकर निकाल झाले मिदवारी हमेशां तर एकेच दिवसांत पैल आणि फयसल असे मोकद्दमे निकाल झाल्याचें मांझे पाहण्यांत आले. पत्र कर्ते महाराज हल्ली ह्या तालुक्यांत जे दावे झाले आहेत त्याचे निमेसुद्धां पूर्वी उमरावतीस झाले नसतील व होणार नाहीत कारण दूरचे कोडतांत मोठा त्रास पडत आहे.

मोर्शी तालुक्यापेक्षा कारंजा किंवा उमरावती विशेष लांब नाहीं परंतु सरकारानीं तेथें एक स्वतंत्र कोडत ठेविलें तसेच खुद्द उमरावतीस फौजदारी अधिकार चालविणारे पुष्कळ अमलदार असून शिवाय दिवाणीसाठीं स्माल काज कोडत व दुसरे न्यायाधिशाचीं कोडतें बरीच विपुल आहेत. व जवळ वदनेरा एथेंही एक स्वतंत्र पूर्ण अधिकाराचें कोडत ठेविलेंच आहे. या मानानें तर मोर्शी तालुका हा मोठाच दुर्दैवी समजला पाहिजे. कारण ह्या तालुक्यांत कारंज्याप्रमाणें कोडत असण्याची अवश्यकता असतां सरकार तिकडे अगदीच दुर्लक्ष करीत आहे.

पत्रकर्ते महाराज तालुक्यांत कोडत राहिल्यापासून अनेकप्रकारचे बंदोबस्त असतात. नाहींपेक्षां दूरचे सबबीमुळें बहुतेक तंटे सरकारचे कानावर येण्यासारखे सुध्दां येत नाहींत. आणि हा तालुका ह्या जिल्ह्यांत मोठा असून जवळच नागपुरची सरहद्द लागली असल्यामुळें तिकडील मोठमोठे लोक राहतात व त्यांच्या ही फिर्यादी याच कोडतांत होतात. याजकरितां आपणही आपले मत देऊन स्वतंत्र कोडत रहाण्याविषयीं सरकारास शिफारस करावी. पत्रविस्तार जास्त होतो यास्तव पुरे करितो. हे विनंती.

एक फिरस्ता.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. मागील पत्रीं कांहीं मजकूर लिहून आपलेकडे पाठविला तो मेहेरबानी करून आपण आपले सुंदरपत्रीं छापून प्रसिद्ध केला तें पाहून हे पत्र लिहावें असे मनांत आले. तर हेही छापा ह्मणजे मग खोटया फिर्यादी करून लोकांचें नुकसान करण्याचे इराद्यानें छातीस हात लावून पुढें येणार लोकांवर तुमचा छापा बसेल व असें झाल्यानें तुमचीही छाप पडेल.

या जिल्ह्याचें कचेरींतील क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. परशराम सखाराम गुप्ते यांचे खटल्याची चौकशी तारीख २६ रोजीं सुरू होऊन ती अद्याप पर्यंत चालू आहेच. पहिले दिवशीं ह्मणजे सोमवारीं ८।१० साक्षीदारांच्या जबान्या झाल्या. मंगळवारीं ४।५ इसमाच्या साक्षी झाल्या व काल बुधवारीं दोन अगर तीन जणाच्या झाल्या. या एकंदर साक्षीवरून फिर्यादी श्रीधरपंत काळे व तसेच त्यांचे इतर साथीदार यांची उमेद बरीच खचली असावी असें त्यांचे मुखचर्येवरून अनुमान होतें मग झालेल्या साक्षी यांस प्रतिकूळ आहेत किंवा कसें हें समजत नाहीं. समजल्यास लिहून कळवीन.

त्याजवर झालेल्या फिर्यादी पैकीं तळेगांव एथील पाटलाचे घराण्या पैकीं राजीराव नामधारक पाटलानें केलेली एक फिर्याद आहे. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, माझा पाटिलकीचा तंटा झाला व मी परशराम सखाराम यांचे घरीं जाऊन त्यांची पायधरणी केली व त्यांनीं तुझे कामाचा बंदोबस्त करतों असें सांगितल्यावरून मी त्यांजला सहा तोळ्याचे सोन्याचें कडें दिलें व पुढें कामाचा निकाल माझे तर्फे झाल्यावर ठरलेले रकमे पैकीं बाकीची रक्कम देण्याची होती. एकूण तीनशें रुपये ठरले होते पुढें माझें काम झालें नाहीं असें मला कळल्यावर मी त्यांजकडे जाऊन कामाबद्दल विचारलें तेव्हां त्यांनींही वर प्रमाणेंच सांगितलें नंतर मी आपले कडें मागितलेवरून त्यांणींही देतों ह्मणून सांगितलें. या गोष्टीस सुमार १८ महिने झाले असावे. कडें वारंवार मागितलें असून आजपर्यंत चाळवण्या दाखविल्या अखेरीस तें सोयीचे वाटेनें कडें परत देत नाहींत असें वाटल्यावरून ही फिर्याद केली आहे. हें कडें दिलें त्या वेळेस मजबरोबर शेलु बेचू नावाचा एक माझे गांवचा जागल्या होता. व ते आपल्या घराचे पुढचे बाजूस असलेले व्हरांड्यांत सकाळचे ८।९ वाजतां तोंड धूत बसले असतां सदर्हू कडें दिलें. या प्रमाणें त्याणें आपली जबानी दिली असें परशराम सखाराम यांचे विरुद्ध पक्षाकडील लोकांचे सांगण्यांत आलें.

पाटिल मजकूर याचे बरोबर असलेले जागल्यानेंही हुबेहूब याप्रमाणें साक्ष दिली.

यांत कांहीं मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. हा पाटील अगर याचा बाप कामावरून सरकारी कामांत कांहीं लबाडी केल्या कारणानें बडतर्फ झालेला आहे. जागल्या हाही कामावरून बडतर्फ केलेला असून पाटील मजकुराचा खासगी नोकर आहे. या पाटलाचें काम मेहेरबान रेसिडेंट साहेबांपर्यंत जाऊन तेथपर्यंतही हाच हरला. तेव्हां याचा पक्ष कधीं अगर खोटा होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असें परशरामपंत यांजला कळणार नाहीं कीं काय? मग ज्याचें काम आपले हातून व्हावयासारखे नाहीं असें इसमापासून ते लांच घेतील तरी कसा? बरें इतक्या उपर घतला तरी तो साक्षीदाराचे समक्ष घेतील काय? ज्या व्हरांड्यांत ह्मणजे सायवानांत ते तोंड धूत बसले होते ह्मणून ह्मणणें आहे तसे ठिकाणीं ह्मणजे घराचे पुढचे बाजूस अशीं कामें कोणीं करीत बसत नाहींत ही गोष्ट खरी आहे. मग हेच कसे बसतील बरें? कदाचित् बसले तरी लांच घेत घराबाहेर बसले असल्यास एकटे जागल्याचे तर काय परंतु आणखीही पुष्कळ लोकांचे समोर लांच घेतल्यासारखें होईल. तर साधारण अक्कलेचा कोणीही मनुष्य असें करणार नाहीं. व केलें असल्यास अशा वेळेस कडें परत न देतां विनाकारण तंटा वाढवून आपणास संकटांत घालील असा मनुष्य विरळा. हे सर्व विचार मनांत आणिले ह्मणजे याप्रमाणें घडलें नसावें असें अनुमान होतें.

परशराम सखाराम यांणीं या बाबदींत डिफेन्स तयार करून तो काल रोजीं कमिटी समोर हजर केला व तो पाहून कमिटीदाराची खात्री झाल्याकारणानें फिर्याद खोटी आहे व तुह्मास या फिर्यादीचे संबंधापुरतें दोषमुक्त केलें आहे असें कमिटीनें त्यांस सांगितलें.

या एकंदर हकीकतीवरून असें दिसतें कीं, ही फिर्याद खोटी असावी. व असें ऐकण्यांत आलें आहे कीं, परशराम सखाराम सदर्हू पाटलावर दिवाणींत नुकसानीबद्दल व फौजदारींत अब्रू घेतल्याबद्दल फिर्याद करणार आहेत. असें कृत्य केल्याबद्दल गोपाळ बापा नावाचा इसम नुकताच कैदेंतून सुटल्यामुळें त्याची जागा रिकामी झाली आहे. त्या जागे करितां पाटिल बाबा उमेदवारीच करीत आहेत कीं काय असें वाटतें. शिवाय नुकसानी भरून द्यावी लागेल ती निराळीच. असे प्रकारच्या खोट्या फिर्यादी कोणी करूं नये हें शिकविणें अवश्य आहे. व हें शिकविण्याचा सुलभ मार्ग अशी फिर्याद करणारे इसमास कारागृहांत घडेघडण्यास पाठविणें हा होय.

अशी फिर्याद करण्यां विषयीं पाटिल मजकुरास ज्या लोकांनीं मदत केली असेल अगर ज्यांनीं अशी सल्ला दिली असेल त्या लोकांचे या पाटलानें फारच आभार मानले पाहिजेत. परंतु त्यांत वाईट इतकेंच कीं, सल्ला देणारे एकीकडेच राहून पुढें वाईट परिणाम होण्याचीं चिन्हें दिसतात याप्रमाणें झाल्यास दुःख पाटलास मात्र एकट्याच भोगावे लागणार आहे इकडे सर्वांनीं लक्ष पुरवावें व असें काम न करण्या विषयीं फार सावधगिरी ठेवावी.

अहा बरें झालें सावधगिरी सांगण्या वरून मीही सावध होऊन पहातों तों मजकूर फार लांबलें सबब पुरे करतों.

आजची व पुढची हकीगत मागाहून कळवीन कळावें ता० २९ माहे मे सन १८७३ इसवी.

चमत्कारावलोकनेच्छू.

---

# वऱ्हाडसमाचार.

मिती जेष्ठ शुद्ध ६ शके १७९५

## सासुसासऱ्याचा जांच

लहानपणच्या लग्नें करण्याचा उद्देशांतील, हा एक उद्देश आहे कीं, परके घरच्या
मुलीस ज्या घरीं रहावयाचें त्या घरा
ची चाल रीत लागावी. हा उद्देश
सासरे सुशील असल्यास पुरा होतो
कुटुंब सुतानें नांदत परंतु सासरीं मायाळु
ता न लागिली व कुरपणा शिकविला
णजे सर्व कुटुंबाची नासाडी होती.
नासाडीचें एक उदाहरण नुकतेच
न आलें आहे तें प्रत्येक सासुसासऱ्यां
लक्ष्यांत ठेवून तसा प्रकार न होऊं दे
स झटणें जरूर आहे. पुणें शहरांत
जी रामकृष्ण पाटील ह्या नावाचा एक
हस्थ मंधीपणाचा धंदा करून रहात अ
हे गृहस्थ आमचे वऱ्हाडांतील प्रसिद्ध
बळवंत रामकृष्ण पाटील, उमरावती ह
स्कुलातील सेकंड असिस्टंट मास्तर ह्यां
जेष्ट बंधू आहेत. त्यास कुटुंब असून
व तीन मुलगे आहेत. त्या मुलांपैकीं
डील मुलाचें वय १४ वर्षांचे आहे व
चे लग्न होऊन सुनेचें वयही १२ वर्षां
आहे. लग्न झाल्यादिवसापासून पाटील
पाटलीण ह्यांनीं सुनेस गांजण्याचा प
ठरविला होता, परंतु गांजणुकीची कम
झाली तेव्हां तो सर्व प्रकार बाहेर आ
त्या क्रूर सासू सासऱ्यांनीं आपल्या सुनेस
दिवस अन्नपाण्याशिवाय कोंडून ठेवि
कोलदांडा घालून मार दिला. हात
बांधून खुंटीस टांगून ठेविलें. तेथून
खालीं पडल्यामुळें फिरून टांगली व
था तापत घालून त्यानें १०–१२
दिले. व ती ओरडूं लागली तेव्हां त
विलेले तेल तिच्या तोंडांत ओतण्या
भांति दाखविली. हर हर! काय निर्द
णा! अशा अवस्थेंत तिचा शेवटच
याचा. पण तिच्या आयुष्याची दोरी
बळकट असल्यामुळें तिची ही हतभा
स्थिति तिच्या आईस व मामास कळ
व त्यांकडून पोलिसास कळल्यामुळें
च्या मदतीनें या कसायाच्या हातून
ला सोडविलें. माजिस्त्रेटासमोर न्ह
रांची चौकशी झाली त्या वेळेस ह
लोक हा खटला पाहण्याकरितां जात
ते. अखेर गेले आठवड्यांत ह्या
ल्याचा निकाल होऊन रावजी रामकृ
पाटील व त्याचें कुटुंब ह्यास ६ महि
ची शिक्षा मिळाली. मुलीचा नवरा ह्या
हा दुष्ट कृत्यास मदत केली ह्मणून त्या
४ महिन्यांची शिक्षा मिळाली. दु
दोन लहान मुलें आईबापांचून राहीनात
णून त्यांसही तुरुंगांत पाठविलें. सा
सुन शिवायकरून सगळें कुटुंब बंदीश
त पडलें. हे कशाकरितां? तर फक्त
जाचाकरितां. असें आहे तर मग ही
ष्ट प्रत्येक कुटुंबानें लक्षांत ठेवण्यासार
नाहीं काय?

---

## वऱ्हाड

हैद्राबादेस रेसिडेंट साहेबांचें शिर
दारीची ३०० रुपये पगाराची जा
रिकामी झाली तिजवर एपील कमिश
साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट रा.
विष्णु सदाशिव पितळेकर यांस नेमि
ही निवड फार उत्तम झाली व ह्या
ल आम्हीं शिफारसही केली होती.
गृहस्थ उदयीक एथून हैद्राबादेकडे जा
र आहेत.

विष्णु सदाशिव हे या वऱ्हाडांत सुमा
१० वर्षें होते. प्रथम १०० रुपयांत
अकोल्यास स्कूलमास्तर आले नंतर
पुटि कमिशनरचे शिरस्तेदार झाले
उमरावतीस त्यांची बदली झाली नं
पूर्वभाग व पश्चिमभाग अशा कमिश
च्या दोन जागा झाल्या तेव्हां हे पु
ां अकोल्यास आले व तेव्हांपासून ए
व होते. यांची काम करण्याची शैली गो
वर्णनीय होती. मेहेरबान लायल सा
यांच्या हाताखाली जानीं त्यांची म
खुश ठेवून काम केले ते गृहस्थ "स
न विजयी भवेत्" या प्रमाणें कोठेंही व
ोणतेंही कामावर गेले तरी निखालसी
ळविल्या शिवाय राहावयाचे नाहींत. हा
ायल साहेबांचा कित्ता व पिसोळकर यां
ा स्वताचाही तोच खाका आहे.
सो हे पाहिल्या प्रतीचे हुशार असून यां
ी मिजास साधी, बुद्धि उत्तम, समजू
तिव्र, मन गंभीर, वागणूक निस्पृह व नि
ोची, तसेच हाताखालच्यावर जरब चां
ली व लांच लुचपतीशीं केवळ वैर अ
े याचे सद्गुण होते असे गृहस्थ येथून
ातोहेत म्हणून सर्व दिलगीर आहेत पं
ु जर ही दिलगिरी त्यांच्या करितां आ
आणि त्यांचे या जाग्यांत हित व
तोष आहे तर त्यातच येथील लोकांनीं
ही संतोष मानिला पाहिजे.

आतां आम्ही इतकेंच इच्छितों कीं आ
मचे मित्र विष्णु सदाशिव हे हैदराबादेस
ही इकडच्या प्रमाणेंच कीर्तिमान होवोत व
पुन्हा वऱ्हाडांत मोठ्या जागेवर येवोत.

—000—

रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर
यांच्या जागेवर अकोला डिपुटि कमिश
नरचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. माध
वराव हरी सहस्त्रबुध्धे यांस नेमिले व त्यां
च्या जागेवर खामगामचें स्मालकाजको
र्टाचे क्लार्क रा. रा. विष्णु सखाराम बाप
ट यांस नेमिलें. खामगावास कोण ने
मिलें तें अझून समजलें नाहीं. या सदरी
ल दोन नेमणुकाही योग्य झाल्या. रा.
रा. वामनराव बाळाजी डाय० सा० च
क्लार्क यांस ही जागा मिळेल तर ए
का तरुण गृहस्थाला नवीन उमेद दि
ल्यासारखे होईल.

उमरावतीस मि० परशरामराव यांचे
खटला चालू आहे त्यासंबंधी कांहीं हकी
कत "चमत्कारावलोकनेच्छु" यानें आ
म्हाकडे पाठविलेली पत्रव्यवहारांत छाप
ली आहे. तिकडे वाचकांनीं लक्ष्य द्या
वें. त्यावरून परशरामरावाविरुद्ध प्रयत्न
करणाऱ्यांच्या श्रमाचें फळ कांहीं अंशीं
दिसून येईल. कमिटीनें नाजीराव पाटी
ल खार तळेगावकर यांच्या फिर्यादी
च्या बाबदींत परशरामराव यांस स्पष्ट सां
गितलें कीं, तुम्ही या कामांत निर्दोषी
आहात हेंही सदर पत्रावरून वाचकांस
दिसून येईल.

—000—

पश्चिम वऱ्हाडच्या टपालखात्याचे
सब इन्स्पेक्टर रा. रा. गोपाळ नारायण
यांणीं आम्हास पत्र पाठवून सर्व लोकांचे
माहितीकरितां जाहिरखबर पाठविली ती
आम्ही पहिलें पृष्ठावर प्रसिद्ध केली

आहे. तिजवरून खेडेगावचे लोकांचीं पत्रें वक्तशीर मिळण्याविषयीं सरकारचे प्रयत्न आहेत असें दिसतें. पण लोकांस मात्र त्यापासून फायदा कितपत होतो तें कळत नाहीं. तथापि यात अधिकाऱ्याचा कांहीं वाक आहे असें आम्हास दिसत नाहीं. ज्यांचीं पत्रें वक्तशीर मिळत नाहींत त्यांणीं त्याविषयीं गाऱ्हाणें केलें पाहिजे व तें गाऱ्हाण्याचें पत्र बिनहाशी(?)ली पाठवावें असेंही स्पष्ट आहे. तेव्हां इतक्याउपरही लोक बोभाटा करणार नाहींत तर त्यांचाच तोटा होईल. आम चें वर्तमानपत्र ज्यांना उशीरानें पोंचतें त्यांणीं त्याबद्दल आम्हास कळविलें व त्या उशीरानें पोंचणाऱ्या पत्राचें कव्हर आम्हाकडे पाठवून दिलें तर आम्हीही सबइन्स्पेकटर यांस तो मिळा कळवूं व बंदोबस्त करूं.

—000—

उमरावती हायस्कुलांतील ६० रुपयांचा शास्त्र्याची जागा गुदस्त सालापासून रिकामी आहे. तीवर रा. रघुनाथ शास्त्री कवीश्वर त्रिंबककर यांस नेमिले असें आम्ही ऐकतो. परंतु त्या नेमणुकीच्या संबंधानें आमचे असें म्हणणें आहे कीं, ही जागा भरतांना मेहेरबान डैरेक्टर साहेब यांणीं हक्काचा विचार केला नाहीं. हायस्कुलांतील शास्त्र्यास संस्कृताचें अंग असून इंग्रजीही येत असलें पाहिजे व शिकविण्याची शैली माहित पाहिजे. ह्या तीन गोष्टींपैकीं रा. रघुनाथ शास्त्री ह्यांस संस्कृत फार चांगलें येतें अशी त्यांची कीर्ती आहे. परंतु त्यांस म्हणण्यासारखें इंग्रजी येत नाहीं व शिकविण्याविषयीं त्यांची जुनी शास्त्रीय धरणी आहे. त्यांची नौकरी वगैरे पाहूं गेले असतां हरदमेश त्यांचे मिळें आहेत ह्याकरितां खरोखर नेमणूक लोकांस पसंत होईल असें आम्हास वाटत नाहीं. शास्त्र्याचे जाग्याविषयीं रा. महादेव शास्त्री माटे सातारकर जे हल्लीं वऱ्हाडांत स्कूलमास्तर आहेत त्यांचा हक्क आम्हांस विशेष वाटतो. वर जे आम्ही तीन गुण दाखविले ते त्यांचे अंगीं आहेत व त्यांस पूर्वी ४० पगार असतां ग्रेडेशन मध्यें त्यांस ३० रुपये कबूल करून रहावें लागलें आहे. तेव्हां त्यांस हायस्कुलांतील ६० रुपयांची जागा मिळणें वाजवी होते व शोधून पाहिलें असतें तर आणखीही कित्येक गृहस्थ दिसले असते

—000—

उमरावती हायस्कूल.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. महाराज आपल्याकडे चार ओळी लिहून पाठविल्या आहेत त्या आपण आपल्या येत्या अंकांत छापून प्रसिद्ध केल्यास आम्ही आपले फार आभारी होऊं.

थोडे दिवसांपूर्वी आम्ही खाली सही करणारांनीं मेहेरबान डायरेक्टर साहेब बहादूर यांजकडे उमरावती हायस्कुलांतील विद्यार्थी या सहीचा अर्ज केला आहे. त्यांत त्यांना आम्ही इतकीच विनंती केली होती कीं, त्यांनीं चिखलदऱ्याहून आकोल्यास जातांना उमरावतीस येऊन एथील हायस्कुलाची खरी स्थिति काय आहे ती पाहून जावी. त्याप्रसंगीं त्यांनीं आम्हांस विचारल्यास गोमाजी कापशाच्या पत्रासंबंधी जी माहिती आहे ती देण्यास तयार आहेत. चौकशी अंती खरा प्रकार काय आहे हा त्यांच्या नजरेस आल्यावर या हायस्कुलाची निदान पूर्वीची तरी स्थिती कायम राहील अशी आम्ही आशा करित आहो. मेहेरबान साहेब हे हायस्कुलांत येऊन चौकशी केल्यावर जो प्रकार होईल तो आम्ही आपणास कळवूं. लोभ असावा हे विनंती.

दामोदर जनार्दन.
सिताराम सदाशिव
रामकृष्ण हरी.
शमशेरअली हसनवक्ष.
गोविंद नारायण चिकाटे.

## नोटिस.

नोटिस—धुळाराम देवता इनारदार राहणार नांदद परगणें अनासिंग तालुक पुसद जिल्हा नाशिम यांस सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं. तुम्ही आपली घोडी आम्हाजवळ ठेऊन पुढें महिना पंधरा दिवसांत घेऊन जाऊ असें बोलून गेला त्यास मुदतीप्रमाणें आपली घोडी सांभाळावी. पुढें घोडी घेऊन जाण्याविषयीं पुष्कळ निरोप पाठविले परंतु अद्याप घोडी नेली नाहीं तर आतां प्रसिद्धपणें आपणास असें कळवितो कीं, हे नोटिस पावतांच तुम्ही येऊन घोडी घेऊन जावी असें न केल्यास घोडीचे कोणतेही प्रकारचे नुकसानीचा मी जबाबदार नाहीं. आमची गाडी तुमचे जवळ आहे ती जतन ठेवावी कळावें.

ता. २४ मे सन १८७३ इसवी.

(सही) हनवंत बल्लद रामजी द. खु

## वर्तमानसार

मि० नानाभाई हरीदास यांस मुंबई हायकोर्टांत जडज नेमल्या विषयीं गत्या आठवड्याचे सरकारी ग्याझेटांत छापून प्रसिद्ध झालें आहे.

कलकत्याचे कांहीं वकीलांनीं उन्हाळा फार होतो सबब सुटी मागीतली होती ती जडजानीं कबूल केली नाहीं.

नानाभाईरोजी मुंबईचे माजिस्ट्रेट यांनीं तीन महिन्याची हक्काची रजा घेतली आहे.

बडोद्याचे खानविलकर दिवाण यांनीं मुंबईहून एक उत्तम वस्तु नेली आहे ती ती कोणती? रंडी!

श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांची प्रकृती दुरुस्त झाली. त्या दिवशीं त्यांनीं ७० कैदी सोडले. चवल्या पावल्या उधळल्या व डा० जान याला ६००० ची जहागीर दिली.

आम्ही ऐकतो कीं, पुणें एथील पुढारी लोकांनीं एक कापड विणण्याचे छोटें यंत्र नमुन्यादाखल आणिलें आहे. त्याचें सामान कांहीं अस्ताव्यस्त झालें आहे ते नीट लावण्यास मि० नानाजी कोचविलचावर यानकडे दिलें आहे.

ज्ञा. प्र.

## सर्पदंशावर उपाय

मागल्या गुरुवारच्या सरकारी ग्याझेटांत, मुंबई सरकारानें, सर्प चावला असतां काय व कसा उपाय करावा या विषयीं हकीकत छापली आहे ती आमच्या वाचकांच्या माहिती करितां पुढें उतरून घेतली आहे:—

सर्प दंश झाल्यावर होईल तितक्या जलदीनें ज्या ठिकाणी साप चावला असेल त्या ठिकाणच्या दोन अथवा तीन इंच वरच्या अंगास शरीराच्या भागा सभोंवती दोरी बांधावी व दोरीनें शरीराचा भाग अगदीं बळकट बांधला जाण्या करितां दोरीच्या आंतून बारीक काडी घालून ती पिरगटावी म्हणजे शरीराच्या भागा सभोंवती, दोरी नुसती ओढून बांधण्या पेक्षां अगदीं गच्च बसेल याच प्रमाणें शरीराच्या वरच्या भागास ४ पासून ६ इंचांच्या अंतरानें आणखी दोन तीन दोऱ्या बांधाव्या.

या प्रमाणें दोऱ्या बांधणे झालें म्हणजे ज्या ठिकाणी दंश झाला असेल म्हणजे सापाच्या दंशापासून जखम झाली असेल तिजवर चाकूनें अथवा या सारख्या दुसऱ्या शस्त्रानें सुमारे पाव इंच खोलीच्या फासण्या माराव्या व रक्त पुष्कळ वाहू द्यावें. अथवा या पेक्षांही उत्तम मार्ग, जेवढ्या जागेवर सर्प दंशाची जखम झाली असेल तेवढी जागाच कापून काढावी नंतर कापलेल्या अथवा फासण्या मारलेल्या भागास म्हणजे आंतील मांसास लाल तापलेले लोखंड अथवा निखारा होईल तितक्या जलदीनें लावावा. अथवा कार्बालिक किंवा नायिट्रिक असिड (क्षार) लावावें. आंगठे, बोट, अथवा दोरीने बांधतां येईल अशा भागावर सर्प चावला नसेल तर हाताच्या बोटांनें व आंगठ्यानें कातडी वर उचलून चांगल्या धारेचा चाकू अथवा दुसरें शस्त्र घेऊन दंशाच्या जागेवर जेथें जेथें टोचलेले असेल त्याच्या भोंवतालून बोटाच्या नखा एवढा म्हणजे सुमारे पेरएवढा व पाव अथवा अर्धा इंच खोल इतका भाग कापून काढावा, व आंतील मांसास लाल तापलेले लोखंड अथवा निखारा लावावा.

लिकर अमोनियाचे सुमारे पंधरा थेंब घेऊन त्यांत एक औंस पाणी म्हणजे सुमारे अडीच रुपये भार पाणी घालून ते द्यावें. व या प्रमाणें पाव पाव तासाच्या अंतरानें तीन चार वेळ द्यावें. सर्पाच्या विषा पासून बाधा झालें आहे असें दिसलें तर अधिक वेळ द्यावें. अथवा उष्ण ब्रांडी, रंम, विस्की अथवा दुसऱ्या प्रकारची दारू एक औंस व एक औंस पाणी घालून, दंश झालेल्या मनुष्यास, दर पंधरा पंधरा मिनिटानें देत जावें. डाकतर जवळ पास असेल तर त्यास लागलेच बलावणें पाठवावें अथवा दंश झालेल्या मनुष्यास डाकतराकडे न्यावें डाक्टर जवळ नसेल व सुमारे अर्धा तास पर्यंत विषाचा अमल न दिसल्यास दोऱ्या ढील कराव्या. असें न केलें तर जखम नासावयास लागेल.

विषाचा अमल दिसावयास लागेल तर, मनुष्य नरें होण्यास लागेपर्यंत अथवा दंशाची जागा गार, व हिरवी पिवळी होईपर्यंत दोऱ्या सोडू नयेत. जखमेंतील रक्त वगैरे चोखून ह्मणजे शोषून घेतलें असतां गुण येतो परंतु चोखणारास इजा होण्याचें भय असतें. सदरहु प्रमाणें उपचार केलें असतांही विषाचा अमल दिसू लागेल व तो जास्त वाढत जाईल व रोग्यास भूल येईल किंवा तो गैरसावध वगैरे होईल तर त्यच्या काळजावर व ह्रदयावर मोहोऱ्याचें पोटीस अथवा लिकर अमोनियांत फडकें भिजवून तें लावावें. व वर सांगितल्या प्रमाणें औषध देऊन त्याचें शरीर गरम राखावें. परंतु त्यास बिनवाऱ्याच्या कोठडींत नेऊं नये. त्या पेक्षा तो उघड्यावर राहिल्यास हरकत नाहीं.

दंश झालेला मनुष्य थकला असेल किंवा गळून गेला असेल तर त्यास चालीवयास न लावतां स्वस्थ पडूं द्यावें व त्यास मोहोऱ्यांचें पोटीस, व अमोनिया वगैरे औषधांच्या योगानें हुशारी आणावी. दंशास कांहीं वेळ झाला असेल व त्यावर विषाचा अमल दिसूं लागला असला तरी त्यास सदरहु प्रमाणेंच उपचार करावा. त्यापासूनच त्यास गुण येईल.

बहुतेक प्रसंगीं असें होतें कीं, भयानें मनुष्य गांगरून जातें व विषारी नाहीं अशा सर्पाचा किंवा ज्या सर्पाच्या अंगी फारसें विष राहिलें नसतें अशा सर्पाचा दंश असतो. अशा प्रकारचा दंश झाल्यास वर सांगितल्या प्रमाणें उपचार केला असतां व त्यास धीर दिला असतां मनुष्य लवकर हुशार होतो. दंश विषारी जरी असला तथापि त्यापासून मनुष्य जाया होण्यासारखें नसतें व या उपचारा पासून त्यास गुण येतो. दंश जबर विषारी असला तथापि या उपाया पेक्षा दुसरा उपाय जास्त गुणावह होणार आहे असें नाहीं. दंश झाला असता ज्या सर्पापासून झाला असेल त्यास तो सापडेल तर पकडावा व दंश झालेल्या मनुष्यास पोलीस चौकीवर न्यावें ह्मणजे त्यास तेथें उपाय केला जाईल.

ने. गो.

## कायद्याविषयींमाहिती

(ता० १८ मेच्याअंकावरून पुढें चालू)

मालमिळकतीचे शास्त्रः—मालमिळकत ह्मणजे स्थावर जंगम वस्तु हा परिपाठांतील अर्थ होय. स्थावर ह्मणजे काय व जंगम ह्मणजे काय हे अन्यस्थळीं वर्णिलें आहे यास्तव द्विरुक्ति करित नाहीं. मालमिळकत दोन प्रकारानी साध्य होते. स्वतःचे श्रमानें व वाडवडिलापासून. स्वतःचे श्रमानें मिळविलेली मालमिळकत इच्छेस येईल त्या रितीनें उपभोगण्याचा हक्क असतो व कांहीं प्रसंग खेरिज करून दुसऱ्यास देऊन टाकण्याचा अथवा विक्रय करण्याचा वगैरे अधिकार असतो. वाडवडिलापासून मिळालेली मिळकत जी असती ती एकट्याची नसती. तिजवर आपल्या बरोबरीचे दुसरे जे भागीदार असतात त्यांचा संबंध असतो. त्यांतही कित्येक संबंध सप्रतिबंध असतात व कित्येक अप्रतिबंध असतात. ज्या वेळेस सप्रतिबंध संबंध असतो त्या वेळेस अप्रतिबंध संबंध असतांना असणारे अधिकारांतून किंचित कमी अधिकार असतो. हे प्रकार मालमिळकतीचा व्यय करण्याचे झाले. आतां मालमिळकत स्वतः कशी मिळविता येती याचा विचार करूं. द्रव्याचे अंगी वृध्धी होणें हा एक गुण आहे व सृष्टीचा एक असा क्रम आहे कीं सर्वांनीं सारखे नसावे. त्याचप्रमाणें सृष्टीचे व्यापारास मनुष्यानीं हलन चलन ह्मणजे उठाठेव करणे याची गोडी जरूर आहे. ह्या तीन सिध्धांताचा परिणामच असा आहे की, एकास मिळकत मिळावी व दुसऱ्याची जावी. असें नसतें तर सृष्टी निर्माण होते वेळीं जे सधन होते ते सधन राहते व जे दारिद्री आहेत ते हा कालवर दरिद्रीच राहते. परंतु हाच हेतु सृष्टीकर्त्याचा असता तर मनुष्याचे अंगी जो स्वाभाविक गुण ईर्षा तो गुण त्यानें ठेविला नसता. किंवा दुसरी कल्पना करू. सृष्टी निर्माण करतांना परमेश्वरानें सर्वांनाच सारखे सुखी का केले नाहीं? त्याणें तसे केलें असतें तर हर्ष वाळगा, हव्यास करा. उन्हाळ्यांत घामानें स्नाने करा. नानाप्रकारचे धंदे करा यांची काय जरूरी असते अर्थात ही ईश्वराची चुकी झाली अथवा त्याणें फसविले असे कोणी ह्मणाल तर ईश्वरास तसा आरोप करण्यास काय बरें अडचण आहे. कांहीं दिसत नाहीं. परंतु तसे नव्हे. जर परमेश्वरानें ईर्षा असावी असें ठरविलें नसते तर जग आळशी होतें आणि सर्वच सारखे असते तर सृष्टीचा व्यापार एक दिवसही चालला नसता. सर्व जगच द्रव्यवान असतें तर त्याना नोकर मिळाले नसते आणि सर्व जग भिकारी झाले असते तर त्यांचे पोट भरले नसते. तात्पर्य ईश्वरी नियमानें जगाची जी रहाटी चालली आहे. त्याच रहाटीनें मिळविलेली मिळकत संरक्षण्यास योग्य आहे. ती संरक्षण करावी कशी या विषयीं ह्या शास्त्रांत सांगितले आहे. आणि अपकृत्य शास्त्रावर मी सांगत असतांना मिळकत संरक्षण्याविषयींचे प्राणिमात्रास कसे अधिकार असतात ते सांगितले आहे याजकरितां ते येथें सांगत नाहीं.

भागिदारीचे शास्त्रः—कित्येक धंदे असे असतात कीं ते एकठ्याच्याने चालत नाहींत. अश्या ठिकाणी अनेक मनुष्ये एकत्र जमून तो धंदा चालवितात. जर असा नियम नसता कीं ज्याचा त्यानें स्वतंत्र धंदा करावा दुसऱ्याशी मिळून करू नये तर चालेल असते काय? उत्तर हे आहे कीं चालले नसतें. तात्पर्य इतकेच कीं, ज्याचे त्यानी पोट भरले असते परंतु देशाचे वदतीस व्यापाराचे उत्कर्षास जे धंदे असण्याची अवश्यकता आहे तसे धंदे मुळीच उत्पन्न झाले नसते. तेव्हां हे उघड आहे कीं धंद्याचा असा एक वर्ग आहे कीं ज्या वर्गाचे धंदे एकट्याच्याने होणार नाहींत. अर्थात भागिदारीनें ते धंदे करणें भाग आहे आतां सांप्रतकाळी ज्या भागिदारी होतात त्या जरूरीच्याच धंद्यांत होतात असें नाहीं. मर्जीस येईल त्या व्यवहारांत भागीदारी होऊ शकते. व ती भागिदारी कशा रितीने चालवावी, भागीदारांचे हक परस्पराशी कसे आहेत अन्यस्थाशी कसे आहेत भागिदारांपैकीं एकानें केले कृत्याबद्दल इतर भागीदार कसे जबाबदार राहतात. त्रयस्ताशी एकानें केलेला करार सर्वांस कसा लागु होतो. भागीदारी मोडण्यास काय काय घडून आले पाहिजे वगैरे ह्या सर्व गोष्टींचा पूर्णपणें विचार ह्या शास्त्रांत केला आहे.

याचप्रमाणें ठेवीचे शास्त्रः— ठेव ह्मणजे काय ती ठेविल्यानें ठेऊन घेणारा व ठेवणारा यांत कसे हक्क उत्पन्न होतात. ती परत केव्हां करावी, न केल्यास काय जबाबदारी ठेव ठेवल्या वस्तूचा उपभोग घेण्यास ठेव ठेऊन घेणारास किती अधिकार आहे. अशा प्रकारें उपभोग घेत ह्यानें वस्तूंचे रूप बिघडले तर किती जबाबदारी उत्पन्न होणार, कोणती वस्तु ठेविली असतां उपभोग घ्यावा व कोणती वस्तु उपभोगांत आणू नये याचा ह्या शास्त्रांत विचार केला आहे व हे सर्व विचार विस्तारानें कळविण्याजोगे गूढ नाहींत.

उत्तरक्रियेचे शास्त्र—हें शास्त्र व्यवहारासी फार अल्प संबंध ठेविते कधी. कधी वारशाचा विचार करतांना क्रिया कोणी केली हे पाहणे जरूरीचें होतें. तथापि याचा विचार करण्याची व्यवहारात फार जरूर नाहीं ह्मणून लिहित नाहीं.

स्त्रीचा त्याग करण्याविषयींचें शास्त्र—ह्यात स्त्रीचे वागणुकीचे नियम, तशी ती न वागेल तर तिचा त्याग करण्याविषयीं नवऱ्यास अधिकार त्या अधिकारांतही प्रसंगाचे विचार व स्त्रीनें त्यापासून अलग होण्याचे हक्क व प्रसंग याचा विचार आहे.

दिवाणी व फौजदारी शास्त्र—हीं शास्त्रें रोज डोळ्यासमोर असणारीं ह्मणून सविस्तर वर्णन करणें कदाचित अप्रासंगिक होण्याची भीति आहे ह्मणून करित नाहीं मुख्यत्वें करून मनुष्यास जी नुकसानें होतात त्या नुकसानाचे दोन वर्ग आहेत दिवाणीचें नुकसान व फौजदारी नुकसान यास इंग्रजींत सिविल इंज्युरी व क्रिमिनल इंज्युरी असे ह्मणतात. सिविलइंज्युरीपासून बचाव करून घेणें हे ज्याचे त्याचे काम आहे व क्रिमिनलइंज्युरी झाल्यास ज्याचा त्यास तर हक्क आहेच परंतु कधी कधी राजास मध्यें पडून कोणास त्रास न होईल असें करण्याचा अधिकार असतो सिविलइंज्युरीहून क्रिमिनलइंज्युरीचें महत्व अधिक आहे. दिवाणीत कोणी बुडाल्यास किंवा न्यायाधिशाचे हयगईनें अन्याय झाल्यास कायद्यावरून न्यायाधिशास आपण होऊन हात घालण्याचा अधिकार नसतो. फौजदारींत तसे नाहीं अन्याय झाल्याचें व एखादा मनुष्य निष्कारणीक फसल्याचे दिसून येईल तर कित्येक न्यायाधिशास आपण होऊन हात घालून योग्य इनसाफ मिळवून देण्याची खटप
ण्याचा अधिकार असतो. फौजद
मांत एक महत्वाची गोष्ट ध्याना
ण्याजोगी ही आहे कीं निरपराधी
हे अपराधी सुटण्यापेक्षां फार वाईट
राधी सुटेल तर फिकीर नाहीं पण
राधी फसूं नये. ह्या तत्वावर अ
नियम आहे की, सर्वकाळ संशया
दा आरोपितास द्यावा व सर्वका
मान निरपराधाचे करावे. इतकेच
थे निरपराधीपणाचे व अपराधीपण
शीं दोन्ही अनुमानें होण्याजोगा पु
ल तेथें प्रथम निरपराधाचे अनुमान
पाहिजे. ह्या शास्त्राची विशेष
करणें बंद करितो.

वारसपणाचे शास्त्र— ह्यात
कसा वारसा मिळतो, यास ला
बाधक कोण कोणत्या गोष्टी
वारसा घेण्यास असमर्थता कधी
होते. स्वतः आपला हक्क देण्या
णास अधिकार आहे कीं नाहीं
विचार केले आहेत. व हे विचार
धर्मांचे शास्त्रांत निरनिराळे रीतींचे
आहेत. ते सर्वांस अवगत असता
न विशेष वेळ खर्च करीत नाहीं.

मृत्युपत्राचे शास्त्र—हिंदुशास्त्र
मृत्युपत्र करून देण्याचा हिंदू
अधिकार नव्हता; पण हल्लीं
मृत्युपत्रें कायदेशीर मानिलीं
मृतऋणानासही आपले मिळकतीं
काढून अधिक मिळकतीचे मृत्युपत्र
देण्याचा अधिकार नाहीं. मृत्युपत्र
काय याचा विचार करण्याची
राहिली नाहीं व त्याची अवश्यकत
कीं नाहीं यासविषयींही न्यायाधी
नीं अनेक प्रसंगीं केलेले निर्णय
स बहुत आहेत.

जामीनकीचे शास्त्र—कित्येक
त एक पक्षकाराचे बदला दुसरा
जामीन होऊं शकतो. जो
करार करूं शकतो तोच जामीन
शकतो. जामिनाचा हक्क ऋण
जामिनाचा हक्क धनकोशी धनकोचे
दारी जामिनाशी, धनकोस स्वतंत्र
णकोशी कशी असते या सर्व
विचार ज्यांत आहे त्यास जामीनकी
ह्मणजे नियम ह्मणतात. तसे
हल्लीं सरकारचे कायद्यानें प्रसिद्ध
ते सर्वांस अवगत आहेत ह्मणून
संपविण्याची परवानगी घेतो.

न्यायसभेंत बोलण्याचें शास्त्र–
ह्यांत उभय पक्षकारांस बोलण्या
हक्क आहेत व ते बोलण्याचे कसे
आहेत—पूर्वपक्षास खंडणार्थ उत्त
डून कांहीं बोलणें न झालें तर पू
मुद्दा स्थापित झाला असें केव्हां
या सर्व गोष्टींचा विचार ह्यात के

हीं नानाविधं शास्त्रें प्रत्येक
आहेत. कोठें संक्षेपानें आहे
सविस्तर आहेत. ज्या देशांत
वाढली तेथें शास्त्रें वाढलीं. जे
जशीची तशीच राहिली तेथें शा
चढती कळा आली नाहीं असें स

पुढें चालू.

हें पत्र अकोला एथें खंडेराव
फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा०

नोटिस—तानकी मर्द महादु तिडके
मुक्काम मौजे नांदुरा बुद्रुक तालुके मलका
पुर इजकडून माहादु वल्लद हरसिंग यांजक
डून देण्यात येते ऐसेजे तुम्ही तारीख ३
माहे जुलाई सन १८७३ इसवी नोटिस
दिली त्याचें उत्तर:—

दस्तऐवजांत लिहून दिल्याप्रमाणें तु
झा भाऊ रघु वाघ व तुझे गावांतले जाति
वाल्यानी माझी परिक्षा घेतली त्यांत मी
पास झालो. तूं कराराप्रमाणे माझे घरीं
आली पाहिजे असे तुला कळवितो कीं
जर तुला नोटिस पावल्यापासून १५ दिव
सांत न आल्यास तूं कबज्यात
यावी असे विषयीं सरकारमार्फत
तजवीज [illegible]

---

## नोटिस

नोटिस—कृष्णाजी वल्लद नारायणजी गुर
व आडनाव खिरसागर वस्ती लोणार तालुके
मेहकर यांस खालीं सही करणार इजकडून
देण्यात येते कीं तुझ्याशी माझें लग्न झा
ल्यादिवसापासून आजपर्यंत माझी आण
ने केली नाहीं आज सुमार लग्नास २०
वर्षे झालीं आहेत मी आपले आईबापाचे घ
रीं आहे मध्यंतरी पुष्कळ वेळा माझे बापा
नें नेण्याकरितां निरोप पाठविले परंतु त्या
जबद्दल काहींच मनावर घेतले नाहीं ह
ल्लीं मला अशी बातमी आहे कीं तुम्ही
जातिभ्रष्ट झाला करितां या नोटिशीनें
कळविते कीं तुम्ही जातिभ्रष्ट असल्यामु
ळें माझे उपयोगी नाहीं सबब मी आतां
दुसरा नवरा करिते तर तुमची हरकत
असल्यास १५ दिवसांचे आंत चार जा
तीचे पंचांसमोर जामीनें समज द्यावे. असा
पुरावा करून माझा सांभाळ करावा. नाहीं
तर सदरी लिहिल्याप्रमाणें मुदतीबाहेर
मी आपला गंधर्व करण्याची कायदेशीर
तजवीज करते कळावें तारीख १३
जुलाई सन १८७३ इसवी.

(सही) मंजाई गुरवीण वस्ती पातुर
नंदापूर निशाणी बांगडी.

अकोला व. स. छा. छा. प.

---

[illegible] पावल्यापासून १५
दिवसांत आंत मला तुझे घरीं घेऊन जा
ऊन ठगण्याविषयीं माझे भावाला लेख
करूनावा व वाळगावे. जर करितां या
नोटिशीप्रमाणें दिलेल्या मुदतींत तुझ्यानें
व्यवस्था झाल्यास ह्मणजे मला घरीं घे
ऊन न गेल्यास हीच फारकत समजून
दुसरा घरठाव करण्याची तजवीज करीन.
कळावे. तारिख ४ आगष्ट सन १८७३
इसवी.

(सही) पुंजी वल्लद विक्रम मल्हे इचा
भाऊ पांडु याची सही असे.

नोटिस—तानकी मर्द महादु तिडके मुक्काम मौजे नांदुरा बुद्रुक तालुके मलकापुर इजकडून महादु वल्लद हरसिंग यानकडून देण्यात येते ऐसेजे मला तारीख ३ माहे जुलाई सन १८७३ इसवी नोटिस दिली त्याचें उत्तर:—

दस्तऐवजात लिहून दिल्याप्रमाणें तुझा भाऊ रघु वाघ व तुझे गावांतले जाति वाल्यानी माझी परिक्षा घेतली त्यांत मी पास झालो. तूं करारापमाणें माझे घरीं आली पाहिजे असे तुला कळवितो कीं जर तुला नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत न आल्यास तूं कबज्यात यावी असे विषयीं सरकारमार्फत तजवीज करिता येईल. परंतु तूं भावाचे नादीं लागून तुझा संसार बुडवूं नको कारण तुझे भावाचे मनांत असे आहे कीं, तुला दुसरा घरठाव करून द्यावा व त्यांत आपण दोन तीनशें रुपये घ्यावे असा तो आपले मर्यादेवर आहे तर भलत्याचे छंदास न लागता आपले घरीं यावे तूं पंचांसमक्ष आला नाहींस म्हणोन जें तूं नोटिशींत लिहिले ते सर्व खोटे लिहिले आहे तुझा भाऊ रघु तुला पाट लावून देण्याचे कामास उत्तेजन देतो तो आपले मर्यादेवर आहे ही बुद्धी तुझी नाहीं पण ते घडले तर दोघेही गुन्ह्यात याल असे कायद्यावरून म होते कळावें ता० १ माहे अगष्ट सन १८७३ इसवी.

[ सही ] महादु वल्लद हरसिंग तिडके
कजबे इसापुर तालुके
खामगाव.

---

नोटिस—बेसगी राघो वल्लद हनोती खराटे राहणार मौजे हिवरें प्रगणे एदलाबाद तालुका भुसावळ जिल्हा खानदेश यास खालीं सही करणार पुंजी वल्लद विक्रम मन्हे राहणार झोडगे प्रगणे व तालुके मलकापुर जिल्हे बुलढाना इजकडून अशी नोटिस देण्यात येते कीं, तूं पाटा लग्नाची वरा आहेस. लग्न झाल्यास समारें १०-१२ वर्षें झालीं व कैपेस आज ७ वर्षें झालीं तर तूं मला नांदवीत नाहींस आणि मध्यंतरी तीन वर्षें झालीं तेव्हां तूं ...वज करून दिला कीं, मी वागवीतो त्यानंतर माझे भावाबरोबर मी तुझे घरी दोन वेळा आले होते परंतु तूं मला घ ठेवून अगर अलग ठेवूनही बाळगिलें नाहीं. यास्तव ही नोटिस दिली जाते कीं, नोटिस तुला पावल्यापासून १५ दिवसांत मला तुझे घरीं घेऊन जाऊन लागण्याविषयीं माझे भावाला लेख करून द्यावा व बाळगावे. जर करिता या नोटिशीप्रमाणें दिलेल्या मुदतींत तुझ्यानें व्यवस्था झाल्यास म्हणजे मला घरीं घेऊन न गेल्यास हीच फारकत समजून दुसरा घरठाव करण्याची तजवीज करीन. कळावे. तारिख ४ आगष्ट सन १८७३ इसवी.

(सही) पुंजी वल्लद विक्रम मन्हे इचा
भाऊ धांडु याची सही असे.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ अकोला, रविवार ता० २९ जून सन १८७३ इ० अंक २६

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | |
|---|---|
| | रु. |
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरनामे.

### खानदेशचे कलेक्टर सा० बांकडून.

जाहिरनामा—प्रगट करण्यांत येतो कीं खानदेश जिल्ह्यातील पश्चिम पटी चे गाव व खेड्यांत दारू आणि भांग गांजा विकण्याबद्दल हक्क तारीख ३० जुलई सन १८७३ रोजीं आणि नंतर धुळें एथें कलेक्टर साहेबांचे कचेरींत लिलावानें तारीख २६ जुलई सन. १८७३ पासून सुरू होणारे सालाबद्दल विकला जाईल. विक्रीच्या वेळीं शर्ती स मजाविण्यांत येतील.

लिलावांत जी बेरीज होईल त्या रक मेवर दरशेकडा १० रुपये प्रमाणें होईल तो आकार लिलावाचे वक्तीं अमानत ठेविला पाहिजे. जर लिलाव खानदेश चे कलेक्टर साहेब यांणीं कायम केले नाहीतर अमानत ठेवलेले रुपये परत मि ळतील तारीख ९ जून सन १८७३ इ०

J. Moore

असिस्टंट कलेक्टर

खानदेश.

### खानदेशचे कलेक्टर साहेब यांजकडून.

जाहिरनामा—सर्व लोकांस कळवि ण्याकरितां प्रगट करण्यांत येतो कीं, तारिख १६ माहे जुलई सन १८७३ इसवी पासून शुरू होणारे सालाबद्दल खानदेश जिल्ह्यांतील निरनिराळे रस्त्यावरील नाके दस्तुरी घेण्याबद्दलचे हक्काचा जाहिरलिला व तारिख ३० माहे जून सन १८७३ इसवी रोजीं आणि नंतर धुळें येथें कले क्टर साहेब यांचे कचेरींत होईल.

लिलावांत जी बेरीज होईल त्या रकमे वर लिलाव वक्तीं दर शेकडा दहा रुपये प्रमाणें होईल तो आकार अमानत ठेविला पाहिजे. जर लिलाव खानदेशचे कलेक्टर साहेब यांणीं कायम केले नाहीं तर अमानत ठेविलेले रुपये परत मिळती ल.

लिलावाचे शर्तीअन्वयें चालण्यास जामीन दिला पाहिजे विक्रीच्या वेळीं लिलावाच्या शर्ती समजाविण्यांत येतील. पूर्वीं शर्तीअन्वयें वर्तणूक न ठेवलेल्या मनुष्यानें ह्या लिलावास येण्याची जरूर नाहीं.

तारिख ९ माहे जून सन १८७३ इसवी.

J. Moore

असिस्टंट कलेक्टर,

खानदेश

## नवीन पुस्तक.

वऱ्हाड प्रांताची भुगोलविद्या.

हें पुस्तक मोडी लिपींत छापून खा लीं सही करणाराकडेस तयार आहे. किंमत दोन आणे दर प्रतीस. वीस प्रतीस चार आणे टपाल हशील पडेल. ज्या कोणास हें पुस्तक घेणें असेल त्या नीं पैसा पाठऊन दिल्यास त्याजकडेस पुस्तकें लवकर रवाना केलीं जातील. टिकिटें पाठविणें झाल्यास एक रुपया स एक आणा बटोळा पाठविला पाहि जे तारिख २२ माहे जून सन १८७३

चिमणाजी रघुनाथ पाठक

डिपुटी इन्स्पेक्टर शाळाकरील

उमरावती.

## नोटिस.

नोटिस—खंडू वल्लद महादाजी धनगर राहणार देगाव तालुके बाळापुर यास शिवाजी वल्लद इंद्राजी पाटिल मौजे वट वाडी बुद्रुक तालूके बाळापुर याजकडू न नोटिस देण्यांत एते कीं, तुह्माकडे पुरज्या बद्दल १२९ रुपये व शिवाय व्याज यावयाचे त्यास सुमार दीड वर्षें झालें. नागदिवाळीस देण्याचा करार होता त्याप्रमाणें तुह्मी रक्कम दिली नाहीं त्यावरून तुह्माला ही मुदाम नोटिस दि ली आहे तर नोटिस पोंचल्यापासून ए क महिन्याचे आंत आमच्या सर्व पैशा चा उलगडा करावा नाहींतर तुह्मांवर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चा सुद्धां सर्व रुपये भरून घेण्यांत येतील कळावें तारिख २९ माहे जून सन १८७३.

(सही) शिवाजी वल्लद इंद्राजी पाटिल

दस्तुर सखाराम हासाजी

गुमास्ते

नोटिस—गटाजी वल्लद बाबुजी ठाक रे कुणबी राहणार अकोट याजकडेस खा लीं सही करणार याजकडून देण्यांत ए ते कीं ऐतीजे नंदु वल्लद भिकाजी वारी ने मोडे वारी राहणार अकोट याचें शेत मौजे रामटेक एथील सरवेनंबर ६३ पैकीं एकर ४०३ आकार रुपये ७ चे हें त्याणीं आह्मांस फरोक्त करून खातें आमचे नांवें करून दिल्हें असोन. आह्मी तें वाहण्या स गेलों असतां तुम्ही आपले कबजांत असल्यामुळें आह्मांस हरकत करून वाहू देत नाहीं व तुमचे कबजांत कशा करि तां आहे. व तुम्हांपाशीं नंदु याचा दस्त ऐवज वगैरे काय आहे तो तुम्ही कळ वित नाहीं याकरितां तुम्हांस या नोटिशी नें कळविण्यांत येते कीं, तुम्ही या नो टिशीचे तारखे पासोन चार दिवसांत सदरहू नंबरचे शेत आम्हांस आमचे ता ब्यांत करून द्यावें नाहीं तर तुम्हांवर नुकसानी वगैरेची दिवाणी कोर्टांत फिर्याद क रून आम्ही आपले शेत घेऊं शिवाय या नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये तुम्हांपासोन भरून घेऊं शेताची लागवड वगैरे तुम्हीं कराल तर आम्ही तुम्हांस देणार नाहीं.

(सही) लक्ष्मण शिवराम देशमुख द

बडधा राहणार अकोट

दस्तुर खुद.

नोटिस—मौजे पिंपोर जहागीर परग णे राजूर तालूके मलकापूर येथील खालीं लिहिलेले लेहू लोकांस महागिरदार मौजे पिंपोर याजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मास जहागिरगावची शेतें साल मजकूर करीत न करण्याविषयीं नोटिसा पूर्वीं दिल्या आहेत व त्या देण्याचें कारण सदरहू शेतें जास्ती दरानें दुसरे लोक मागतीस लागत आहेत परंतु तुह्मी अद्याप पर्यंत शेतें सोडिलीं नाहींत व सोडण्याचा तुमचा हेतुही दिसत नाहीं याजकरितां पुनः ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पोंचतांच तुह्माकडे असलेलीं शेतें जहागिरीपैकीं एकदम खालीं करून खावींत ह्मणजे सोडून द्यावीं. असें न कराल तर ह्या सालाबद्दल तुह्मापासून हल्लीं आकारलेला सारा घेण्यांत येईल त्याचा तपशील—

| क्षेत्रांचे नाव. | बिघे | गु. आ. | ह. आ. |
|---|---|---|---|
| शाणा वल्लद रामा लुंगाडे | | | |
| १ ठिके मळी | २। | २॥ | ३॥। |
| १ ठिके अंबवाचें | २॥। | ३॥ | ६। |
| १ ठिके कुसाडी | १३॥। | १६ | २४ |
| १ ठिके धनगरी | ९। | १०॥ | १५॥। |
| १ ठिके दियाणीं | ७। | ८॥ | १२॥। |
| — | — | — | — |
| ५ | ३५ | ४१ | ६१॥ |
| शिना वल्लद दत्तु पाटील | | | |
| १ ठिके वडाचाले | ८। | १५ | २२॥ |
| १ ठिके चौफुला | ८। | १० | १५ |
| — | — | — | — |
| २ | १६॥ | २५ | ३७॥ |
| कमळा वल्लद दत्तु पाटिल | | | |
| १ ठिके वडाळी | १७०४ | २० | ३० |
| १ ठिके चौफुला | १००४ | ११॥ | १७०४ |
| १ ठिके लाडगी | ७०१२ | ९॥ | १४०४ |
| — | — | — | — |
| ३ | ३५०८ | ४१ | ६१॥ |
| मारुती वल्लद बाहदु डोमाडे | | | |
| १ ठिके बाभी | ९ | ११ | १६॥ |
| १ ठिके मळी | ११॥। | १४ | २१ |
| १ ठिके | ९। | ११ | १६॥ |
| — | — | — | — |
| ३ | ३० | ३६ | ५४ |
| गणपती वल्लद लक्ष्मण मानकर | | | |
| १ ठिके मळी | ९ | १३ | १९॥ |
| १ ठिके का. साहके | १३॥ | १४ | २१ |
| — | — | — | — |
| २ | २२॥ | २७ | ४०॥ |

सदर प्रमाणें शेत सालाबद्दल लीला तु ह्मास द्यावा लागेल यांत काहीं गजा स्त केला जाणार नाहीं कळावें तारिख १९ माहे जून सन १८७३ इसवी दस्तुर महमद इस्मायल अतोज

(सही) गिरकाजन आलीखा

जहागिरदार.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

गुडमार्निंग एडिटरराव, कसी काय हकीकत आहे? मी आपले दर्शनाक रितां पुन्हा लवकरच आलो ह्मणून रा ग तर नाहींना आला? महाराज राग येवो नाहीं तर काहीं होवो. मला तर आपले भेटीशिवाय एक घटकाही चैन पडत ना हीं. बरें इकडे जरा लक्ष देता काय. आमचे वणी तालुक्यास मि० सय्यद अब दुल अजीज हे तहशिलदार आल्यापासू न रयतेस महतसुख प्राप्त झालें आहे. सर कार कामीं दक्ष, लोकोपयोगी कृत्यास झ टणारे, गरीबाचे कनवाळू वगैरे अनेक गुणसंपन्न हे गृहस्थ आहेत. ह्यांस व णीस येऊन दोन वर्षेंही झालीं नाहींत. तरी ह्यांनीं वणीची फारच सुधारणा के ली असें ह्मणण्यास काहीं एक हरकत नाहीं. मी हा गाव सोडून फार दिवसां नीं ह्मणजे दोन वर्षांनीं वणीस गेल्यामुळें ते स्थळ पाहून मला तर भांबावून गेल्या सारखें झालें ही जागा महानसे शहरासा रखीच बनून गेली आहे. आलीकडे आ पले दयाळू हजरताचे मदतीचे वर्तमान ऐकून सर्व लोकांचीं मनें उदास होऊ न गेलीं आहेत असो याजबद्दल मी वणी स गेल्यापासून तिकडील हकीकत पद्य रूपानें येथें लिहितो. ती आपले सुंदर पत्राचे येत्या अंकीं उतरून घ्याल अशी पूर्ण आशा आहे.

आर्या

ह्या गावातें सोडुनि,

बहुत दिसांनीं वणीस मी गेलों ॥

स्थिति तेथिल पाहुनियां,

अतिशय मीं चकित मानसीं झालों ॥

साकी.

बाग बगीचे सडका पाहुन,

हर्ष मनाला वाटे ॥

पूर्व स्थितिशीं समता करितां,

अंतर सहस्र वाटे ॥ १ ॥

आर्या.

येथील तहशिली वरी,

सय्यद अबदुल अजीज हे असती ॥

ह्यांचें आगमनानें,

अतिमह सर्वत्र लोक दाखविती ॥ २ ॥

ह्याशी गेउनि येथें,
एक द्वाधिकाचे गात ना होती ॥
आतां नदलोर्की नी,
नार्ता आहे जना न माहे ती ॥ ३ ॥

साकी.

तहशीलींचे जागीं येथें,
कामदार बहु झाले ॥
कामें केलीं सर्वांनीं परि,
ह्याचे तुलने नाले ॥ २ ॥

श्लोक शार्दूलविक्रीडित.

झाले फार न दीन ह्या सुकुमार
गेऊनिया ह्या नगीं ॥
तों झाली बदली म्हणनि सगळे
दुःखीत आम्ही मनीं ॥
होवोनी निनवू प्रभो तुज आम्ही
आतां तरी एक दे ॥
संतोसून् मृशनिदास म्हणती
ना तो इथें येउ दे ॥ १ ॥

याप्रमाणें आमचे हलरताचे बदलीच्या वर्तमानें सर्व लोक दुःखी आहेत. परंतु उपाय काय; म्हणून ते दुःख मनातच ठेऊन, ग. रा. अंबादासपंत ताल्यातदारांचे तरी येथें दिकडे व्हावें म्हणून परमेश्वरास सर्व लोक प्रार्थना करीत आहेत. कारण केही गृहस्थ लोकसुधारणुकेचे कामीं झटणारे आहेत व लाचाचे मार्थी आहेत अशी जिकडे तिकडे ख्याती आहे. सरकारकार्यीं दक्षता किती आहे हें तर विहानगासच नको. गरीबर भोळा आणे कांहीं जास्त कष्टले तरी चिंतानाहीं. अस्तु पत्रकर्ते महाराज रामवूनका बरे कृपा असूद्या येतों आतां लोभवृद्धी शुक्लेंदुवत व्हावी हे विनंती.

एक मुशाफर
मुक्काम झाडगाव

## नोटिसा.

नोटिस—मानकी मर्द गोपाळा गुरव बस्ती तामगाव तालुके जळगाव इला गोपाळ वलद विठोबा गुरव राहणार काळ्याचे पिंपळगाव यांजकडून नोटिस दिली जाते जी तूं तारिख ७ जूनचे वऱ्हाडसमाचाराचे पुरवणीतून आम्हाला नोटिस दिली तिचें उत्तर असें:—

आम्ही तुला घराबाहेर काढून दिले नाहीं. तुझा बाप येऊन तुला घेऊन गेला. तूं आमचे घरीं येऊन जनाशिरस्त्याप्रमाणें राहिल्यास अन्नवस्त्राविषयीं आम्हांकडून कांहीं हरकत नाहीं. मी गांधर्वाची दुसरी एक बायको करणार हें खरें आहे व तशा कितीही केल्या तरी धर्मशास्त्राप्रमाणें पुरुषांना गोकळीक आहे पण त्यामुळें तुझी आम्हाला गरज नाहीं असें ठरत नाहीं. व तूं माझे जवळ येऊन राहिली असतां तुझें जिणे व्यर्थ कसें होणार तें समजत नाहीं. अस्तु तुला कळवितोंकीं तुला अन्नवस्त्राची व नवऱ्याजवळ राहण्याची जरूरी असल्यास ही नोटिस पोहचतांच तूं आमचे घरीं निघून यावे नाहीं तर माझे कमाईचा छोट चिठ्ठी कधींही मिळणार नाहीं. व नाराचे घरीं राहिलीस तर अन्न वस्त्र मिळणार नाहीं. तू बा ईट रीतीनें बागलीस तर पुढ्या परवानिशी पकडून तुजवर खटला करूं. कळावें तारिख २७ माहे जून सन १८७३ इ०

(सही) गोपाळा वलद विठोबा गुरव याचे हातची निशाणी

नोटिस—शंकरदास दामोदरदास गुजराथी मुक्काम उमरावती सराफ आळी यास भाई मनुलाल किसनदास यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, हरीदास वलद किसनदास गुजराथी याणें तुमचेपाशी संवत् १९२८ सालांत सोने, गोफ सोन्याचा व पाटल्या सोन्याच्या तुह्मापाशीं ठेविल्या आहेत तर आमचा एकंदर हिशोबाचा निकाल झाल्याशिवाय त्याजला कांहीं एक डाग देऊं नये. दिलीं असतां सरकारमार्फत तुह्मावर तजवीज करूं याजकरितां तुह्मास नोटिस दिली आहे. तारिख २७ माहे जून सन १८७३ इसवी.

(सही) मनुलाल किसनदास दस्तुर खुद.

नोटिस—हरीदास वलद किसनदास गुजराथी राहणार उमरावती ठिकाण बिसनदास मनुलाल याचे दुकान यास मनुलाल किसनदास यांजकडून नोटिस देण्यात येते कीं, तुह्मी बिसनदास मनुलाल याचे दुकानचे नावानें वहिवाट केली. तर तुमचे कडे बाकी रुपये ३००० अक्षरी तीन हजार सुमार निघत आहे. शिवाय व्याज, लोकाकडे घेणें व मालाटालाची झडती वगैरे मोहजना आठ रोजांचे आंत समजून दिला पाहिजे. याजकरितां तुह्मास ही नोटिस दिली आहे. जर तुह्मी याप्रमाणें केलें नाहीं तर कायद्याप्रमाणे आपल्यावर खटला केला जाईल. ही नोटिस आह्मी लिहून दिली आहे. तारिख २७ माहे जून सन १८७३ इसवी.

(सही) मनुलाल किसनदास दस्तुर खुद.

नोटिस टिकाराम पांडे हल्लीं वस्ती उमरावती ठिकाणा बिसनदास मनुलाल यांचे दुकान यास मनुलाल किसनदास यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी बिसनदास मनुलाल याचे दुकानची वहिवाट केली तर तुमचेकडे बाकी रुपये २९००चे सुमार व शिवाय व्याज निघत आहे. व लोकाकडे बाकी घेणें व देणें आणि मालाची झडती वगैरे मोजना आठ दिवसाचे आंत आम्हास समजून दिला पाहिजे जर करितां तुह्मी हिशोब वगैरे समजून दिला नाहीं तर तुह्मावर फिर्याद कायद्याप्रमाणे केली जाईल कळावें तारिख २७ माहे जून सन १८७३ इसवी.

(सही) मनुलाल किसनदास दस्तुर खुद.

## जाहिरखबर.

सर्व लोकास कळविण्याकरितां असें जाहिर केलें जातें कीं उमरावती येथें बिसनदास मनुलाल या नावाची दुकान आहे व तिची वहिवाट हरीदास वलद किसनदास गुजराथि व टिकाराम पांडे हे कांहीं दिवस करित होते. त्याची वहिवाट हाली बंद केली आहे. सबब सदरहु दोन इसमाचे नावानें यापुढे कोणी बिसनदास दुकानची घेवदेव करूं नये. केली असतां ती आह्मांस मंजूर होणार नाहीं. कळावें तारिख २७ माहे जून सन १८७३.

(सही) मनुलाल किसनदास दस्तुर खुद

# वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ शुद्ध ५ शके १७९५.

## म्युनिसिप्यालिटीच्या करापासून कोणाला वगळावें?

वऱ्हाडांत पोलिसपट्टी म्हणून एक कर आहे तो सर्वांस माहित आहेच. ज्या गांवीं म्युनिसिपल कमिट्या आहेत तेथें या कराचा वसूल त्या कमिट्यांकडे देतात म्हणून त्या गांवीं या कराला म्युनिसिपल कर असें नांव आहे. हा कर रयतेच्या उत्पन्नावर सरासरी शेकडा दोन रुपये किंवा तीन रुपये या मानानें बसविलेला असतो व या कराचे देण्यांत सरकारि नोकर लोकांचा आजपर्यंत समावेश नव्हता जे इनकमट्याक्स देणार आहेत त्यांपासून म्युनिसिपल ट्याक्स घेऊं नये असा रेसिडेंट साहेबांचा हुकूम होता. त्यावरून त्या लोकांस त्या कराची मनायी होती परंतु सालमजकुरीं इनकम ट्याक्स बंद झाला म्हणून सरकारि नोकर लोकांपासून हा कर घ्यावा असा ठराव झाला आहे; व त्याप्रमाणे कर वसूल करण्याची तजवीज होणार आहे.

सरकारि नोकरापासून जो कर घ्यावयाचा तो वर्षास अडीचशे रुपयाहून ज्याला अधिक प्राप्ती आहे त्यापासून शेकडा १ रुपया या मानानें घ्यावा असा ठराव झाला आहे. आणि जर असें आहे तर सरकारि नोकराव्यतिरिक्त जे सराफ, साहु, वकील, तेली, माळी, कोष्टी, यांजपासूनच दोन किंवा तीन रुपये शेकडा कर कां घ्यावा? व २५० रु. चे आंत यांना ही माफी कां देऊं नये? तें आह्माला कळत नाहीं. सरकारि मोठ्या नोकरांना जर एक रुपया शेकडा कर आहे, तर गरीब रयत लोकांना त्याहूनही कमी असावा. निदान त्याहून अधिक असणें गैर आहे असें आह्मांस वाटतें. सबब रेसिडेंट साहेब या गोष्टीचा विचार करून पुढील वर्षीं तरी सर्वांस सारखा कर कारतील असें आह्मी इच्छितो. गरीगुरीब हलक्या धंद्याचे लोकांतही या कर देणारांत ओढून घेऊन एक रुपया, दोन रुपये, अशा पट्टी लाऊन त्यांपासून निघेल तेवढी रकम घेऊन फुगेल तेवढी यादी फुगवितात. आपल्या अकोल्याच्या म्युनीसिपल कराची यादी पाहिली असतां तींत एक रुपया कर देणारे लोक सुमारे दीडशें व दोन रुपये देणारे शें दीडशें सांपडतील. या लोकांस कर अगदीं माफ झाला पाहिजे. एवढेच नाहीं तर पांच, व सहा रुपये देणारांसही माफी पाहिजे. कारण त्यांचे उत्पन्नावर दोन किंवा तीन रुपये शेकडा धरला असता तर ते २५० रुपयांचे आंतील प्राप्तीवाले म्हणून माफीनें सदरांत येतील असें आह्मास वाटतें. श्रीमंतांना दोन रुपये शेकडाही देण्यास जड वाटणार नाहीं; परंतु गरीब एक रुपया शेकडा देण्यासही तळतळत असतील यांत संशय नाहीं.

या कराच्या संबंधानें दुसरी एक गोष्ट आम्हाला लिहित आहे तिजविषयीं हो दोन शब्द बोलतो. ती गोष्ट अशी—सरकारी नोकर लोकांच्या म्युनिसिपल कराच्या ठरावाच्या प्रकरणांत असें ठरलें आहे कीं. जे लोक म्युनिसिपल हद्दींत राहतात त्यांना मात्र हा कर लागू आहे इतरांस नाहीं. ही गोष्ट इतर ठिकाणीं ठीकच आहे म्हणजे जे लोक कमिटीच्या हद्दींत असतील तेच कमिटीच्या खर्चाचा, सफाईचा, व सुधारणेचा उपभोग घेतील तेव्हां त्यांनींच तो कर द्यावा, बाजारच्या खेडेगांवांनीं कां द्यावा? देऊ नये म्हणून तसा ठराव करणे रास्त आहे पण हुजूर म्हणजे जिल्ह्याच्या सदर स्टेशनाच्या गांवीं म्युनसिपल कमिटीच्या हद्दींत राहणारे लोक पुरताच कराचा ठराव असू नये. कारण जेथें जेथें साहेब लोकांची वस्ती असते तेथें तेथें ती गावाच्या बाहेर दूर कमिटीची हद्द सोडून असते म्हणून हद्दी पुरता ठराव केल्यानें बहुतेक सर्व साहेबलोक कराचे अकारणींतून सुटले जातात. तसें होणें वाजवी नाहीं, साहेबलोक कमिटीच्या हद्दीच्या बाहेर राहतात म्हणून ते कमिटीच्या खर्चाच्या कामाचा उपभोग घेत नाहींत असें नाहीं. आम्हाला वाटतें कीं आणाभर जास्ती घेत असावेत. त्यांच्या बाजूच्या सडका गावापेक्षां सुरेख आहेत. त्या गावापेक्षां अधिक काळजीनें झाडल्या जातात. गावांत जर कचरा असेल तर साहेबलोक गावांत येणार असें कळतांच तो अधिक जलदीनें निघाला जातो. गावकऱ्याला पादचारी चालावयास, किंवा आपल्या आवड धोंवड सारवरांतून जावयास चांगल्या सडकेची जितकी अवश्यकता आहे त्याहून साहेब लोकांच्या सुंदर, नाजुक, कमानीच्या, व घोड्यांच्या गाडीस उत्तम सडकाची अधिक अवश्यकता आहे. गावांत सडकांवर मुरूम, रेती न घातली तर वर्षेंच्या वर्षें चालतें जातें पण छावणीकडील सडकांवर तसें करण्यास कोणास यत्किंचितही धैर्य होत नाहीं. ह्या सर्व कशाचा परिणाम म्हणाल तर कमिटीनें गावचाऱ्यापेक्षां युरोपियन लोकांचे सोयी साठीं अधिक जपण्याचा परिणाम होय. आणि असें आहे तर त्या युरोपियन लोकांकडून त्या कमिटीला कांहींच मिळूं नये ही कमिटीची बूड नव्हे काय? युरोपियन लोक म्युनीसिपल हद्दीच्या बाहेर राहता

त म्हणून काय झालें? उलटें अधिक त्रास कारण झालें. कारण जेथपर्यंत लोकांची वस्ती असते तेथपर्यंत सडका त्यांच्या लागतात, एवढेंच नव्हे. प्रत्येक बंगल्या बंगल्यालाही छोटी मोठी सडक आढळते. तेव्हां त्यां करितां त्यांनीं म्युनिसिपल कर कां देऊं नये? कोणी म्हणेल कीं, छावणींतील सडका म्युनिसिपालिटीच्या खर्चानें झालेल्या नाहींत, लोकल फंडाकडून झालेल्या आहेत सबब त्यांत कमिटीचा संबंध नाहीं म्हणून त्यांनीं कमिटीला कर देऊं नये हें बाजवी आहे. पण थोडा अधिक विचार केला तर हें अधिक वाईट दिसतें. म्हणजे कर न देणाराकरितां स्वतंत्र आणि चांगल्या सडका इतर फंडांतून सरकार पुरवितें आणि कर देणाऱ्याही इतर लोकांस तशी चांगली सोय होत नाहीं, असें करणें म्हणजे सरकारास दोष लावणें आहे सबब तें बरोबर नाहीं. अस्तु छावणीकरितां दुसरी म्युनिसिपालिटी जर नाहीं तर छावणींतील लोकांवर म्युनिसिपल कर बसवून त्याचा पैसा गावच्या कमिटीकडे द्यावा. किंवा तसें करणें ठराव विरुद्ध होत असेलतर म्युनिसिपल कर ह्मणजे पोलिसपट्टी तीतर सर्व गांवीं व सर्व ठिकाणीं घ्यावयास योग्य आहे म्हणून छावणींतील लोकां पासून पोलिसपट्टी ते कमिटीच्या हद्दीत नाहींत ह्मणून तालुक्याच्या तहशीलदाराकडून इतर गावाप्रमाणें वसूल करवित जावी व ती त्या गावच्या म्युनिसिपालिटीकडे देत जावी असा ठराव झाला तर फार चांगलें. सारांश हलके सालके नोटिस करावे आकारणीत गोवले जावे व मोठ मोठ्या पगाराचे युरोपियन त्यांतून वगळावे हें रास्त नाहीं असें आम्हास वाटतें.

## वऱ्हाडांत वक्तृत्वास उत्तेजन मिळावें.

एकेक काळीं एकेक विद्येच्या पाठीस लागण्याचा हंगाम येत असतो. वक्तृत्व ह्मणजे अस्खलित उत्तम भाषण करणें या विद्येची आपले देशांत तूर्त उणीव आहे म्हणून ती साध्य करण्याचे लटपटीस लोक लागले आहेत हें पाहून संतोष वाटतो. मुंबईस ५—६ वर्षांमागें प्रथम वक्तृत्वोत्तेजक सभा झाली तींत लोकांनीं वर्गणी करून पैसे जमविले व चांगलें भाषण करणारे उमेदवार जमवून त्यांत पसंत ठरलेल्यास बक्षिसें दिलीं व वर्षास देण्याचा क्रम चालविला. तो बरा आहे असें पाहून पुण्यांत दुसरी वक्तृत्वोत्तेजक मंडळी स्थापन झाली तिलाही तीन वर्षें होऊन, गेली तिची पैशाविषयींची वगैरे व्यवस्था मुंबईपेक्षा चांगली चालली. हें पाहून बेळगाव, नगर, व कोल्हापूर या ठिकाणींही छोट्या छोट्या भाषणसंबंधीं मंडळ्या उपस्थित झाल्या. आतां हें खरें आहे कीं, त्यांस मुंबई पुण्याप्रमाणें तेजी नाहीं. ती असेल कोठून? बोलून चालून त्या लहान आहेत व त्यांच्या निवडणुका लहान व पैशाचा संचय व देणगीही लहान त्या मानानें त्या बऱ्या आहेत. व त्याप्रमाणें कांहीं तरी उपयोगी पडतील यांत संशय नाहीं. आमची इच्छा आहे कीं वऱ्हाडांत देखील एखादी अशी भाषणोत्तेजक वार्षिक सभा कमिटीच्या परीक्षेच्या सुमारास निघावी. विद्याखात्याचे डायरेक्टर मि० क्वांडी साहेब हें काम मनावर घेतील तर सरकारी पैशांतून बक्षिसाकरितां सवड काढितील व तसे होण्याकरितां आमचे अकोल्याचे पुढारी लोक खटपट करितील. व त्याचे भरतीकरितां आणखी आपले प्रयत्नानें वर्गणी जमवून या कामाची सुरवात करितील तर फार चांगलें होईल. एक वेळ सुरवात झाली म्हणजे पुढें नवीस फारशी नड येणार नाहीं. चांगलें बोलता येणें हा एक उत्तम गुणापैकीं गुण आहे व तो देशसुधारणुकेस फार अवश्य आहे सबब विद्वान् लोकांचे व विद्यार्थ्यांचे हा गुण वाढविण्याकडे लक्ष लागावें असें आम्हीं इच्छितो.

## वऱ्हाड

छावणीची खबर—मेजर जे. डी. वेल साहेब रजेवर गेले होते ते गुदस्त सालीं नोवेंबर महिन्याचे आरंभास वऱ्हाडांत परत आले व अकोल्यास डिपुटी कमिशनरचे कामावर रुजू झाले होते त्यास आठ महिने झाले. आतां त्या संबंधानें ज्या ज्या कामदारांच्या बदल्या झाल्या त्यां विषयीं रेसिडेंट साहेबांनीं हिंदुस्थान सरकारास लिहिलें त्यांनीं एप्रिल महिन्याचे पंचवीसावे तारखेस त्या विषयीं हुकूम लिहिला व तो जून महिन्याच्या ९ व्या तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्ये छापून प्रसिद्ध झाला व रेसिडेन्सी आर्डर छापण्याच्या तारखेपासून सुमार १९ दिवसांनीं वऱ्हाडांत पोचत असते. तेव्हां ही बातमीची खबर किती विलक्षण आहे ती पहावी.

—०००—

यवतमाळ जिल्ह्यांतील वणीचे तहशिलदार मि० अबदुल अजीज यांस तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली.

—०००—

मेजर एच. सी. गेंजित वऱ्हाडांतील रजिष्टरखात्याचे इन्स्पेक्टर जनरल व उमरावतीचे स्माल काज कोर्टाचे जडज यांस ६ महिन्यांची फर्लोरजा मिळाली.

—०००—

रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण भट एकाट्रा असिस्टंट कमिशनर हैदराबादेहून गेल्या मंगळवारीं उमरावतीस आले.

—०००—

चिखलीचे नायब तहशिलदार रा. सदाशिव भास्कर यांस १०० रुपये पर्यंत दिवाणी दावे चालविण्याचा तीन महिने पावेतों अधिकार मिळाला आहे.

—०००—

रा. रा. रामराव गोविंद एकाट्रा असिस्टंट कमिशनर यांस एक महिन्याची हक्काची रजा मिळाली आहे.

—०००—

मेजर सी. जेनिसन साहेब अकोल्याचे पोलिस सुपरइंटेंडेंट यांस ६ महिन्यांची रजा मिळाली होती पण ते या आठवड्यांत परत आले.

—०००—

अकोला हाय स्कुलांतील मुलांनीं कालचे शनिवारचे मागील शनिवारीं मिडल क्लास स्कुलांत नाटक केलें. त्यांत सवाई माधवराव व अफजुलखानाचा मृत्यु असे दोन खेळ झाले. कित्येक मुलांनीं आपलीं कामें चांगलीं केलीं व एकंदरींत नाटक बरें झालें. मुलांस मि० क्वांडी साहेब डायरेक्टर यांनीं चांगलें सहाय दिलें. त्यामुळें युरोपियन स्त्रिया व पुरुषही नाटक पहावयास पुष्कळ आले होते. एप्रिल महिन्यांत या मुलांनीं नाटक केलें होतें व दोन महिने झाले नाहींत तों हें दुसरें केलें. अशीं प्राकृत नाटकें, अशा गानीं, व अशा मुलांकडून इतक्या लवकर होत जातील तर तें चांगलें नाहीं असें लोक ह्मणतात यास आम्ही कळवितों कीं, आतां नाटक करण्याचा या मुलांचा बेत नाहीं.

—०००—

कमिशनर साहेब उमरावतीस गेले होते ते गेल्या रविवारीं परत आले.

—०००—

उमरावतीच्या डिपुटि कमिशनर आफिसांतील डिपुटि क्लार्क रा. व्यंकटेश मार्तंड यांस बरतर्फ केलें व त्यांची जागा रा. गिरिराव रामचंद्र (आमचे एथील डिपुटि क्लार्कचे बंधू) यांस मिळाली व यांची ५० रुपयांची जागा रा. यादव अनंत यांस मिळाली. व्यंकटराव यांनीं कर्जही बरेंच केलें होतें व असा प्रसंग आला पाहून त्यांनीं पोबारा केला असें समजतें.

—०००—

इलिचपुरच्या मिडलक्लास स्कुलांत मुलास कसरती शिकविण्याकरितां सामान घेण्यात १०४ रुपयांचें सांगशन डायरेक्टर साहेबांनीं दिलें असें कळतें.

—०००—

अकोल्यास गुडघेमोडी तापाचा आजार सुरू झाला आहे व तेणेंकरून बहुत लोक आजारी आहेत. कांहीं कांहीं घरीं त्या घरचीं सर्वच मनुष्यें आजारीं झालीं आहेत हें पाहून वाईट वाटतें. या तापाला तीन दिवस मोठा भर असतो व शरिराच्या सर्व भागांतील सांधे दुखतात यावर औषध कांहीं घेऊं नये म्हणजे चवथें दिवसापासून आजार कमी होऊं लागतो असें म्हणतात.

—०००—

पर्जन्यानें या सालीं बरेच ओढून धरिलें आहे. मृग गेला, आर्द्रा चालल्या अजून चांगला पर्जन्य पडून पेरण्या होत नाहींत तेणेंकरून शेतकरी लोकांत दिलगिरी उत्पन्न होऊं लागली आहे. आसपास काल परवा चांगला पाऊस पडल्याचे ऐकण्यांत आलें आहे.

## वर्तमानसार

रा. सत्येंद्रनाथ टागोर यांस अहमदाबादास सिनियर असिस्टंट जडज नेमिलें.

रामपुरच्या राजाच्या शिक्क्याचीं नाणीं लाहोरांत लोकांचे प्रचारांत आलीं आहेत. व व्यापारी लोकही निःशंकपणें तीं वापरतात असें अवध अकबार पत्रावरून समजतें.

इराणचे शहा विलायतेस गेले आहेत त्यांना ग्रीनविच येथें २९ वे तारखेस मेजवानी झाली, ७०० लोक बरोबर व प्रिन्स आफ वेल्स हे आपल्या पत्नी सहवर्तमान त्यां बरोबर होते.

स्काटलंडांत एडिंबरो येथें हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणाचे बाबतींत सभा भरली होती तींत रेवरेंड नारायण शेषाद्री यांनीं उत्तम व्याख्यान दिलें.

बंगाल्यांतील बाबु रोमेश चंद्रदत्त हे सिव्हिल सरव्हिस आहेत व त्यांनीं आपले धाकटे बंधु अविनाश चंद्र दत्त यांस सिव्हिल सरव्हिसच्या परिक्षे करितां पाठविलें आहे. हे ऐकून आम्हास आनंद वाटतो.

जर्मन देशाचे एंपरर आजारी आहेत व ते राज्यकारभार आपले पुत्राकडे सोंपविणार असें वर्तमान आहे.

गुजराथेंत लुटी फार होऊं लागल्या डिसापासून ३ कोसावर १०० मारवाडी लोकांना दरोडेखोरांनीं लुटलें व त्यास जखमा केल्या. व त्यांच्या बरोबरचे ५।६ रामोशी ठार मारिले.

नागपुरचे तुरुंगातील इन्स्पेक्टर जनरल, पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल, व कस्टमचे कलेक्टर यांस कमी करणार असें वर्तमान आहे.

मुंबई इलाख्यांत शाळा खात्याकडे सरक्युलर झालें आहे कीं हरकसलें बुक डायरेक्टर साहेबांचे परवानगी वाचून मास्तर लोकांनीं उपयोगांत आणू नये.

तुर्कस्थानांत सन १८४३ सालीं ख्रिस्ती धर्माचे प्रसारास मोठ्या अडचणी होत्या. दोन मनुष्यांनीं ख्रिस्तीधर्म घेतला म्हणून राजानें त्यांचा शिरच्छेद केला. आतां तेथें अशा प्रकारच्या अडचणी कांहीं राहिल्या नाहींत.

आगगाड्यांचीही कामें तुर्कस्थानांत बरीच चालू आहेत.

अजमिरास लार्ड मेयो साहेबांचे स्मरणार्थ मोठें टोलेजंग कालेज बांधण्याचा विचार झाला होता त्याचें काम सुरू करण्यास परवानगी मिळाली. या कामाला तीन वर्षें लागतील.

डा० लिविंगस्टन यांना ३००० रुपये पेनशन देण्याचें महाराणी साहेबांनीं मंजुर केलें.

पारशी जात्यभिमान व औदार्य—मि. आर्देसर होर्मसजी वाडिया यांनीं आपले प्रत्येक खोलीस दरमहा पांच रु. भाडे येणारें अशा चारशें खोल्यांची कुरल्याची चाळ गरीब पारशी लोकांस राहावयास दिली. तसेच मि. दिनशा माणकजी पेटिट यांनीं माणकजी पेटिट सुताच्या व विणण्याच्या कारखान्यांत तेथील माहिती करून देण्याच्या उद्देशानें शंभर पारशी ठेविले आहेत; व त्यांच्या निर्वाहाचा सर्व खर्च चालविण्याचें आपण पतकरलें आहे.

अमदाबाद येथील दप्तरदाराची जागा कमी केली असें नां. ग्या. वरून कळतें.

मि० श्रीपाद बाबाजी ठाकूर सुरतचे सुपर्न्यु. असि. कले. यांनीं गेल्या मंगळवारच्या पाठीमागल्या मंगळवारीं तेथील हुजूर ट्रेनगीचा चार्ज घेतला.

मुसलमान लोकांच्या शिक्षणास उत्तेजन —मुसलमान लोकांच्या शिकण्याविषयीं सर्व इलाखयांतून रिपोर्ट जाऊन हिंदुस्थान सरकारानें नवीन विशेष व्यवस्था करण्याचें ठरविलें असें समजतें; पारशी व आर्बी भाषा शिकण्यास व साधारण व ऐहिक विषयासंबंधी ग्रंथ होण्यास उत्तेजन देण्याचे सरकारांनें मनांत आणिले आहे. पारशी व आर्बी भाषा शिकविण्याकरिता मुंबई युनिवार्सिटीचा प्रोफेसर नेमण्याचा विचार आहे. कलकत्ता व हुगळी येथील मद्रिसामध्ये नवीन व्यवस्था व्हावयाची आहे. बंगाल विद्यालयाकडच्या नेमणुकेंत पन्नास हजार रु. अधिक वाढविले असें पायनियरवरून कळतें. इं. प.

सुरतेचेवक्षी साहेब यांची बहिण फातिमाबिबी मरण पावली. हिस इंग्रज सरकाराकडून पेनशन ६०० रुपये होतें. ईस कोणी वारिस नसल्यामुळें ६००० रुपये रोख व १६००० हजारांचे दागिणे सरकारांत गेले.

नवानगरच्या राजाच्या मुलाच्या विद्याभ्यासाकरिता शिक्षक क्यापटन मट गावाचे कोणी मिलिटरी गृहस्थ नेमले आहेत नेटिव बी. ए., एम. ए. चा दुष्काळ होता काय!

हिऱ्याची खाण—दिल्ली ग्याझेट पत्रावरून कळतें कीं, जयपुर संस्थानांत एका नेटिव वैद्यास हिऱ्याची खाण सापडली आहे. सरकारातून बक्षीस मिळालें म्हणजे खाण कोठें आहे हें प्रसिद्ध करणार. ने. ओ.

धुळें आमचे समजण्यांत असें आलें आहे कीं, मे० एन्टी साहेब हुजूर डे०कलेक्टर व राव बहादूर शंकर पांडुरंग पंडित डिस्ट्रिक्ट डे० कलेक्टर यांच्या स्वाऱ्या आठ महिनेपावेतों सुरतेस जाणार.

रा. रा. शंकर कृष्ण यांणीं पुनः एक महिन्याची रजा घेतली:—रा. ब. भिकाजी रामचंद्र ड० हे बरे होऊन तारीख १७ पासून काम पाहू लागले.

कैदी शहरांत झाडण्याच्या कामीं लाविले आहेत पूर्वीपेक्षां स्वच्छता आणि सफाई अधिक असते. खा. वै.

नाशिक—निफाडचे मामलेदार रा. रा. रावजी धोंडदेव हे ता. १९ मिनहूस ठाण्याहून येथें आले आहेत. हे हल्लीं निफाडचे बाबतींत सस्पेंड तर आहेतच परंतु पुढेंही परिणाम काय होतो हें समजत नाहीं. विचाराअंतीं यांचा परिणाम शुद्ध होणे हाच न्याय होय. ना. वृ

अहंमदनगर सिटीस्कुलावर नवीन आलेले हेडमास्तर मि० गोविंद केशव सावंदे यांणीं आपले कामाचा चार्ज घेतला व हेस्कु० हेडमास्तर ६ महिन्यांचे रजेवर गेले. न्या. सि.

## अद्वैत मत.

या मताचा प्रचार बहुतेक सर्व हिंदुस्थानांत आहे. बौद्ध व जैन धर्मानें प्राबल्य झाल्यामुळें हें मत फारच क्षीण झालेलें पाहून याचा शंकराचार्य नामक एका महा प्रतापि ब्राह्मणानें पुनरोद्धार केला. शंकराचार्य यांस त्याच्या मताचे अनुयायी शिवाचा अवतार असें मानितात.

सांप्रत ज्यास आपण कानडा व मलबार म्हणतों याप्रांतीं प्राचीनकाळीं करेल असें नांव होतें त्या काळें देशांत नंबुरी जातीचे ब्राह्मण राहतात; त्यांपैकीं एका ब्राह्मणाचे पोटीं शंकराचार्य उत्पन्न झाले. ते कधीं उत्पन्न झाले याविषयीं निळकंठ भट्ट कृत शंकरमंदार सौरभनामक ग्रंथांत लिहिलें आहे कीं:—

प्रसूततिष्यशरदांअतियातवत्या
एकादशाधिकशतोनचतुःसहस्राम॥

याला प्रत्यंतर सांप्रदायप्रदाप नामक ग्रथांत आढळतें तें असें:—

तिथिनागेभवन्ह्यद्दैविभवेमासिमाधवे
शुक्लेतिथौदशम्यांतुशंकरार्योदयःस्मृतः॥

शंकराचार्य यांचा बाप त्यांचे लहानपणींच वारला; परंतु त्याचे आईनें त्याचें फारच काळजीनें संगोपन केलें. शंकराच्यार्यानें लहानपणींच संन्यास घेतला व दिग्विजयासाठीं काशीपासून रामेश्वरपर्यंत त्यानें पर्यटन केलें. या पर्यटनामध्यें त्यानें अनेक मतवाद्यांचे पराजय करून अद्वैत मताची स्थापना केली. त्याची एक वेळ मंडनमिश्र नामक एका प्रसिद्ध कर्ममार्ग वाद्याची गाठ पडली त्यामध्यें जे संभाषण झालें त्याचा थोडासा मासला दाखवितों:—

मंडन मिश्र शंकराच्यार्य यांस म्हणाला.

कंथांवहासिदुर्बुद्धेरासभेनांपदुर्वहाम्,
शिखायज्ञोपवीताभ्यांकिंतेभारोभविष्यति॥

या वरून मंडनमिश्र हा संन्यासाश्रम घेणें हें बरोबर नव्हे असें प्रतिपादन करणार होता हें उघड दिसतें.

त्यावर शंकराच्यार्य यांनीं त्यास उत्तर दिलें कीं:—

कंथांवहामिदुर्बुद्धेतवपित्रापिदुर्वहाम्,
शिखायज्ञोपवीताभ्यांश्रुतेर्भारोभविष्यति॥

या वरून त्या वेळचे शास्त्री वादविवाद करण्याचे कामांत सांप्रतच्या शास्त्री लोकांपेक्षां विशेष चांगले होते असे अनुमान करवत नाहीं. असो शेवटीं शंकराच्यार्यानें मंडनमिश्राची खात्री करून दिली कीं, कर्मानें मोक्ष कधींही मिळणार नाहीं ज्ञान त्यास अवश्य आहे व जो ज्ञानी आहे त्यास कर्म मुळींच नको. मंडनमिश्रास जिंकल्यानंतर कांहीं दिवसांनीं शंकराच्यार्य हे परत स्वदेशी आले त्यावेळीं त्यांच्या देशीय ब्राह्मणास त्यांचें मत न आवडून त्यांनीं त्यास बहिष्कार घातला यावरून बहिष्कारानें द्वेष उगविण्याची युक्ती फार जुनी आहे असें स्थापित होतें असो अशा समयीं शंकराच्यार्यांची आई मरण पावली; त्यावेळीं कोणी ब्राह्मण प्रेत संस्कार करविण्यास येईनात शेवटीं शंकराच्यार्यानें आपले आईचें प्रेत आपले घराचे परसांत दहन केलें व पुढें जो कोणीं प्रेतें घराबाहेर दहन करील त्यास उत्तम गति न होईल असा शाप दिला अशी कथा आहे; यानंतर शंकराच्यार्याची दिवसेंदिवस कीर्ती वाढत चालली व त्यांचेजवळ शिष्यही अनेक मिळाले शेवटीं आपल्या वयाचे ३२ वें वर्षीं बद्रिकाश्रमाजवळ हिमालयांत शंकराच्यार्यानीं समाधी घेतली असें सांगतात.

शंकराच्यार्यांचा इतिहास त्यांचा शिष्य आनंदगीरि यानें लिहिलेला आहे त्या ग्रंथाचें नाव शंकरदिग्विजय असें आहे; त्यामध्यें प्रारंभापासून शेवटपर्यंत त्यानें त्यांची कथा लिहिली आहे. आनंदगिरचा ग्रंथ शुद्ध गद्यात्मक आहे. त्याच विषयावर दुसरा एक ग्रंथ माधव विद्यारण्य याणे लिहिला आहे. विद्यारण्य हे १४ वे शतकांत म्हणजे १३५० चे सुमारास विजयनगरचे म्हणजे अनीगुंदीचे राजाजवळ मुख्य प्रधान होते व पुढें त्यानें संन्यासग्रहण केलें व अनेक शास्त्रीय विषयावर ग्रंथ लिहिले त्यांनी चार वेदांचीं भाष्यें लिहिलीं आहेत. विद्यारण्यानें सर्वदर्शनसंग्रह म्हणून एक ग्रंथ केला आहे त्यामध्यें सर्व मताचें सारसंग्रह करून थोडक्यांत निरूपण केलें आहे.

अद्वैतमताचें मुख्य बीज जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य हें होय." वैष्णवाप्रमाणें अद्वैतवादी हे जीव व परमात्मा हे भिन्न आहेत असे समजत नाहींत. सुवर्णालंकार जरी सोन्यापासून वेगळे दिसतात; तरी आटविल्या नंतर जसें त्याचें सोनेंच होतें तसें जीवाचें आहे; व जीव हा जरी वेगळा दिसतो तरी तो परमात्म्याचाच कळा होय व शेवटीं तो त्यामध्येंच प्रवेश करणार आहे.

यथाग्नेःक्षुद्राविस्फुलिंगाव्युच्चरंति
एवमेवतस्मादात्मनःसर्वेआत्मानो
व्युच्चरंति इति.

त्या मतीं विश्व हें मिथ्या असून शुद्ध माया आहे (यावरूनच वैष्णव हे या मतानुगांस वारंवार मायावादी असें म्हणतात) यासाठीं सर्व अद्वैत पंथच आहे तो सर्व खोटा आहे केवळ एक ब्रह्म मात्र सत्य आहे. बाकी सर्व मिथ्या होय.

ईश्वर निर्गुण व निराकार आहे असें अद्वैत मतांत प्रतिपादन केलें आहे असें असूनही तो

नित्यःसर्वगतःस्थाणुरचलोयं सनातनः
अच्छेद्योयमदाह्योयमक्लेद्योशोष्यएवच ॥

ब्रह्म कसें तरः—

यतोवाइमानिभूतानिजायंते
येनजातानिजीवंति । यत्प्रयं
त्यभिसंविशंतीति ॥

अद्वैत मतास कधीं कधीं उत्तर किंवा ब्रह्म मीमांसामत असें म्हणतात. व्यासांनीं केलेल्या ब्रम्हसूत्र भाष्यांत ब्रम्ह मीमांसा मताचें प्रतिदान केलें आहे अर्वाचीन सर्व द्वैत व अद्वैत सांप्रदायस्थापकांनीं ब्रम्हसूत्रावर भाष्यें लिहून आपणास इष्ट असणें तसा अर्थ त्यापासून पांडित्याचे बळानें काढिला आहे.

शंकराच्यार्यानें केलेल्या ग्रंथाची नांवे येणें प्रमाणें आहेत:—

१ शारिरभा०, २ छांदोग्योप० भा०, ३ बृहदारण्य कोप० भा०, ४ ईशावास्योप० भा०, ५ प्रश्नो प० भा०, ६ तैतरियोप० भा०, ७ ऐतरीयोप० भा०, ८ कनोपनिषदभा०, ९ मांडूक्यो० भा०, १० मुंडकोप० भा०, याखेरीज कांहीं स्तोत्रें व न सान ग्रंथ केले आहेत या बहुतक थांवर आनंतगिरकृत टीका आहेत.

हा.

## पोस्टाचें काम.

लंडन येथील पोस्टमास्तर जनरा १८७१ चा रिपोर्ट छापून प्रसिद्ध झा आहे, त्यावरून तेथच्या टपा त्याची कांहीं चमत्कारिक हकीकत का इंग्लिश पत्रांत दिली आहे तीं, मच्या वाचकांकरितां येथें उतरून दे

इंग्लंडच्या पोस्टखात्याकडे पत्रें वांट एकच काम आहे असें नाहीं; टेलि मनीआर्डर सेविंगस ब्यांक, विवाया उतरणें, व म्हाताऱ्यास पेनसें ( ने ) देणें. हें कामें त्याकडेच आहेत त्याचें मुख्य काम तर पत्रें करणें व वांटणें हें आहेच:

सन १८४० सालांत पेनी ( आपल्या येथील अर्ध आण्याचे स्टांपाचें ) सुरू होण्या पूर्वीं सर्व ब्रिटन व ऐर्लंड देशांत मिळून १०० टपाल हापिसें होती आता ची संख्या १०,००० पर्यंत येऊन हचली आहे. सन १८६९ साली दा ८ कोटी ६० लक्ष पत्रें टपा आलीं, आणि १८७१ सालीं ९१ कोटी आलीं. याशिवाय ७ १/२ कार्डस किंवा चकत्या आल्या, मानपत्रें व बुके यांची २० कोटी लक्ष पाकिटें किंवा पुडकी आलीं.

टपालातून पत्रें वगैरे पाठविणारे बहुत विष्काळजी लोक आहेत आढळतें. सदरहु रपोटावरून असें जसे कीं, टपालांत आलेल्या १९,०० पत्रांवर कांहींच पत्ता नव्हता. न १४० पत्रांत नाणी व ब्यांकनो होत्या. त्याच वर्षीं एक लखोटा टा लांत सापडला त्यांत एक घड्याळ दोन सवरीन नाणीं ( १० रु० ) हा लखोटा रजिस्टर केला नव्हता कैच नाहीं, तर तो लाखेनें मोहर केला नसून सुतळीनें बांधला देखील व्हता एकदा एक सोन्याचे घड्या व सोन्याचे आडकवणीही एका डिक विसळीत बांधून "आमेरिकेस" इतकं मात्र त्याजवर लिहून टपालच्या पेटी टाकलेली सापडली. ती कोणाकडून कोणास याचा यांवर कांहींच पत्ता लि ला नव्हता

कधीकधीं फार चमत्कारिक पदार्थ टपालातून पाठविण्याकरिता लोक णीत. रेशमाचे जिवंत किडे जिवंत दीर, सरडे व कासवें हे प्राणी 'पोस्ट वाले शिपायांस लोकांच्या घरीं नेऊन पोंचवावे लागले. एकदा कोणी एक प्राणिमात्रादि विद्याभ्यासी गृहस्थ एक जिवंत सर्प टपालातून पाठविण्याकरितां घेऊन आला होता, व तो पोस्टमास्तरानें घेतला नाहीं म्हणून त्याला बाहेर वाटून वो मोठ्या विचारांत पडला. ज्ञा. द.

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 4—1872

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० ६ जूलई सन १८७३ इ० | अंक २७

## वऱ्हाड

आजचा आमचा हा कागद लहान निघाल्याचें कारण दुःखकारक आहे. आम्ही स्वतां आमचे घरांतील ८ मनुष्यांनिशीं डेंग्यु म्हणजे गुडघेमोडी तापानें आजारी आहो. गेल्या मंगळवारपासून काल पर्यंत आमच्यानें लिहावयास मुळींच वसवलें नाहीं. हातांचेच काय पण बोटाच्या कांड्या कांड्यांचे सांधे दुखत होते. त्यामुळें असें झालें. परमेश्वरकृपेनें पुढील आठवड्यास आम्ही आपलें काम योग्य रीतीनें चालवूं शकूं असें वाटतें.

—000—

गावांत डेंग्यु तापानें कहर उसळून दिला आहे. ज्या ज्या घरांत त्यानें प्रवेश केला त्यांतील बहुतेक मनुष्यांस आजारी करून सोडिलें आहे. अशीं पांच पंचवीस ठळक ठळक घरें आमच्या माहितींत आलीं व गरीब गुरीबांची तर कित्येक असतील मिळून सर्व गावांत या दुखण्याची काळजी आहे.

—000—

या आठवड्यांत एक दोन दिवस पाऊस बरा पडला. व आसपास फार चांगला पडला. पेरण्यांचा झपाटा चालला आहे.

—000—

खामगावची रेलवे बरसातीमुळें २३ वे तारखेपासून बंद झाली.

—000—

इलिचपुरचे स्माल्लकाजकोर्ट अकोल्यास आणण्याचा विचार चालू आहे.

—000—

हिकमतीचा व कसरतीचा खेळ करणारे मि० क्लेर या नावाचे एक फ्रेंच गृहस्थ येथें आले आहेत. त्यांनीं मागील शनिवारीं व काल बराकीमध्यें आपले खेळ केले.

—000—

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, असिस्टंट कमिशनर आफीसपैकीं कारकून रा० नाबाराव यशवंत भानप यांस गेल्या गुरुवारीं सायंकाळीं सान्निपातज्वरानें देवाज्ञा झाली. हे गृहस्थ वीस दिवस आजारी होते. यांची हुशारी, सुस्वभाव व लोकप्रियता चांगली होती. यांस पुत्र नाहीं, वृद्ध मातुश्री व द्वितीय विवाहाचें तरुणकुटुंब हीं दुःखाचे डोहांत पडलीं आहेत यांचे तीर्थरूप पुण्याकडे मामलेदार होते व चुलते नगराकडे दप्तरदार होते यावरून नाबाराव जरी सामान्यप्रतीचे कारकून होते तरी कुळानें व शीलानें त्यांची योग्यता मोठी होती व त्याकरितांच त्यांच्या मरणानें बहुत लोकांस दुःख झालें

यांचे एक बंधू बुलढाणें जिल्ह्यांत चिखलीस कारकून आहेत त्यांस जर डिपुटी कमिशनर साहेब नाबारावाची जागा देतील तर पुष्कळ लोकांस चांगलें वाटेल.

मि० नौलिस साहेब यांनीं, नाबारावाचे वर्तमान ऐकलें तेव्हां मोठें दुःख प्रदर्शित केलें. व कचेरीचें काम बंद केलें.

—000—

अकोटचे तहशिलदारानीं राधा गौरतेच्या बाबदींत गोविंदगीर गोसावी याजवर अपुर्ते किमतीचे स्टांपावर फारकत लिहून दिल्याच्या गुन्ह्याबद्दल समन्स केलें होतें व त्याची चौकशी आपणापुढें चालवावी असा त्यांचा इरादा होता व त्या बद्दल गोविंदगीर यानें हुजूर तक्रारीचा अर्ज दिला होता त्यावरून डिपुटी कमिशनर साहेबांनीं अर्जदारास समक्ष दिली कीं तहशिलदाराचे समक्षताप्रमाणें त्यांपुढें सदरहु चौकशी करितां हजर होऊं नये.

—000—

मूर्तिजापुर तालुक्यांतील जमाबाराचा बाटणीचा खटला थोडे महिन्यामागें रेसिडेंट साहेब यांजकडे चालला व अखेर प्रतिवादीतर्फे फैसल झाला. वादीकडून रा. रा. बाळा मगेश वागळे बारिस्टर होते व प्रतिवादीतर्फें मिस्तर कीथ साहेब बारिस्टर होते. या मुकदम्यांत रा. रा. रामचंद्र त्रिंबक वकील याची रेसिडेंट साहेबांनीं सनद बंद केली व प्रतिवादीचा १२ हजार रुपये खर्च रा. रामचंद्र त्रिंबक यांच्या अंगावर घातला असें वर्तमान आहे. असा प्रकार होण्यास वादी व त्याचे वकील रा. रा. रामचंद्र त्रिंबक यांचे दरम्यान चांपरटी करार आहे असे रेसिडेंट साहेबांचे नजरेस आले असावे असें एक अनुमान दिसतें. परंतु ती हकीगत अद्याप समजत नाहीं. चांपरटी करार असा आहे कीं वादीचे विषयांत हिस्सा ठेऊन त्या हिश्याच्या आशेवर पैसा लावणें. असें करणें इंग्रजी कायद्या प्रमाणें गैरकायदा आहे व त्यास कायद्याची मदत मिळू सकत नाहीं. कारण अशानें विनाकारण तंटे वाढतात.

—000—

बाळापुरकर साहु परशराम पोपटलाल यास पुण्याहून गंगाराम मायाप्पा वाणी यानें येऊन १००० रुपयांची खोटी हुंडी विकली तो मुकदमा पुण्यास कित्येक वेळां चालला व तहकुब राहिला व बाळापुराहून तितके वेळां ६—७ साक्षीदार जात होते. शेवटीं सेशनांत पुरी चौकशी होऊन त्याजवर तो व दुसरे दोन तीन ब्याजें शाबीद झाले व त्यास जन्मपर्यंत काळें पाण्याची शिक्षा झाली. व त्याबरोबर पोष्टाचा क्लार्क भगाजी येगीराज यास ९००० रुपये दंड व जन्मपर्यंत काळेंपाणी अशी सजा झाली.

—000—

रा. रा. पुरुषोत्तमराव नारायणभट एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर एलिचपुरास नेमिले व ते तेथें जाऊन आपले कामावर रुजू झाले.

—000—

मयत दिनसानीं सोराबजी ए० अ० क० यांचे चिरंजीव मि० आर्देसर शांट यांस यवतमाळास तहशिलदार नेमिलें असें समजतें.

## वर्तमानसार

इराणचे बादशहा विलायतेहून पुढें रशिया देशांनही जाणार आहेत.

राजकोटच्या राजकुमार कालेजांत आलखी दोन नवीन राजपुत्र इंग्लिश विद्याभ्यासास गेले आहेत. आतां एकंदर १० राजपुत्र तेथें शिकत आहेत. ही मोठी सुदैवाची गोष्ट होय!

वियेना व वेनीस एथें महामारीचा उपद्रव सुरू झाला आहे.

नवानगरच्या जाम साहेबांचे नजीकचे आप्त भुपतसिंगजी व त्या दरबारातील दुसरे एक सरदार यांनीं आत्महत्या केल्या असें वर्तमान आलें आहे. कारण अजून समजलें नाहीं.

युनाइटेड किंगडम म्हणजे एकत्र संस्थानें यांची तीनमाही वसूली बेरीज १७५६२९००० रुपये आहे असें कळतें.

गायकवाडाचें झोपाळू कुत्रे या सदराखालीं टाइम्स पत्रांत असें लिहिलें आहे कीं, बडोदासंस्थानांत गाढे म्हणून गाव आहे. तेथें पोलिस स्टेशनही आहे. एके रात्रीं चोरटेलोकांनीं त्या स्टेशनावर जाऊन पोलिसाचीं सर्व हत्यारें घेतलीं व त्यांची एक माळ करून गावाचे वेशीला टांगून दिली आणि निघून गेले! झोपाळू कुत्रें म्हणजे पोलिस तर मग?

विलायतेहून तारेंतून वर्तमान आलें आहे कीं, रशिया व तुर्कस्थान यांच्या एकत्र सैन्यानें १० वे तारखेस खिवा शहरावर हल्ला करून ते हस्तगत करून घेतलें. तेथील खान जाटमंडोकडे पळून गेला.

हिंदुस्थानांत घातक जनावरापासून फारच मनुष्यें मरण पावतात या गोष्टीवर हिंदुस्थान सरकारानें चांगलें लक्ष द्यावें अशा विषयीं विलायत सरकारानें त्यास सुचविलें आहे.

पुण्याजवळ लुटु पुटूची लढाई होणार तिजा शिवाय खर्च लागेल त्या साठीं एक लाख रुपयांचें सांगशन झालें आहे.

मुंबई—गेल्या पंधरवाड्यांत पहिल्यानें ८ किंवा १० दिवस पाऊस अगदीं पडला नाहीं त्यावरून उष्णता फार होऊं लागली होती आणि धान्याचा भाव चढेल असेंही भय वाटूं लागलें होतें. नंतर पाऊस पडूं लागला आणि दोन दिवस पडल्यावर पुन्हां बंद झाला. हवा बरीच चांगली आहे

मस्कतेचा माजी इमाम (राजा) स्ययद सालीम यानें हामिल्टन कंपनीपासून १०,००० रुपयांचे जवाहीर खरीद करून त्याची किंमत न देतां पलायन केलें. कंपनीनें, माजिस्त्रेटाकडे फिर्याद केली व त्यांस वारंट काढून कराचीहून पकडून आणिलें. हा पूर्वीं दोनदा अशा खटल्यांत सापडला होता. मस्कतेची गादी मिळावी म्हणून यानें आपला बाप मारला

बुंदेलखंडांत व मध्य हिंदुस्थानाच्या कांहीं भागांत दुष्काळ पडण्याचें चिन्ह आहे असें वर्तमान आहे. हें खरें असल्यास मोठी दुःखाची गोष्ट आहे. ज्ञा. द

धुळें—रोहिणीं निघे पाऊस नसल्यानें ऊन पडूं लागलींत! मिघरानाचें आगमन होणार नाहीं तर तीं क्षयास जातील. बाजारभावांत दर मापास दोन रुपयांनीं महागाई झाली आहे. शहरांत तापाचा आजार सुरू आहे. खा. वै.

कोल्हापूर—गेल्या आठवड्यांत पर्जन्य अगदींच पडला नाहीं. धान्याचा भाव दिवसेंदिवस चढत चालला. ज्ञा. सा.

धारवाड—पर्जन्य नसल्यामुळें शेतकरी लोक पेरणी करण्याचें सोडून देऊन घरीं स्वस्थ बसले आहेत. पर्जन्यमहाराज केव्हां कृपा करतील ते करोत. जिकडे पहावें तिकडे पर्जन्याची हाकाटी चालली आहे. महागाई होण्यास प्रारंभ झाला. गुरुवारीं व शुक्रवारीं पर्जन्याचे थोडेसे थेंब पडले. हवा फार वाईट होऊन गेली आहे. ज्ञा. बो.

नासिक—पर्जन्या कडे सर्वांची सारखी नजर लागली. परंतु अद्याप निराशाच आहे. ना. वृ.

बेळगांव. या आठवड्यांत पर्जन्य नसून बहुधा ऊन कडकडीत पडत असे त्यामुळें लोक काळजी करूं लागले आहेत कालपासून मात्र पर्जन्याचीं कांहीं चिन्हें दिसत आहेत. बे. स.

सोलापुर तारीख २८ रोजीं रात्रीं ९ वाजतां खूपच पर्जन्य वृष्टी झाली ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. ही वृष्टी सुमारें २ | १ तास झाली. क. त.

पुणें—अलीकडे हवेचें मान फारच चमत्कारीक झालें आहे. पावसाची हकाहाक चहूंकडून ऐकूं येत आहे मृगाचिसल्लाईचा काल संपत आला तरी ऊन प्रखर लागतें. व दोन प्रहरीं तर चांगला ऊष्मा होतो आतांशीं पावसाचा एक थेंब सुद्धां नाहीं यामुळें धान्याचे भावसुद्धां वाढत चालले आहेत. पुढें काय होणार आहे कांहीं कळत नाहीं. रोगराई अजून जरी फारशी नाहीं तथापि पुढें संभव आहे.

बाजारभावः—बाजरी १५, १६, १७ ज्वारी २०, २१, २२, हरबरे ११॥ १२, मटकी १३ गहु ११, १२, दाळ तुरीची ८, ८॥, दाळहरबरेची ८॥, ९ आंबेमोहोर सडीक ७॥, ८, साळसडीक १२, ११, १०, तूप ११९ तेल ३॥ साकर २॥, गूळ १॥ सोनें कामा कंपनी ९७ नंबरी १७।, १०० नंबरी १८, चांदी विलायती ७, गांवठी १॥ शिक्का सुर्ती १०० येणेप्रमाणें आहेत.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## जगाचाइतिहास.

निबंध.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यास वि.वि

जी गोष्ट आपल्या विचाराचे बाहेर असते तिजविषयीं विचार करणें तो आपण अनुमानिक करितो. जगाच्या इतिहासाविषयीं असाच प्रकार समजला पाहिजे. जे आतां जरीं पाश्चिमस्थानीं त्या विषयीं वर्णन केलें आहे तरी तें खातरीलायक नाहीं. कारण तो लेख ४००० वर्षांपलीकडे जात नाहीं.

वास्तवीक पाहिलें असतां ह्या जगास ४००० वर्षें झालीं हें मानणें फार अल्प समजुतीचें आहे कारण. ईश्वरानें सृष्टीक्रम ज्या पायावर घातला त्यावरून जगोत्पत्ती होऊन ४००० वर्षांपेक्षा खास फारच अधिक वर्षें झालीं असावीत असा तर्क करिता येतो.

हिंदु लोकांनीं काळाचे च्यार विभाग करून कृत, त्रेत, द्वापार आणि कली अशीं नांवे दिलीं यांस युगें असें ह्मणतात यांची काल संख्या त्यांनीं दिली आहे ती.

| | |
|---|---|
| कृत | १७२८००० |
| त्रेत | १२९६००० |
| द्वापार | ८९४००० |
| कली | ४३२००० |

यावरून पहातां पाश्चिमस्थांच्या आणि हिंदुंच्या काळ गणनेत महदंतर पडतें. वरें कवीनीं अत्युक्ती केली ह्मणावी तर तेही गणितास शोभत नाहीं. कारण अत्युक्ति भाषेस आहे गणितास नाहीं.

कर्ता एक आहे त्यानें हा ब्रंह्मकटाह एकामागून एक उत्पन्न करितां करितां ४००० वर्षांपूर्वीं हा आपली पृथ्वी उत्पन्न केली असें ह्मणावें तर तेही त्याच्या अगाध करणीस शोभत नाहीं तेव्हां अर्थात हे सर्व विश्व एकदम उत्पन्न केलें व त्यांनां अन्योन्याकर्षणद्वार संस्थापिलें. हेंच म्हणणें बरें दिसतें.

आतां असें मानूं की हीं अनंत जडें अनंत काळचींच उत्पन्न झालीं आहेत परंतु त्यावरील स्थावर जंगमादि प्राणी ४००० वर्षांचे सुमारास होण्यास आरंभ झाला असावा. त्यास तेही माझ्या मतास येत नाहीं कारण ज्या मूळ द्रव्यापासून स्थावर जंगमादि जग उत्पन्न होऊं लागलें तीं द्रव्यें सृष्टयुत्पत्तीस नसून पुढें झालीं असावींत. तेंही मागें सांगितल्याप्रमाणें त्याचें करणीस बाध आणिते यास्तव प्राण्यांची उत्पत्ती सृष्टयुत्पत्तीबरोबरच झाली असावी हें मानणें विशेष योग्य आहे दुसरें हल्लीं कित्येक पाश्चिमस्थ पंडितांनीं नद्यांच्या ओघावरून व तशाच कित्येक कारणावरून हें जग ४००० वर्षांपेक्षां फारच फार जुनें आहे असें मानलें आहे यास्तव युनिवर्सल हिस्टरीची काल गणना अगर बायबलाची काल गणना अगदीं चुकीची आहे हें उघड सिद्ध होतें.

एक ज्ञ.

## नोटिसा.

नोटिस—राजेश्री एकोबा वल्लद कवळाजी देशमुख म्हैसांगकर यास सखाराम व बुटाजी वल्लद होनाजी देशमुख म्हैसांगकर यानकडून नोटिस देण्यांत येतें कीं गुदस्त श्रावण महिन्यांत तुमचा आमचा हिशेब होऊन व्याज वहीनर ५३४८२ बाकी निघाली ती मांडून देऊन तुम्ही सहीं केली व हंगामशीर रुपये देऊं असें कबूल केलें त्याप्रमाणें एक दोन वेळा तुम्हाला रुपये मागितले असतां देऊं दिलाऊच्या गोष्टी सांगता रुपये देत नाहीं ह्मणून मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्यापासून १२ दिवसांचे आंत आमचे मुद्दल रुपये ५३४८२ व व्याज आजपावेतों ७३८२ एकूणें एकंदर रुपये ६०७८४ सहा शें सात रुपये चार आणे आमचे येथें आणून द्यावे. तसें न कराल तर तुम्हावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेऊं. कळावें तारीख २९ माहे जून सन १८७३

(सही) सखाराम व बुटाजी देशमुख दस्तुर खुद.

नोटिस—बनाम रखमाबाई मर्द विठोबा पिंपळगावकर राहणार पेठ उमरावती यांस बाळकृष्ण सखाराम मुळे तर्फें मारुती नाईक दुकान उमरावती यानकडून नोटिस देण्यांत एते कीं, सिताबाई मर्द रामसा पटवी राहणार उमरावती इची दुकान बाजार ओळींत असलेली तुह्माकडेस भाड्यानें असोन तें दुकान आम्ही सदरहू पटवीन इजपासून ता० १ माहे डिसेंबर सन १८७२ इसवी रोजीं १५० शिके कलदागस खरेदी घेतलीं त्याच वेळेस तुह्मास ही कळविलें असोन सदरहू दुकान आह्मांस खालीं करून देण्याविशीं तुह्मास पुष्कळ वेळा आह्माकडून व सदर बाईकडून ताकीत दिली परंतु आजपर्यंत खालीं करून देतों देतों ह्मणता परंतु देत नाहीं सबब हल्लीं या नोटिशीनें कळविण्यांत एते कीं, ही नोटिस पोंचल्यापासून ८ आठ दिवसात ज्या तारखेस आह्मी खरेदी घेतलें या तारखे पासून महिना ६ रुपये प्रमाणें भाड्याचा पैसा देऊन दुकान खालीं करून द्यावी अगर तसें न कराल तर सिरस्तेप्रमाणें फिर्याद करून दुकान खालीं करून घेऊं व भाड्याचा पैसा आणि नोटिशीचा खर्च सुद्धां भरून घेतलें जाईल कळावें तारीख २ माहे जुलई सन १८७३ इसवी.

(सही) बाळकृष्ण सखाराम मुळें तर्फें मारुती परशराम वहिवाटदार.

नोटिस—साऊ जवजे कन्हयालाल तारकशी वस्ती बाळापुर यांस खालीं सही करणार यानकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमचे भ्रतार कन्हयालाल यांणीं तारिख १७ माहे आक्टोबर सन १८६४ इसवी रोजीं १००० रुपये घेतल्याचा दस्तऐवज लिहून देऊन त्यांत बाळापुर येथील हवेली गहाण दिली. तीस लागणारे भिंती व खपरेलाबद्दल खर्चासहित रुपये देऊं तेव्हां हवेली सोडऊं असा करार असोन तो खर्च त्यांत लिहिले शर्तीप्रमाणें तुह्मी कबूल करीत नसोन कमी करिता आतां हवेलींची भिंत पडण्यास आली आहे. तिजला खर्च फार लागत आहे. हा तुह्मी मागें कबूल केले खर्चाप्रमाणें कमी कबुल कराल यास्तव या नोटिशीनें कळवितों कीं या नोटिशिचे तारखेपासून ८ दिवसांत मागील खर्चासहीत १०७५ एक हजार पंचाहात्तर रुपये देऊन हवेली सोडवून घ्यावी. असें न केल्यास योग्य कोडतांत योग्य होईल तशी या नोटिशीचे खर्चासहित तुह्मावर फिर्याद होईल. आणि खर्चासुध्धा रुपये द्यावे लागतील तारीख ४ जुलाई सन १८७३ इसवी.

(सही) धनाजी जानाप्पा मुंजाळ याचे कुलमुखत्यार भगुसिंग चैनसिंग दस्तुर खुद.

## जाहिरखबर

सर्वत्र लोकांस कळविण्याकरितां असें जाहिर केलें जातें कीं, उमरावती येथें गाझे खरेदीच्या हवेल्या दोन आहेत एक हवेली गंभीरपुरी गोसाव्याबाली तांदुळ सातींत आहे. दुसरी हवेली राघोबावैद्याबाली असे दोन माझे मकान स्वताचे खरीदीचे आहे माझें ऐकण्यांत असें आलें आहे कीं, माझी महीण आयनाजी कसबीन हे मकान गाहान अगर फरोक्त करणार आहे तर हे कोणी घेऊं नये कारण माझा निमे हिस्सा यानवर आहे करितां सर्वतांस जाहिर केलें आहे इतक्यावर कोणी घेतल्यास घेणारा बुडेल कळावें तारीख २ माहे जुलाई सन १८७३ इ.

(सही) भुराजी कसबीन राहणार उमरावती इचे हातची निशाणी बांगडी.

## जाहिरात.

## नवीन पुस्तक.

वऱ्हाड प्रांताची भुगोलविद्या.

हें पुस्तक मोडी लिपींत छापून खालीं सही करणाराकडेस तयार आहे किंमत दोन आणि दर प्रतीस. वीस प्रतीस चार आणे टपाल हसील पडेल ज्या कोणास हें पुस्तक घेणें असेल त्यानीं पैसा पाठऊन दिल्यास त्याजकडेस पुस्तकें लवकर रवाना केलीं जातील. टिकिटें पाठविणें झाल्यास एक रुपयास एक आणा वर्ताळा पाठविला पाहिजे तारिख २२ माहे जून सन १८७३

चिमणाजी राजाराम पाठक डिपुटी इन्स्पेक्टर शाळाकडील उमरावती

## छापखान्याकडील नोकर पाहिजेत.

१. आमचे कारखान्यांत टाइपाचे छापखान्याकरितां एक प्रिंटर म्हणजे हुशार छापणारा पाहिजे. त्यानें कित्येक वर्षें चांगल्या कारखान्यांत काम केलेलें असावे, त्याला ल्हान मोठे प्रेस उलगडतां व जोडतां येत असावेत, व कागद सुबाच्य छापतां येत असावेत व इतर तत्संबंधी सर्व माहिती असावी. पगार १५ पासून २५ रुपये पर्यंत लायकी पाहून देऊं.

२. शिळाप्रेसाकरितां एक लेखक पाहिजे. त्याचें अक्षर बाळबोध मोडी सुंदर, शुद्ध व घटीव असावें. त्यानें कोणत्या एका छापखान्यांत दोन वर्षे तरीं काम केलेलें असावें. व त्यास शिळाप्रेसासंबंधी सर्व माहिती असावी. पगार १५ रुपये पर्यंत देऊं.

३. शिळाप्रेसाकडील कागद छापणारा प्रेसम्यान पाहिजे. चांगला कारागीर असेल तर पगार १५ रुपये देऊं.

४. टाइपाच्या व शिळांच्या अशा दोन्ही प्रेसांचा माहितगार छापणारा एकच मनुष्य मिळेल तर त्याला आधीं ठेऊं व पगार २५ पासून ३० रुपये पर्यंत देऊं.

५. तसेंच लेखक ठेवावयाचा तो मराटी टाइप जुळणारा कंपाझिटर उत्तम असून लेखक असेल तर त्याला ठेवूं व २० रुपयेपर्यंत पगार देऊं.

———

ज्या कोणाची यावयाची खुशी असेल त्यांणीं आपले सविस्तर हकीकतीचीं पत्रें पाठवावीं व उत्तरें जातील त्याप्रमाणें करावें. त्यांची इच्छा असेल तर त्यांणीं एक किंवा दोन वर्षें नोकरी सोडून जाऊं नये व आह्मी त्यांस काढणार नाहीं, असें परस्पर करार करूं.

अकोला ता० ६ माहे जुलाई सन १८७३ इसवी. } खंडेराव बाळाजी वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | |
|---|---|
| | ६ |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ८ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८ |
| अखेर | २ |

## नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.

ठेव—महादु वल्लद हरीसिंग तिळ
गावी राहणार हसापुर तालुके बाळ
पास तानकी मर्द महादु मुक्काम म
हादुः म्हणजे नांदुरे तालुके मलकापूर
यांकडून नोटिस, देण्यात येते की, तुझें
प्रात अमाल्यास सुमारें, १० वर्षें झाले
व मी वयात आलेल्यास, १२ वर्षें झाले तें
व्हापासून माझे असें आढळण्यांत आले
की तूं पुरुषामध्ये नाहींस त्यामुळे तु
झा फारकत मागावी व नवा घरठाव क
रावा आशाविषयीं माझा भाऊ रघु वल्लद
गिरी बाब यांनी दोन तीन वेळां तुजपा
शी गोष्ट काढिली व शेवटीं मांडुन्यास पं
चांसमक्ष या गोष्टीचा निर्णय केला. पंचा
पुढें स्टांप कागदावर तूं लिहून दिलेंस की
दुनियादारीचे मार्गाची वळकटी पाहून
तुम्हाला खात्री झाली असतां माझी बाब
की माझे बरोबर राहून यानी खात्री न
झाल्यास न मी पुरुषांत नाहीं असें ठरल्या
स मी फारकत देण्यास तयार आहे माझी
बिलकुल तक्रार नाहीं असा करारनामा
तूं तारीख २० माहे मार्च सन १८७२
इसवी रोजीं लिहून दिलास व त्याप्रमाणें
तेथून परीक्षा पाहणार तो यास दिव
से नेथून पळून गेलास तो पुन्हा आला
नाहीं तुझे गावीं पुन्हा बोलावण्यास पाठ
विले. तूं येत नाहीं म्हणून सांगितलें ते
व्हां या सर्वा गोष्टीवरून माझे स्वतःचे
अनुभवावरून पक्के ठरत आहे कीं तूं पुरु
षांत नाहीं. तुझ्याच करारनाम्यावरून
पहातां तूं फारकत देणें योग्य होते ती
अजून दिली नाहीं म्हणून आतां या नोटि
शीने मुक्काम कळविते कीं नोटिस पोच
ल्यापासून १५ दिवसाचे आंत फारकत
द्यावी तसें न करशील तर तुझ्या कबुलायती
प्रमाणें तूं फारकत दिल्याप्रमाणेच आहे
असें समजून मी दुसरा घरठाव करीन
अजूनही तुला कळविते कीं, तुला तुजविष
यीं खात्री असेल तर पंचापुढें नक्की यावें
व त्यांची खात्री करून द्यावी म्हणजे मी
तुजकडेस नांदण्यास सिद्ध आहे सदरहु
दोन गोष्टीतून कोणता तरी एक निकाल
सदरहु मुदतींत जरूर केला पाहिजे त्या
प्रमाणें तूं कांहीं केलें नाहीं तर तुझा क
शाचा हक्क राहिला नाहीं असे समजले
जाईल व त्याप्रमाणें कायदेशीर तजवीज
केली जाईल कळावें तारीख १ माहे जु
लाई सन १८७३ इसवी मुक्काम अकोला.
(सही) तानकी मर्द महादु तिळकीण
हस्ते हातची बांगडी.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २२ जून सन १८७३ इ० | अंक २५

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ. | १०८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरनामे.

### खानदेशचे कलेक्टर साहेबांकडून.

जाहिरनामा—प्रगट करण्यांत येतो की खानदेश जिल्ह्यांतील मध्यम पतीचे गाव व खेड्यांत दारु आणि भांग गांजा विकण्याबद्दल हक्क तारीख ३० जुलई सन १८७३ रोजीं आणि नंतर धुळें एथें कलेक्टर साहेबांचे कचेरींत लिलावानें तारीख २६ जुलई सन १८७३ पासून सुरु होणारे सालाबद्दल विकला जाईल. विकीच्या वेळीं शर्ती समजाविण्यांत येतील.

लिलावांत जी बेरीज होईल त्या रकमेवर दरशेकडा १० रुपया प्रमाणें होईल तो आकार लिलावाचे वक्तीं अमानत ठेविला पाहिजे. जर लिलाव खानदेशचे कलेक्टर साहेब यांणीं कायम केला नाहींतर अनामत ठेवलेले रुपये परत मिळतील तारीख ९ जून सन १८७३ इ०

J. Moore
असिस्टंट कलेक्टर
खानदेश.

### खानदेशचे कलेक्टर साहेब यांजकडून.

जाहिरनामा—सर्व लोकांस कळविण्याकरितां प्रगट करण्यांत येतो कीं, तारिख १६ माहे जुलई सन १८७३ इसवी पासून शुरु होणारे सालाबदल खानदेश जिल्ह्यांतील निरनिराळे रस्त्यावरील नाके दस्तुरी घेण्याबद्दलचे हक्काचा जाहिरलिलाव तारिख ३० माहे जून सन १८७३ इसवी रोजीं आणि नंतर धुळें येथें कलेक्टर साहेब यांचे कचेरींत होईल.

लिलावांत जी बेरीज होईल त्या रकमेवर लिलाव वक्तीं दर शेकडा दहा रुपये प्रमाणें होईल तो आकार अमानत ठेविला पाहिजे. जर लिलाव खानदेशचे कलेक्टर साहेब यांणीं कायम केला नाहीं तर अमानत ठेविलेले रुपये परत मिळतील जामीन दिला पाहिजे. विक्रीच्या वेळीं लिलावाच्या शर्ती समजाविण्यांत येतील.

पूर्वी शर्तीअन्वयें वर्तणूक न झालेल्या मनुष्यानें ह्या लिलावास येण्याची जरुर नाहीं.

तारिख ९ माहे जून सन १८७३ इसवी.

J. Moore
असिस्टंट कलेक्टर,
खानदेश

## नवीन पुस्तक.

( वऱ्हाडप्रांताची भूगोलविद्या. ).

ह्या प्रांतांतील सरकारी शाळांत सध्यां ज्या अभ्यासाच्या यत्ता ( स्टांडर्डस ) चालू आहेत त्यांतील तिसऱ्या व चवथ्या यत्तेत भूगोल विद्येच्या व्याख्या व वऱ्हाडाची भूगोलविद्या शिकवावी असें आहे परंतु हा विषय चांगल्या रीतीनें शिकविण्यास साधनें नसल्यामुळे स्कुलमास्तर लोकांस फार अडचण पडती ती कांहीं अंशीं दूर व्हावी ह्मणून आह्मी एक लहानसें पुस्तक तयार करुन तें मोडींत छापण्याचें काम सुरु आहे. वऱ्हाड मोडी दुसऱ्या बुकायेवढें हे पुस्तक होईल. दर प्रतीस किंमत तीन आणे ठेविली आहे या शिवाय टपाल खर्च पडेल. हें पुस्तक येत्या जून महिन्याच्या तारीख १५ च्या आंत छापून तयार होईल. ज्यास हें घेणें असेल त्याणीं सदरहु तारखेच्या आंत आगाऊ पैसा खालीं सही करणाराकडे पाठविल्यास दर प्रतीस अडीच आणे पडतील, सदरहु तारखेपुढें पाठविल्यास तीन आणे पडतील दर प्रतीस डाक खर्च १ आणा व १० प्रतीस २ आणे पडेल, नाटपेट पत्रें घेतलीं जाणार नाहींत टिकिटे पाठविणें असल्यास एक रुपया मागे एक आणा वर्ताळा पाठविला पाहिजे. तारीख १७ माहे एप्रील सन १८७३ इ.

चिमणाजी राजाराम डिपुटि इन्स्पेक्टर

## नोटिस.

नोटिस—बेनामी असामी धोंडु वल्लद रामजी दलाल वहिवाटदार रामजी वल्लद सिताराम जात ब्राह्मण वस्ती जळगाव यास ब्रिजवल्लभदास गिरधारीदास दुमाणी दुकान जळगाव जिल्हा अकोला याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे १३२ रुपये मुद्दल व शिवाय कार्तिक शुद्ध १ पासून दरमहा ०१२ बारा आणे प्रमाणें व्याज घेणें आहे. ही आमची सर्व रक्कम ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांचे आंत पाठवावी. तसें न कराल तर तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करुन खर्चासुध्दा सर्व रुपये भरुन घेऊं. कळावे तारीख १७ माहे जून सन १८७३

( सही ) ब्रिजवल्लभदास गिरधारीदास
वहिवाटदार चुनीलाल दस्तुरखुद.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. महाराज मी इंग्रजींतला एक नोकर आहे. कांहीं कामानिमित्त मोगलाईंत हातगाव तालुक्यांत गेलों, होतों तिकडील थोडी हकीगत आपणास कळवितें.

तालुक्याचे गाव व सभोवतालचे गांव फार गलिच्छ आहेत. स्वच्छतेचे चिन्ह कांहींच दिसलें नाहीं तहशिलदार हुशार आहेत व कामाकाजात दक्ष आहेत असें दिसलें पण सफाई कडे यांचें दुर्लक्ष कां आहे तें कळत नाहीं यांजवर लांचा बद्दल कांहीं अर्ज झाले होते पण त्याचा निकाल झाला. अस्तु त्यांनीं इमानदारीनें काम करुन आपली अब्रू वाढवावी.

नंतर मी अमिनाचे कचेरीकडे गेलो एकानें घर दाखविलें त्याचे दाराशी जातों तों धडधड दोनच्यार कसबिणी बाहेर निघाल्या त्यावरुन मला वाटलें हें अमिनाचें घर नसावें नंतर जरा थामलों तों आतून एक नाका शिपाई निघाला त्याला विचारिलें अमीन कचेरी हीच काय? तो फार डोळेकाढून ह्मणाला हीच आहे. नंतर मी दबत दबत घराचें आंत गेलों आणि पाहिलें तों एक मोठ्या लोडाशीं एक हिंदुस्थानी मुसलमान अमीन बसले होते त्यांचे समोर जाऊन उभा राहिलों. पण घटकाभर तर त्यांची मजवर नजरच पुरली नाहीं नंतर कोण आहे? व क्यांकाम? ह्मणून फारच जोरानें विच्यारिलें. त्यावरुन मी फार भिऊन गेलो. नंतर विनंती करावयाची होती ती केली. मग बसण्याचा हुकूम झाला. महाराज, तेथें एक चमत्कार पाहण्यांत आला. तो असा कीं कारकून मंडळी व शिपाई वगैरे तेथेंच बसले होते व तेथेंच एक फाटका छिटाचा पडदा बांधला होता व त्याचे आंत एका सुशोभीत पलंगावर एक कसबीण बसली होती. वा: इनसाफाची अशा कामाची एकच जागा कोर्टांत अशी पूर्वी कधीं पाहिली नव्हती. सध्या एवढाच चमत्कार कळवितों. बाकीचा पुढें कळवीन कळावें. तारीख ३ जून सन १८७३ इसवी.

एक मुशाफर.

मेहेरबान नराराअखबारकू बंदगी:—

क्यु साहेब खेरियत तो हय, आपके तरफ च्यार अक्षर लिखके भेजी हय, इसको उपाय एक कोनेके उपर देवोगे तो म्हहात मेहेरबानगी होगी.

आपले तारिख ८ जून सन १८७३ चे पत्रांत जुना रिकार्डकिपर याने सूचना केली आहे. त्यावरुन त्याचे लिहिण्याचा विचार होण्यास दिरंग पाहिजे यांजकरितां मी आपणास कळविल्याप्रमाणें दुसरी रेसिडेंट साहेबांपावेतों मतासहित शिफारस केल्यास त्वरित काम होऊन लोकांस आणि कामगारांस विशेष सुख होईल— जळगाव आणि अडगाव याजमध्यें आणखी एक काढत असावें—त्याजला नवीन नेमणूक नको. बुलढाणें येथील पीरजादे अबदुलहक्क साहेब एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांजकडे काम फार नाहीं ह्मणोन ऐकतो. त्याप्रमाणें असल्यास त्यांजलाच त्या इलाख्यासहित इकडे आणावें. आणि पांचशें रुपये पावेतो अधिकार द्यावा व त्यांजला जो अधिकार आहे तो त्यांनीं स्टेशनचें हद्दींत चालवावा याप्रमाणें केल्यास लोकांस विशेष सुख होऊन सरकारचा फायदा होईल.

आणखी मी अशी विनंती करितो कीं, जळगाव आणि अडगाव यांत अंतर ३२ मैल आहे. व जळगावचा पश्चिम भाग १६ मैलांवर आहे. इकडील लोकांस जेव्हा अडगावीं साक्षीस जावें लागते तेव्हां आठ आण्याहून ज्यास्त भत्ता मिळत नाहीं. तेणेंकरुन कित्येक लोकांस उपाशी व पायीं रखडत जावें लागते आणि घरचे नुकसान होऊन शेवटी असा प्रसंग नयेवो ह्मणोन कशीतरी साक्ष द्यावी आणि परतावें. यांत फारच नुकसान असोन गरिबांस तर अशानें भांडें मोडून जावे लागण्याचा प्रसंग येतो तो न यावा ह्मणून अधिकारी आणि हुशार वकील यांणीं जरा नजर फेकावी म्हणजे सहज लक्षांत येईल. पत्रविस्ताराची माफी असावी ही विनंती. तारिख १० जून सन १८७३ इसवी.

जुन्या कोपरचा सिंध
वाचक.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

इलिचपुराहून वि. वि. आपली व माझी फार दिवस गांठ पडली नाहीं या कारणानें आपणास माझा विसर जाहला असेल परंतु तसें न करितां भेटीचा लाभ द्याल अशी आशा धरुन खालील मजकूर पाठविला आहे.

तारीख पंधरा रोजी दिवसा सुमारें चार वाजतां मी एथील लायब्ररीचे जवळून कांहीं कामानिमित्त जात असतांना लायब्ररींत कांहीं मंडळी जमलेली पहाण्यात आली यावरुन माझे मनांत जिज्ञासा प्राप्त जाहली कीं आंत काय गडबडगुंडा होत आहे तो पहावा सबब मी आंत एका कोपऱ्यांत जाऊन बसलो, आणि तेथील सर्व मजा पहात व ऐकत राहिलों तेव्हा असें माझे समजण्यांत आलें कीं लायब्ररीचे व्यवस्थे करितां ही सभा जमली आहे. सभेत सुमारें आठ दहा मेंबर होते. व त्या पैकीं सुमारें तीन असाम्यामीं आपल्या

लिहल्या उघडून कांहींसी मुक्ताफळें गाळलीं एथील लोकलफंड इंजिनीयर रा. रा. नानासाहेब जोशी हे फार विद्वान निस्पृही सज्जन आहेत. सर्व मेंबर लोकांनीं त्यास अध्यक्षस्थानीं बसण्याची विनंती केली त्यावरून कांहीं कोप आग्रहानंतर त्यांनीं ती मान्य करून अध्यक्षस्थान सुशोभित केलें.

मग लायब्ररीचे सेक्रेटरी यांनीं उठून सभेचें कारण प्रदर्शित केलें कीं, लायब्ररींत कांहीं बुकमिसिनरी फंड जमविला आहे त्याचीं कोणतीं बुकें घ्यावीं करावी हे ठरविणेंबद्दल ही आजची सभा आहे. त्यावर सर्वांचे अनुमतें असें ठरलें कीं पुढें एखादे वेळीं लायब्ररीच सबकमिटीनें येथें बसून बुकांची याद करावी अगर मेंबराचे घरोघर याद फिरवून, बुकांची नांवें जमवून बुकें खरेदी करावीं.

ह्या एडिटरास डोंगर पोखरून उंदीर काढणें यासच ह्मणावें कीं नाहीं? असा प्रश्न वाटेल कीं, ज्याअर्थीं येवढाले गृहस्थ जमले आहेत त्याअर्थीं येथें कांहीं तरी उपयुक्तविषयावर वादविवाद होऊन कांहींशी मजा पहावयास सांपडावी. परंतु असें आमचें नशीब कोठचें? येथें चांगले इंग्रजी विद्वान आहेत पण लोककल्याणार्थ झटणारा त्यांत कोणीही दिसत नाहीं. सर्व आपआपले निजानंदांत दंग आहेत. खरेंच आहे. का निजानंदांत असू नये? त्यांना का पोटाची काळजी आहे कीं काय? ईश्वर कृपेनें त्यांना पगार चांगले मिळतात मग आपले देशबांधवांचें कांहीं का होईना! त्याची काळजी त्यांनीं कशाला करावी? पराया आहे परदुःख फार शीतळ असतें त्याकरितां कोणीही दुसऱ्याकडे लक्ष पुरवीत नाहींत. परंतु एडिटरसाहेब आपण या अशा विचाराचे विद्वानास दोष दिल्यावांचून राहणार नाहीं. असो. येथील विद्वान व विचारी गृहस्थ ह्मटले ह्मणजे शाळाखात्याचे इन्स्पेक्टर, हेडमास्तर, लोकलफंड इंजिनीयर, वकील लोक व दुसरे कित्येक आहेत. त्यांस असो विनंती करतो कीं त्यांनीं आपल्या शहाणपणाचा व द्रव्याचा कांहीं योग्य व्यय करून आपले देशाचे कल्याणाकरितां झटावें नाहीं तर जोंवर काळ पावेतों हे जग असणार तोंवरकाळ पावेतों आपले देशबांधवास व पोराबाळांस गुलामाचे स्थितींत राहावें लागणार आहे. आपण सुज्ञ आहांत सबब आपले झटण्यानें कांहीं ना कांहीं उपयोग होण्या सारिखा आहे. परंतु अंतःकरण पूर्वक झटलें मात्र पाहिजे. खरोखरच येथें बरेच विद्वान असून या ठिकाणीं कांहींच सुधारणूकेचा पाया नाहीं ही मोठी लांछनाची गोष्ट आहे. तरी याकडे सर्वांनी लक्ष पुरवून कांहीं सुधारणूकेचा पाया करावा हे भूषणास्पद आहे. विस्तार भयास्तव पुरें करितो. कळावें हे विनंती.

एक सभेस जाणारा

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:

साहिब नि. वि. तारीख ११ रोजीं रात्रीं सुमारें ९ वाजतां रा. रा. वामनराव प्रभाकर एथील इं. म. शाळेचे हेडमास्तर यांचे सन्मानार्थ सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं रा. रा. आत्माराम भिकाजी ए. अ. कमिशनर हे होते. सभेंत प्रथमतः वामनरावजीचे संबंधानें गद्यपद्यात्मक लिहून आणलेला निबंध वाचला. नंतर मुलांनीं एक बुक वामनराव यास देण्याकरितां प्रेसिडेन्ट साहेबांस विनंती केली व प्रेसिडेन्ट साहेबांनीं ही एक दोन मिनिटें तत्संबंधी भाषण करून तें बुक त्यांस नजर केलें व तें वामनरावजींनीं मोठ्या आदरानें स्वीकारिलें. नंतर वामनराव यांणीं निरोपासून नके यावर थोडेसें भाषण केलें. आतां तें भाषण ह्मणजे फारसें वर्णनीय होतें असें नाहीं वामनरावजींनीं त्यांचे जागेवर नवीन आलेले मास्तर रघुनाथराव यांचेविषयीं कांहीं चांगलें बोलून आपलें भाषण संपवावयाचें होतें. व असें केलें असतें तर ते रघुनाथराव यांच्या विद्वत्तेस योग्य असून ते सध्या पगार कमी झाल्यामुळें दुःखी आहेत त्यास थोडेंसें समाधान वाटलें असतें परंतु तसा प्रकार बिलकूल झाला नाहीं. वामनरावजींचें भाषण आटपल्यावर पानसुपारी अत्तर गुलाब वगैरे वाटून सभा विसर्जन झाली.

रा. रा. वामनरावजी हे येथून अकोल्याकडे जाण्याकरितां तारीख १३ रोजीं प्रातःकाळीं निघोन गेले. हे फार लोकप्रिय असल्यामुळें एथील लोक जे जाणून त्यांस जाणत होते ते त्यांकरितां फार हळहळले.

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान एथील डे. ए. इन्स्पेक्टर हे तारीख ३० माहे मे रोजीं एथून त्यांची बदलीची जागा यवतमाळ एथें जाण्याकरितां निघोन गेले त्यांचे जाण्याचे अधले दिवशीं यांचे करितांही एक सभा भरली होती. परंतु ही सभा न होती तर बरें होतें. कारण एकतर सभेंत मंडळी फारशी नव्हती व दुसरें कोणी चार शब्द त्यांचेविषयीं बोलावयाचे ते बोलले नाहींत. आपआपल्या जागेवर बसूनच त्यांचेविषयीं कांहीं बोलत व मध्येंच एकानें उठून ही सभा भरण्याचें कारण काय एवढें मात्र सांगितलें अशा सभेंत प्रथमतः कोणीतरी उठून जाणाराचे गुणदोष वर्णन करावे आणि ते झाल्यावर जाणारानें सर्वांची परवानगी घ्यावी. शेवटीं रा. रा. बजाबा उठून मित्र मंडळींतून जाण्याबद्दल दुःख प्रदर्शित करून अखेर सर्वांची परवानगी घेतली. पुढें पानसुपारी वाटणें झाल्यावर सभा बरखास्त झाली.

रा. रा. बजाबा रामचंद्र हे गृहस्थ फार विद्वान, शांत व गंभीर असे असत. त्यांची काम करण्याची धाटणी तर खचीतच कित्ता घेण्याजोगी आहे त्यांचे तोंडांतून गैरवाजवी शब्द असा कधीही निघावयाचा नाहीं. त्यांनां आपले हाताखालचे लोकांना कसें वागवावें हें फार चांगलें माहीत आहे. हे एथील म्युनिसिपाल कमिटीचे सेक्रेटरी होते. म्युनिसिपालिटीची सुधारणा बरीच झाली आहे परंतु जाणण्यासारखी नाहीं. आतां त्यांचे मागें मात्र दुसरे एखादे नवीन विद्वान नेमिले जाई पावेतों होती त्यापेक्षां फार वाईट स्थितींत ती येण्याचा संभव आहे. रा. रा. बजाबांनीं एथें लायब्ररीची इमारत मोठी मेहनत घेऊन बांधली आहे कीं ती पाहतांच त्यांचे स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. हे म्युनिसिपाल कमिटीचे सेक्रेटरी होते ह्मणून एथील सर्व लोकांना व विद्याखात्याचे डिपुटी इनस्पेक्टर ह्मणून हे बहुतेक जिल्ह्यांतील लोकांना माहीत होते. व त्यांनीं दोनीही कामें फार चांगले रीतीनें केलीं ह्मणून त्यांचे जाण्यापासून कोणास दुःख होणार नाहीं असा विरळा. म्युनिसिपालिटीच्या संबंधानें कांहीं लोकांना वाईट वाटत नसेल परंतु असेही लोक फार थोडे सांपडतील. त्यांची बदलीवर बदली झाली एवढ्या वरूनच कांहीं बरें वाटतें. असो त्यांचे जागेवर येणारे रा. रा. विनायकराव रामचंद्र भाटवडेकर हे ही दोन्ही कामें (म्युनिसिपाल कमिटीचे सेक्रेटरीचे यांचेकडे दिल्यास) मोठ्या हुशारीनें व नेकीनें करून लोकप्रिय होतील अशी आशा आहे कळावें लोभ असावा हे विनंती.

आपला मित्र
लोकहितेच्छू.

# वऱ्हाडसमाचार.

मिती ज्येष्ठ वद्य १३ शके १७९५.

## बडोदासंस्थान.

आमच्या हिंदुस्थानांतील संस्थानिकांविषयींच्या जेव्हां गोष्टी निघतात तेव्हां बडोद्याची कारकीर्द त्यांत उपहासास्पद निघते अशी कित्येक वर्षांची व त्या गादीच्या दोन तीन पिढ्यांची गोष्ट पाहून फार वाईट वाटतें. ती स्थिती आतां सुधारण्याचा कांहीं रंग दिसतो व त्या प्रमाणें लौकर घडून आलें तर त्या संस्थानचें प्रारब्ध चांगलें ह्मणावयाचें. आजपर्यंत त्या दरबारास जे रेसिडेंट झाले ते केवळ तोंडापुरतें गुळचट बोलून पानावर पान ढकलणार होते त्यास बडोदे संस्थानाचे दोष दिसलेच नाहींत ही त्यांच्या नजरेची गोष्ट आहे. पण लिहिण्यास संतोष वाटतो कीं हल्लीं तेथें कर्नल फेर साहेब या नावाचे नवीन रेसिडेंट झाले आहेत ते हुशार, धीट, चलाख, व निस्पृह आहेत असें दिसतें. व तेच त्यांचे गुण खरे ठरतील व कायम राहतील तर त्यापासून त्या संस्थानचें बदनाम जाण्याचा संभव आहे.

कर्नल फेर साहेब रेसिडेंट, प्रांतांत फिरावयास गेले होते तेव्हां गांवगन्ना त्यांस कित्येक अव्यवस्था वगैरे गोष्टी दिसून आल्या त्याबद्दल त्यांनीं श्रीमंत रा. मल्हारराव गायकवाड यांस त्यांचा बंदोबस्त करण्याविषयीं लिहिलें त्यांनीं ठीक आहे. करतों, करवितो अशा दिलाईच्या गोष्टी सांगितल्या व प्रांतांतून कांगाळ्या पुष्कळच येऊं लागल्या तेव्हां रेसिडेंट साहेब मुंबईचे गवरनर साहेब यांस भेटण्याकरितां व बंदोबस्ताकरितां स्वतां आले व ते अजून परत गेले नाहींत. गायकवाडाशीं गवरनर साहेबांचा कांहीं पत्रव्यवहार चालला आहे त्या पासून आतां काय निष्पन्न होतें तें समजेल.

या रेसिडेंट साहेबांच्या निस्पृहपणाचीं हीं दोन तीन उदाहरणें दृष्टोत्पत्तीस आलीं आहेत. हे मुंबईस आले तेव्हां गायकवाडांनीं मुंबईचे आगगाडीचे स्टेशनावर गाड्या वगैरे घेऊन जाण्याविषयीं टेलिग्राफ केला होता व त्या प्रमाणें गाड्या आल्या होत्या परंतु रेसिडेंट साहेबांनीं त्या गाड्या आह्मांस नकोत ह्मणून सांगितलें तसेंच आजपर्यंतचे रेसिडेंट साहेबांस गायकवाड दरबारांतून धान्यसामग्री जात असे त्याप्रमाणें फेर साहेब यांजकडे सामुग्री आली तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं आह्मी इंग्लिशसरकारचे नोकर आहों आह्मांस तुमच्या तसतुदीची कांहीं जरूर नाहीं. तिसरी एक गोष्ट नवे रेसिडेंट साहेबांस अशी समजली कीं रेसिडेंन्सी आफिसांतील कांहीं लबाड लोक महत्त्वाच्या गोष्टींच्या बातम्या गायकवाड दरबारास गुप्त रीतीनें देत असतात त्यावरून यांनीं चौकशी करून कांहीं संशयी लोक होते त्यांस हाकून दिलें. तसेंच गायकवाड सरकारांनीं दर आठवड्यांत दोन वेळां रेसिडेंट साहेबाचे भेटीस जात जावें असा पूर्वापार संप्रदाय होता तोही यांनीं मोडून टाकिला रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं तुह्मी आपणाकडे हमेशा येण्याचें कारण नाहीं व आमचे भेटीची तुह्मास जेव्हां जेव्हां गरज लागेल तेव्हां तेव्हां आह्माला कळवित जावें ह्मणजे आह्मी तुमची भेट घेत जाऊं. इत्यादि कित्येक गोष्टी बडोद्यास घडणें अश्रुत होते त्या घडून आल्या आहेत. ह्मणून सुधारणेची उमेद दिसते मग पुढें पहावें.

## मूर्तिजापुरचा मारुती.

येथें गेल्या आठवड्यांत मारुती या नावाचे मूर्तिजापुरच्या मोहरिराचे चिरंजीव साधू बनून आले होते व कित्येक लोक आणि बाया त्यांच्या भजनीं लागल्या होत्या. आह्माला फार वाईट वाटतें कीं, लोकांना अजून साधू असाधू कळत नाहीं. नुसतें बावा ह्मटलें कीं लोक लागले यांचे पाठीमागें, मग पोटाचा उद्योगही घटकाभर मागें पडला तरी चिंता नाहीं. व अशा लोकांच्या डोळ्या पाहिल्या ह्मणजे बुवाचीही पोळी चांगली पिकते. मग शिष्यसाधक कोणी असतातच. ते बुवाची तारीफ करितात. या मारुतीबुवाविषयीं ही असेंच झालें. त्याविषयीं येथें अशाच वार्ता पसरल्या होत्या कीं त्यांनीं कोणी गणु पाटील नावाचा उमरावतीचा मनुष्य मेलेला उठविला. मुंबईस समुद्रस्नान करी

त असता बुवा माहून हे द्वारकेस जाणें झालें, त्रिंबकेश्वरीं देवाच्या मुलाला यांनीं दुधाचा प्याला लाविल्याबरोबर त्या देवाच्या मूर्तीनें दूध पिऊन टाकिलें. नाशकास रामकुंडांत तांब्या बुडविला व तो दुधानें भरून काढिला अशा अनंत वार्ता बुवा येथें येतांच बाहेर निघाल्या. मग येथेंही बुवानीं कोणाला नारळ, कोणाला खडी साखर वगैरे प्रसाद देणें आरंभिलें. हें पाहून कित्येक धूर्त व चिकित्सक मंडळी त्यांचें बुवापण शोधण्याच्या तजविनीस लागली. व थोडा शोध केल्याबरोबर त्यांची खात्री झाली कीं, बुवा ढोंगी आहेत. कोणाला नारळ किंवा खडी साखर द्यावयाची म्हणजे त्याला रस्त्यावरचा एक दगड उचलून आणावयास सांगावें व तो दगड जवळ घेऊन अंगावरील धोत्राचे आंत घ्यावा. व कांहीं वेळानें धोत्राचे आंतून नारळ काढून द्यावा.[3] यांत साधूपणा राहो पण गारुड्यासारखें हस्तकौशल्य देखील कांहीं दिसून येत नसे. पण मूर्ख व भोळे लोक डोळे झांकून त्यांच्या कृत्यास दैवीक चमत्कार म्हणत. आम्ही बुवाकडे गेलों होतों तेव्हां आमच्या जवळच्या मुलास त्यांनीं चुनखडा दाखवून खडी साखरेचा प्रसाद दिला तो पाहून जवळचे सर्व लोक आश्चर्य करूं लागले. पण ती खडी साखर काढतांना आम्ही बुवाकडे चांगलें लक्ष दिलें होतें म्हणून त्यांची हिकमत सर्व आमच्या ध्यानांत आली. प्रथम ते उघडे बसले होते नंतर खडीसाखर काढावयाची म्हणून त्यांचे जवळचे एकमणानें त्यांचे अंगावर एक धोतर टाकिलें. मग बुवा धोत्राच आंत हात लोळवूं लागले. व शेवटीं त्यांनीं डाव्या कडोसरीची खडी साखर डाव्या हातानें हळूच काढून ती उजव्या हातांत लपवून घेतली व चुनखड्याचे वेळेस ती पुढें करून तो खडा मागें लपविला व पुढचे हातांत खडी साखर दिली. हा बनावटी आम्ही त्यांच्या प्रत्यक्ष पदरात घातली. तेव्हां ते आमचे मारुती (हीन पुच्छ!) फार फिके पडले. तरी ते माणसांसंबंध पाहती. वानरातले नव्हत म्हणून त्यांनीं फार माफ करून नेला कीं सायंकाळीं याहून विशेष साक्षात्कार दाखवून तुमची खात्री करूं. पण चमत्कार हा कीं बुवा पुढें च्यार दिवस येथें होते तरी साक्षात्कार दाखविण्यास त्यांना तोंड नवते. जे त्यांचे नित्याचे एक तोंड तें आम्हाला शिव्याची लाखोली वाहण्यास च्यारी दिवस सतत गुंतलें होतें. शेवटीं त्यांना कशानें पश्चात्ताप झाला तो नकळे. येथून गेले त्या दिवशीं आमचे घरीं येऊन पाया पडून क्षमा मागून चालते झाले. याप्रमाणें बुवाचा अकोल्याचा इतिहास आहे.

अशा कृत्यावरून या मारुतीला बुवा म्हणून जेंही खऱ्या साधुवाची निंदा करणें नव्हे काय! 'आम्ही लोकांस इतकेंच म्हणतो कीं, खरें नाणें पाहून भजनीं लागा. या मारुतीला जर बुवा म्हणावें तर गारुड्याच्या हंडीगाराला परम बुवा व दिल्लीचे दरिंगलबाल्या अबदुलहुसेनला परात्पर बुवा कां म्हणूं नये? ते यापेक्षां दसपट बरे. ते आपण साधू म्हणून लोकांस नाहीं तरी भावित नाहींत. असो आमच्या या एकल्या खिडक्यांत लोक आम्हास नास्तिक व छलक म्हणतील तर त्यास आमचा इलाज नाहीं पण आम्हीं नम्रतेनें त्यास इतकेंच कळविणें कीं, आम्ही खऱ्या प्रकारविषयीं नास्तीक नाहीं ढोंगाविषयीं नास्तीक आहों मारुती बोवाल्याही आम्ही आधिच विनंती केली होती कीं, तुम्ही धोतर व हाताची लठपट बाजूस ठेवा व आम्हाला खडीसाखरेच्या बदल गुळाचा खडा तरी काढून द्या व नारळाचे बदल एखादा खोबऱ्याचा तुकडा तरी काढून द्या पण तो येणार कोठून विहीरीतच खडखडाट असला तरकितांही पोहरे टाकले तरी त्यांत येणार काय?

## तिसरा पुनर्विवाह.

मुंबईस ब्राह्मण जातीच्या दोन विधवांचे पुनर्विवाह झाल्याचे वाचकांस ठाऊक आहेच. या आठवड्यांत बुधवारी तिसरा पुनर्विवाह पुनर्विवाहोत्तेजक मंडळीच्या सहाय्यानें मुंबईसच देशस्थ ब्राह्मणाचा झाला. ही गोष्ट ऐकून देशसुधारणेच्छु बहुत लोकांस संतोष झाल्या वाचून व नवी उमेद आल्या वाचून राहणार नाहीं. जी गोष्ट देशकालानुरूप अवश्यक ती न करण्याविषयीं कोणीं कितीही प्रयत्न केले तरी ती झाल्यावाचून रहात नाहीं. घरच्या मंडळींनीं जेऊं नको म्हणून सांगितलें व पोटांत भुकेची तळमळ आहे तर मुलगा त्यांचें न ऐकतां अन्न वाढून घेऊन जेवूं लागला मग त्यांनीं वरून धोंपाट्या घातल्या तरी तो ऐकणार नाहीं. हाच दृष्टांत या पुनर्विवाह कार्यास अनुरूप आहे. देशांत बालविधवा पुष्कळ झाल्या, नारकर्णींचा प्रळय झाला, गर्भपात, बालहत्या होऊं लागल्या, व्यांतून पुनर्विवाहाची चोकळीक दृष्टीस पडली. इतर जातींत प्रचार पाहिला, अन्य राष्ट्रांतील रितीभाती नजरेस आल्या, विधवांच्या दुःख शोकानें सहृदय मनुष्यांच्या छाती उलून गेल्या, व ईश्वराला गोष्ट आवडली. इतक्या सिध्दता झाल्यावर मग प्रतिबंध करणारांचें काय चालते! प्रथमचा वेणुबाईचा विवाह झाला तेव्हां जुन्या चालीचे व वृद्ध गृहस्थ बरेच खवळले होते व त्यांनीं शंकराचार्यास भरी घालून शास्त्रार्थाचे प्रकरण बरेंच माजविलें मग शंकराचार्य मध्यस्थ होऊन दोहों बाजूचा शास्त्री मंडळ घेऊन वाद विवाद केला व त्यात ओढाताण करून स्वामी महाराजांनीं जुन्या लोकांकडे डोळे लाऊन तदनुरूप इत्यर्थ ठरविला. व पुनर्विवाह अशास्त्र आहे आणि त्यास सहाय करणारे बहिष्कृत आहेत असें ठरविलें पण त्या बिचाऱ्या ठरावाचा कांहींच उपयोग झाला नाहीं. लोकांनीं शंकराचार्यांस दोष लाविला व पुनर्विवाहोत्तेजकांनीं धडकून एक दुसरा पुनर्विवाह केला. व आतां हा तिसरा झाला पहिल्या दोघींस दोन आपत्यें झालीं आहेत त्याचप्रमाणें हिला होवोत व तीं सर्व चिरायु असोत आणि देशसुधारणेच्छू लोकांच्या पगलाचा ठसा म्हणून जगांत भूषणानें मिरवोत, व असेच पुनर्विवाह वर्षास कित्येक होवोत व ज्यांत मिसळणारास जे थोडें बहूत जातीचें प्रस्तुत भय वाटत आहे तें नष्ट होवो आणि कोठें विधवा झाली कीं, लोक हौसेनें तिचा पुनर्विवाह करोत असें आम्ही इच्छितो.

या बुधवारीं जो पुनर्विवाह झाला त्यांत नागपुरा कडील रा. रा. गजानन पांडुरंग माहगीर देवळीकर हे वर आहेत व त्रिंबकराव सिताराम तावसे नागपुरकर यांची कन्या कौडुबाई ही वधू आहे मुलीचे वय १२ वर्षांचें व मुलाचें ३९ वर्षांचें आहे. विवाहसमारंभ मुंबईस मुकूंदराव गचंद्रजी यांच्या नव्या बंगल्यांत झाला. या लग्नाच्या कुंकूमपत्रिका रा. रा. काशिनाथ बाळकृष्ण मराठे बि. ए. व रा. रा. भवानी विष्णु काथवटे बि. ए. यांच्या सहीच्या वाटल्या गेल्या. लग्नकार्य निर्विघ्न पणें तडीस गेलें.

## वऱ्हाड

येथिल हायस्कुलांतिल विद्यार्थ्यांनीं काल रात्रीं नाटक केलें. त्याविषयीं पुढें लिहूं.

—000—

रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर बि. ए. उमरावती हायस्कुलांतील १७९ रुपयाचे फर्स्ट असिस्टंट मास्तर यांस मि॰ क्यांडी साहेब डायरेक्टर यांनीं एकदम १०० रुपये पगारावर बाशीमास नेमिलें ते ऐकिल्यावर रघुनाथराव डायरेक्टर साहेबांस भेटण्याकरिता चिखलदऱ्यास गेले होते व त्यांनीं आपला सर्व आहवाल त्यांस सांगितला पण त्यांचें मन त्यावर दया करण्याविषयीं जें एकदां पराङ्मुख झालें आहे तें कांहीं केल्या वळत नाहीं हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. बिचारे रघुनाथराव निरुपाय होत्साते बाशीमास नवे जागेवर रुजू होण्याकरितां निघून गेले. न्यायाचें मुख्य धोरण असें आहे कीं, संशयानें निरपराध्याला शासन होण्यापेक्षा अपराधी मोकळा करावा आणि सदरील गोष्टींत रघुनाथराव अपराधी नाहींत, व क्यांडी साहेब विचारी आणि दयाळू आहेत सबब अजून त्यास रघुनाथ रावाच्या प्रकरणांत बारीक विचार करण्याची कृपाळू ईश्वर बुद्धी देवो.

—000—

रा. रा. वामन प्रभाकर पराजपे एथील नार्मल स्कुलाचे प्रिन्सिपाल गेल्या रविवारीं एथें येऊन सोमवारीं आपले कामावर रुजू झाले.

—000—

इलेचपुरास या महिन्याचे पहिले तारखेपासून अवझरवेटरी सुरु झाली.

—000—

खामगावास या सालच्या हंगामाला सुमार सवाकाल बाजांचो देव घर झाली असें समजतें.

—000—

उमरावतीस पोष्ट आफिसावर वीज पडली ती एका दारानें येऊन दुसरे दारानें निघुन गेली कोणा मनुष्याला म्हणण्या सारखी इजा झाली नाहीं दारेमात्र खोळखांळीं झाली आहेत.

—000—

मेजर बेल साहेब पार्श्विग वऱ्हाडचे कमिशनर यांची स्वारी शुक्रवारी सरकार कामानिमित्त उमरावतीस गेली आहे.

—000—

मि॰ क्यांडी साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर चिखलदऱ्याहून गुरुवारीं येथें आले.

मागाहून आलेली नोटिस.

नोटिस—साया वल्लद कृष्णा चवाग्या कुणबी राहणार कुटासें तालुके अकोट यांस उत्तमचंद नथमल राठी मारवाडी वहिवाटदार संतुकराम दुकान कुटासें यानकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे कडे आमचे ऐन ११०० रुपयाचे पुरणा बदल व्याजासुद्धां रक्कम येणें आहे. त्याबदल तुम्हाला मी कित्येक वेळा तगादा केला तेव्हां पाडव्याचे सुमारास पांच पंच पेमराज मारवाडी, हस्तराम मारवाडी, जानजी ढोरे, त्र्यंकटराव देशमुख, परशराम बावले यासमक्ष तुम्ही आमचे घरीं येऊन तोंडीची कबुलायत केली ती अशी:—

च्यार दिवसांत २०० रुपये रोख व एक बैलाची जोडी, एक म्हैस व ७९ रुपये सरकार साऱ्याचीं दोन शेतें इतका माल लागलीच ताब्यांत द्यावा व १००६. मार्गशीर्ष शुध्द १९ रोजीं द्यावे असा करार झाला व त्या प्रमाणें दुसरे दिवशीं एक बैल तांबडा तुम्ही आमचे स्वाधीन केला बाकी कांहीं दिलें नाहीं. यावरून तुम्हाला ही नोटिस मुद्दाम दिली आहे तर ८ दिवसांचे आंत आमचा सर्व माल व रुपये करारामाणें तुम्ही आमचे घरीं आणून द्यावे. तसें न केल्यास हा करार रद्द समजावा. मग आम्ही पुरणाबद्दल तुम्हावर कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेऊं व तुमचे बैलाबद्दल ४० रुपये तुमचे जमा करून घेऊं कळावें तारिख १९ माहे जुन सन १८७३ इ॰

(सही) उत्तमचंद नथमल राठी
मारवाडी वहिवटदार संतुकराम दुकान कुटासें.

## वर्तमानसार

सुरतजिल्ह्यांतून वेगवेगळ्या वेळीं चोरी झालेला माल सुमार एक लाख रुपयाचा मंबुतरास मिळाला असें समजतें.

इंदुरास होळकर सरकारांनीं ११ लक्ष रुपये खर्चून कापड विणण्याची यंत्रे आणिलीं आहेत त्यांवर एक युरोपियन सुपरइंटेंडेंट आहे. व नाजूक भरडी वस्त्रें यांत तूर्त तयार होतात.

नागपूर प्रांतांतील बालाघाटचे पोलिस सुपरइंटेंडेंट मि॰ एटकीनसन साहेब यांनीं एका शिपायास कमी पगारावर पाठविलें तो द्वेष मनांत धरून त्यानें साहेबावर गोळी चालवली व तेणें करून ते मरण पावले.

नाशिकजिल्ह्यांतील निफाडचे चिफ कानस्टेबल यांनीं ११ रुपयाचे चोरीचा पत्ता एका मनुष्याचे अंगीं लावण्याकरिता त्याला मारिलें तेणेंकरून तो ठार मेला. त्यावरून चीफ कानस्टेबल यांजवर खटला होऊन यांस १० वर्षें सक्त मजुरी कैदेची शिक्षा झाली. व त्याला मदत करणाऱ्या जमादाराला ९ वर्षें हवालदाराला ३ वर्षें व एका शिपायाला दोन वर्षें कैदेची शिक्षा झाली बिचारा चीफ कानस्टेबल पूर्वी स्कुलमास्तर होता व भाऊ शिंदेनें चीफ होऊन त्यास तीन महिने झाले होते.

मुंबईंतील कांहीं वकील लोक कोर्टें बाहांत वकिलीचें काम करण्याकरितां जाणार आहेत अशी बोलवा आहे.

शके १७९५ यंदा ज्येष्ठ वद्यांत ८ व ९ आणि आषाढ शुद्धांत ४, ६, ९, व १२ असे एकंदर ६ मुहूर्त लग्नाचे आहेत.

हैदराबाद स्टेट रेल्वेचा पन्नास मैल रस्ता पुढच्या महिन्याच्या अखेरीस जाण्या येण्याच्या कामीं चालू होईल असें कळतें.

जुनागडच्या हायस्कुलाच्या हेडमास्तराच्या जागेवर मि० रामचंद्र गोविंद गनगळ यांची नेमणूक झाली असें समजतें.

लखनौ येथील पोलिसमध्यें मि० नसरवानजी म्हणून एक पार्शी गृहस्थ होते. यांनीं चांगल्या कामगिरीच्या बजावण्या याजमुळें त्यांस तेथील पोलिस सुपरीटेंडेंटची जागा मिळाली.

रशियनची खिवावरची स्वारी—टिफ्लिस व कस्नान्स्क या दोन टोळ्या ता० २४ एप्रील रोजीं चराट येथें मिळाल्या. ता० २७ रोजीं खिवान लोकांनीं रशियाच्या पुढच्या टोळीवर चराट जवळ हल्ला केला. रशियन लोकांचे दोन कर्नल मेले, परंतु खिवन लोकांची सर्व दाणादाण झाली. जनरल कॉफमान यांचा पराभव झाला म्हणून सेंटपिटर्सबर्ग येथें गप्प आहे.

इं. प्र.

## विलायत सरकारचें उत्पन्न

आपल्या हिंदुस्थान देशाचा व इंग्रज लोकांच्या देशाची विस्तीर्णपणा व उत्पन्न या संबंधानें तुलना केली म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें. आपला देश मोठा व लोकवस्ती ही तशीच अतिशय मोठी असून आपल्या देशाचें उत्पन्न इंग्रज लोकांच्या देशाशीं ताडून पाहिलें म्हणजे फारच कमी आहे असें दिसून येतें. इंग्रज लोकांचा देश फार लहान आणि लोक वस्तीही फारच कमी असें असतां त्यांचें उत्पन्न आपल्या उत्पन्नाच्या दिडीनें ज्यास्त आहे. यंदाच्या अनुमानाप्रमाणें पाहिलें तर आपलें एकंदर सर्व मिळून ४८,७७,१०,००० रु० आणि त्यांचें एकंदर ७३,७६,२०,००० रु० उत्पन्न होईल असें अनुमान आहे. इंग्लंडच्या राज्याच्या पैशाच्या संबंधाचें मुख्य कामगार लो साहेब यांनीं एकंदर उत्पन्नाचा अनुमान ७६,६१,७०,००० रु० केला आहे. यापैकीं साखरेवरची पट्टी व प्राप्तीवरील कराचा दर कमी करण्याचा विचार केला होता त्या मानानें पाहिलें तर एकंदर उत्पन्न ७३,७६,२०,००० रुपये होते. आतां इंग्रजचें एवढें मोठें उत्पन्न कोणत्या प्रकारावर होतें हें दाखविण्याकरितां त्याची मुख्य सदरवारी देतों.

| | |
|---|---|
| कस्टम [येणाऱ्या जाणाऱ्या मालावरची जकात] | २१,०३,३०,००० |
| एक्साईज (दारूवगैरे देशांतील मालावरची जकात) | २६,७४,७०,००० |
| स्टांप | १०,०९,००,००० |
| जमीनीचा सारा व घरपट्टी मिळून रकम | २,३६,००,००० |
| प्राप्तीवरील कर | ७,००,००,००० |
| पोस्ट हपीस | ५,०१,२०,००० |
| तारायंत्र | १,२२,००,००० |
| क्रौनलांड्स (सरकारी जमीनी) | ३७५०००० |
| किरकोळ जमा | ३,८३,००,००० |
| | ७६,६१,७०,००० |

सदरील दिलेल्या तपशिलावरून विलायतेंत जमिनीचें उत्पन्न घरपट्टी मिळून अगदींच थोडें म्हणजे सारे दोन कोटी पस्तीस लक्ष आहे. तेव्हां त्या देशाचें मुख्य उत्पन्न जकातीचें आहे. जमिनी सर्व बडे लोकांस वगैरे देऊन टाकल्या आहेत. अथवा प्रजेच्या म्हणून समजलेल्या आहेत. आपल्या इकडच्या सारिखें सरकार जमिनीचें मालक नाहीं. किरकोळ शेती करणारे तिकडे नाहींत. तेव्हां सर्व मोठें उत्पन्न काय ते जकातीचेंच आहे. कस्टम बद्दल आपल्या देशाचें उत्पन्न सारे दोन कोटी सत्तावन लक्ष आहे आणि त्यांचें एकवीस कोटीवर आहे. याजवरून त्या देशाचा केवढा जबरदस्त व फायद्याचा व्यापार आहे हें स्पष्ट सिद्ध होतें. तसेंच एक्साईज म्हणजे दारू व दुसरे पदार्थ यांजवरच्या जकाती बद्दल आपल्या इकडचें उत्पन्न २,२३,६०,००० आहे आणि त्यांचें २६,७४,७०,००० रु० आहे. या सर्व एवढ्या जकातीचें ओझें सोसण्या सारखें सामर्थ्य इंग्लंड देशास अगर लोकांस आहे याजवरून त्यांचा व्यापार व त्यांचा श्रीमानपणा हीं चांगलीं दिसून येतात. आतां त्या देशाच्या उत्पन्नाप्रमाणें खर्चही मोठा आहे. या सालचा एकंदर चालू खर्च ७१,८८,१०,००० रु० होईल असें अनुमान आहे. या शिवाय येत्या आक्टोबर महिन्यांत इंग्रज सरकारास आलाबामा जहाजाच्या तंट्याबद्दल अमेरिकन सरकारास ३,२०,००,००० रु० दंड देणें आहेत त्यांस पैकीं निमे यंदाच्या उत्पन्नातून देऊन बाकी निमे कर्ज काढून देणार असें आहे. बाकीचें उत्पन्न साखर व प्राप्तीवरील कर यांचा दर कमी करण्याकडे लावणार म्हणजे तितका वसूल मुळींच कमी होईल.

ने. ओ.

## इंडियन फिनान्स कमीटीचा रिपोर्ट.

हिंदुस्थानच्या उत्पन्न खर्चाच्या स्थितीविषयीं चौकशी करण्या करितां पार्लेमेंट सभेनें नेमलेल्या कमीटीनें पार्लमेंट सभेस तारीख ९ माहे मे सन १८७३ रोजीं केलेल्या रिपोर्टाचा सारांश वाचकांस कळविला पाहिजे. आजपर्यंत कमिटी समोर बहुतकरून सरकारी नोकरांच्याच साक्षी झाल्या आहेत. असें जरी आहे तथापि हिंदुस्थानच्या राज्य संबंधी व उत्पन्न खर्चाविषयीं कित्येक चमत्कारिक गोष्टी बाहेर पडल्या आहेत. थोड्या दिवसां पूर्वीच्या टाइमस आफ इंडियांत लंडनाहून आलेलें पत्र छापलें आहे त्यांत असें लिहिलें आहे कीं, इंडिया आफिसांत जाऊन तेथे तयारी करून मग कित्येक साक्षीदारांनीं कमिटीसमोर साक्षी दिल्या. साक्षीदारास प्रश्न कोणचे करावयाचे व त्यानें उत्तरें काय द्यावयाचीं हें अगोदर ठरविण्याचें कमीटीसमोर एक उदाहरण घडल्याचें वाचकांस आम्ही पूर्वी कळविलें आहे. यामुळें व दुसऱ्या कित्येक गोष्टींवरून, आज पर्यंत कमीटीस मिळालेली माहिती सर्वांशीं विश्वासनीय नाहीं असें कित्येकांचें मत झालें आहे. असा प्रकार आहे तेव्हां कमिटीनें हिंदुस्थानांत येणें होऊन या देशांत चौकशी झाली असती म्हणजे बरें होतें. परंतु तसें आतां होईल असें दिसत नाहीं. नेटिवांच्या कमीटीसमोर साक्षी घेण्याविषयीं कमीटीनें पार्लमेंट सभेस केलेल्या आपल्या रपोर्टांत एणप्रमाणे लिहिलें आहे:—

आजपर्यंत कमीटीसमोर सरकारी नोकरांच्याच साक्षी झाल्या आहेत परंतु कमीटीसमोर योग्य नेटिवांच्या साक्षी झाल्या असता फार चांगलें होईल व त्यांच्या साक्षी घेण्यास कमीटी तयार आहे. आज पर्यंत कमीटीसमोर नेटिव साक्षीदार आले नाहींत. परंतु चालू सेशनाच्या आरंभीं ईस्टइंडिया असोसिएशनचे सेक्रेटरी यांजकडून असें लिहून आलें कीं, मुंबई असोसिएशन व पुणें सार्वजनिकसभा आपल्या तर्फे नेटिव साक्षीदार पाठविण्यास तयार आहेत. यावरून व दुसऱ्या कित्येक गोष्टींवरून कमीटीच्या नजरेस असें आलें कीं, नेटिवांच्या साक्षी घेण्याची कमीटीची इच्छा आहे असें कदाचित नेटिवांस माहित नसेल. व साक्ष देण्यास्तव येण्याकरितां नेटिवांच्या मार्गांत काय अडचणी आहेत हे कमीटीस समजत नसेल या गोष्टीविषयीं संशय राहू नये व कमिटी नेटिवांच्या साक्षी घेण्यास इच्छित आहे असें, हिंदुस्थानांत हिंदुस्थान सरकारानें जाहीर करावें अशी तजवीज करविण्याच्या इच्छेनें कमीटीनें सेक्रेटरी आफ स्टेट यांस मात्र लिहिलें. याप्रमाणें तजवीज करण्यास्तव आम्ही हिंदुस्थान सरकारास कमीटीच्या सूचनेप्रमाणें पत्र लिहिणार आहेत असें सेक्रेटरी आफ स्टेट यांचें उत्तर आलें. सेक्रेटरी आफ स्टेट यांणीं या बाबतींत आपलें असें मत कळविलें कीं, नेटिवांचा येण्या जाण्याचा खर्च दिल्या खेरीज साक्ष देण्याकरितां नेटिव लोक यावयाचे नाहींत सेक्रेटरी आफ स्टेट यांच्या सदरहू पत्राचा हिंदुस्थान सरकाराकडून तारायंत्र द्वारें तारीख १८ माहे एप्रिल रोजीं असा जबाब आला कीं, नेटिवांच्या साक्षी घेण्या करितां कमीटी तयार आहे असें प्रसिद्ध करू नये, व असें केलें तरी, विलायतेस साक्ष देण्याकरितां जाणाऱ्या नेटिवांस खर्च दिल्यावांचून कोणी जावयाचे नाहीं. या करितां कमीटीनें प्रश्न पाठवावेत. हिंदुस्थानांत प्रश्न पाठवून माहिती मिळविणें बरोबर नाहीं असें कमीटीस वाटलें, व खर्च देण्याविषयीं हिंदुस्थान सरकारानें केलेल्या सूचनेविषयीं असा ठराव केला कीं, जे साक्षीदार कमीटी पसंत करील त्यांचा खर्च विलायत सरकारानें द्यावा. खर्चाची एकंदर रकम एका लक्षा पेक्षा ज्यास्त होऊं नये. हा ठराव कमिटीनें विलायतचे खजिनदार यांजकडे पाठविला परंतु ही गोष्ट खजिनदारानें कबूल केली नाहीं. खजिनदार यांनीं असें लिहून पाठविलें कीं, हा खर्च विलायत सरकारावर घालणें वाजवी नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करितां कमिटीचें मत असें आहे कीं, नेटिवांच्या साक्षी घेणें महत्वाचें असून, ते साक्ष देण्यास्तव येण्याच्या मार्गांतल्या अडचणी असतील त्या सुगम केल्या पाहिजेत. या गोष्टीचा विचार होण्याविषयीं कमीटी ( पार्लमेंट ) सभेस सुचवीत आहे.

येणेंप्रमाणें कमिटीच्या रिपोर्टाचें तात्पर्य आहे. आतां या गोष्टीचा पार्लमेंटसभा विचार करून काय ठराव करणार असेल तो असो. परंतु या कामीं कमिटीच्या सूचनेप्रमाणें एक लक्ष रुपये खर्च करण्याचा पार्लमेंट सभेनें जरी ठराव केला तथापि त्या पासून कमिटीचा हेतु सिद्धीस जाईल असें आम्हास वाटत नाहीं. एक लक्ष रुपयांत फारतर दहा वीस नेटिव विलायतेस जाऊं शकतील. पण अगोदर खर्च देऊन ही विलायतेस जाणारे व साक्ष देण्यास योग्य असे किती नेटिव विलायतेस जाण्यास तयार होतील याचा मोठाच संशय आहे. कमिटीचे जे सभासद जरी हिंदुस्थानात आले ते तरी बरें होतें. परंतु तसें व्हावयाचें नाहीं. खर्च देऊन नेटिव साक्षीदार नेण्याची तजवीज अगदीं फुकट आहे हें उघडच दिसत आहे. हिंदुस्थान सरकारच्या सूचनेप्रमाणें कमिटीनें प्रश्न जरी पाठविले असते तरी होतें. परंतु ही गोष्ट कमिटीच्या येत नाहीं. सारांश कमीटीसमोर हिंदुस्थानच्या लोकांचें म्हणणें जाण्याचा दिसत नाहीं ही दुःखाची गोष्ट परंतु हा मजकूर संपविण्यापूर्वी नें एका गोष्टीविषयीं लिहिल्यावांचून हवत नाहीं. ती अशी. हिंदुस्थानांतून विलायतेस जाणाऱ्या नेटिवांच्या करितां एक लक्ष रुपयांचा खर्च त सरकारावर घालणें रास्त नाहीं विलायत सरकारच्या जामदारखान्याच्या प्रधानानें सांगितलें हें पाहून फार वाटतें! आम्ही सदरहू प्रधानास विचारतों कीं, तुर्कस्थानचे बादशहा यतेस गेले होते त्या वक्तीं त्यांस त सरकारानें मेजवानी करून ति एक लक्ष रुपये हिंदुस्थानावर घा वेळीं मेजवानींत खालेले पदार्थ लागले कीं नाहीं व त्या वेळीं णीकडे गेला होता? हा खर्च वि रकारानें दिला नाहीं व नेटिवांचें म्हणणें कमिटीसमोर तर, अथवा कमिटी हिंदुस्थानांत असतां, त्यांचा खर्च हिंदुस्थान लागला नसतां तो खर्च नेटिव स कुरकुर करणार नाहींत असें वाटतें. परंतु असें होणार कोठून

हें पत्र अकोला एथें
फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा

Registered No. 4—1872

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १३ जुलई सन १८७३ इ० | अंक २८

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### नवीन पुस्तक.

वऱ्हाड प्रांताची भूगोलविद्या.

हें पुस्तक मोडी लिपींत छापून खा लीं सही करणाराकडेस तयार आहे किंमत दोन आणे दर प्रतीस. वीस प्रतीस चार आणे टपाल हशील पडेल ज्या कोणास हें पुस्तक घेणें असेल त्या नीं पैसा पाठऊन दिल्यास त्याजकडेस पुस्तकें लवकर रवाना केलीं जातील. टिकिटें पाठविणें झाल्यास एक रुपया स एक आणा बर्ताळा पाठविला पाहि जे तारिख २२ माहे जून सन १८७३

चिमणाजी राजाराम पाठक

डिपुटी इन्स्पेक्टर शाळाकडील

उमरावती

### विक्रीचीं पुस्तकें

खालीं लिहिलेलीं पुस्तकें आमचे छाप खान्यांत विक्रीस तयार आहेत. हीं पुस्त कें रोख किंमत देणारास मात्र मिळतील बाहेरगांवचे नेणारास डांकहाशील शिवाय पडेल.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| पोथ्या वगैरे. | |
| अध्यात्म रामायण | ४—०—० |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ०—१२—० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा | ०—२—० |
| अनुस्मृती | ०—३—० |
| भीष्मस्तवराज | ०—२—० |
| पंचरत्नी गीता सोवळ्या च बांधणीची | १—४—० |
| गायनप्रकाश | ०—४—० |
| सौभाग्यरत्न | ०—३—० |
| विवेकसिंधू | ०—८—० |
| चतुश्लोकी भागवत | ०—४—० |
| पंचायतन नामावली | ०—३—० |
| शिवसहस्र नामावली | ०—३—० |
| चक्रव्यूह | ०—१—० |
| भूपाळ्या | ०—१—० |
| व्यंकटेशस्तोत्र | ०—२—० |
| धांवे | ०—१—० |
| हरिपाठ | ०—१—० |
| अमृतरावाचे कटाव शुक रंभाचरित्र | ०—४—० |
| नलाख्यान. | ०—३—० |
| आर्या मोरोपंती द्रोणपर्व | २—०—० |
| ,, मंत्र रामायण | १—८—० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला | ०—१२—० |
| सदरहू भाग दुसरा | ०—१२—० |
| विष्णुसहस्र नामावलि | ०—२—० |
| गणपतीचे श्लोक. | ०— |
| भगवद्गीता | |
| श्रीमद्विवेकसिंधु | |
| रजोदर्शन शांति | |
| वाचन संबंधी | |
| बखर निळकंठ राजाची. | |
| लोकहितवादीकृत निबंधसंग्रह | |
| रुक्मिणी हरण नाटक | १ |
| विक्रमोर्वशी नाटक (संस्कृत) | ०— |
| हरिश्चंद्र नाटक. | १— |
| वालिवध नाटक | ०— |
| इंग्रजांची बखर. | ०— |
| वसंतमाला. | १—४ |
| सर्वेपरिज्ञान. | ३—०— |
| वेताळपंचविशी मराठी | ०—८— |
| ध्रुवाख्यान. | ०—१— |
| गोपिचंद राजाचें नाटक हिंदुस्थानी. | ०—१२—० |
| बालज्ञान. | ०—२—० |
| इंग्लिश पहिले बुकाचे भाषांतर | ०—२—० |
| सिंव्हासनबत्तिशी हिंदुस्थानी. | ०—८—६ |
| सुहास्यवदना. | ०—१२—० |
| पहिलेंपुस्तक मराठी. | ०—२—० |
| बालव्याकरण | ०—०—६ |
| अंकलिपी | ०—०—६ |
| तोंडचे हिशेब | ०—२—० |
| कायद्यासंबंधी | |
| नादारीचे रुळ | ०—६—० |
| मुं. इ. मुलकी सर्क्युलर्स | ४—०—० |
| स्मालकाज कोर्टाचा कायदा सन १८६५ चा आक्ट ११ | —४=— |
| सन १८६५ चा आक्ट १ धारा बसविण्याचा | ४ |

### छापखान्याकडील नोकर पाहिजेत.

१. आमचे कारखान्यांत टाइपाचे छापखान्याकरितां एक प्रिंटर म्हणजे हुशार छापणारा पाहिजे. त्यानें कित्येक वर्षे चांगल्या कारखान्यांत काम केलेले असावे, त्याला लहान मोठे पेस उलगडतां व जोडतां येत असावेत, व कागद सुवाच्य छापतां येत असावेत व इतर तत्संबंधीं सर्व माहिती असावी पगार १५ पासून. २५ रुपये पर्यंत लायकी पाहून देऊं.

२. शिळापेसाकरितां एक लेखक पाहिजे. त्याचें अक्षर बाळबोध व मोडी सुंदर, शुद्ध व घटीव असावें. त्यानें कोणत्या एका छापखान्यांत दोन वर्षे तरीं काम केलेलें असावें. व त्यास शिळापेसासंबंधीं सर्व माहिति असावी. पगार १५ रुपये पर्यंत देऊं.

३. शिळापेसाकडील कागद छापणारा पेसम्यान पाहिजे. चांगला कारागीर असेल तर पगार १५ रुपये देऊं.

[illegible] व शिळांच्या अशा [illegible]तगार छापणारा एक [illegible] त्याला आधीं ठेऊं [illegible] रुपये पर्यंत देऊं. [illegible]वक ठेवावयाचा [illegible]णारा कंपाझिटर [illegible] असेल तर [illegible]येपर्यंत पगार

[illegible]गी असेल [illegible]चीं पत्रें [illegible]पमाणें [illegible]पांणीं [illegible]गऊं [illegible]तें

[illegible] या [illegible] गतास।

रा. रा. [illegible]

एडिटरस [illegible]

दिवस आपल्या [illegible] एक वेळ आप[illegible] आपले होते. त्या मुळें हल्लीं पुन्हा च्यार ओळी पाठवि ल्या आहेत तर त्यास येत्या अंकांत जागा देऊन बंदोबस्त करावा अशी आशा बाळगित आहे.

महाराज मी या वऱ्हाड प्रांतीं फिरत असतां जळगाव येथें आलों. तेथिल चमत्कार पाहून इंग्लिश सरकारचे राज्यांतही इतका अंधेर आहे याजबद्दल आश्चर्य वाटलें व वाचकांसही वाटेल यांत संशय नाहीं. महाराज, मी सहजी कांहीं कारणानें येथील कचेरींत गेलों तों वाटेंत सरकारी शाळा (स्कूल) आहे तींत जाऊन बसलों तों मनास आनंद झाला. एकंदरींत शाळेची स्थिति बरी आहे परंतु महाराज, या शाळेस दहा हजार रुपये खर्च लागला व अजूनपावेतों तयार होऊन ४ वर्षेंही झालीं नाहींत तोंच सर्व शाळा बरसातीचा एक थेंबही बाहेर न टाकितां सर्वच आंत घेते. असो.

पुढें कचेरींत गेलों तों तेथेंही हीच रड. असा अंधेर खरोखर मोगलाईंतही नसेल. येथें दिवाणी व मुलकी काम पाहणारा एकच कारकून आहे. तहशिलदार यांस ५० रुपये पर्यंत दिवाणी मोकद्दमे चालविण्याचा अधिकार आहे. तेव्हां गरीब गुरीब लोकांच्या फिर्यादी येतात. परंतु रावबहादूर, लिहिण्यास दुःख वाटतें कीं, त्या फिर्यादी तीन तीन महिने तर रुजू होत नाहींत. त्यांत कित्येकांच्या तर गहाळही होऊन जातात व गरीब लोकांचें नुकसानही होतें गरीब लोक दर रोज कचेरींत खेपा घालून घालून थकून शेवटीं नाद सोडून स्वस्थ बसतात. व झालेला खर्च व रोखा याबर पाणी सोडून देतात. काय करितील बिचारे! आधीच गरीब आंतून कसेंहीकरून कोणा कडून कांहीं रुपये काढून फिर्याद देतात व तिचा असेप्रकारें नकशा झाला. म्हणजे त्या लोकांस किती दुःख होत असेल? तें माझ्यानें लिहिवत नाहीं. आतां या कामांत मुख्य सुस्ती काम करणारे कारकुनांची आहे असे मला वाटतें. कारण कीं फिर्यादी तपासून फैलावर न घेतां व्यर्थ बांधून ठेवितात व वेळेवर तहशिलदार यांणीं "कांहीं मुकद्दमे आहेत काय? म्हणून विचारलें असतां" कांहीं नाहीं." याप्रमाणें सांगतात. हें किती आश्चर्य आहे बरें! याजबद्दल तहशिलदार साहेब अवश्य तजवीज करतील अशी आशा आहे. या दिवाणी कामाकरितां एक मनुष्य पृथक् नेमिल्यास काम सुरळीतपणानें चालेल यांत संशय नाहीं. निदान हें काम [illegible]न्याकडेस तरी सोंपून द्यावें म्हणजे [illegible]हेल. व हल्लीं जें नुकसान होत आहे [illegible] कमी होईल. पत्रविस्तार भयास्त[illegible]र साहेब माफी असावी. कारण [illegible]णखी तिसरे वेळीं आपली भेट [illegible]ल. हाच गुड बाय. तारिख ७ माहे जुलई सन १८७३ इसवी. मुक्काम जळगांव.

आपला वेताळ सेक्रेटरी

पिशाच्च.

### नागपुरास नेटिवानें काढलेला नवीन माग.

( इंदुप्रकाशांतून )

वि. वि. महंमद हुसेन दप्तरी या नावाच्या मनुष्यानें कापड विणण्याचा एक नवीन माग तयार केला आहे. हल्लीं नेटिव मागांवर कोष्टी कापड तयार करितात तें विलायती कापडापेक्षा फार महाग पडतें त्यामुळें देशी कपडा कोणी घेत नाहीं. याकरितां थोड्या श्रमानें व थोड्या वेळांत कापड तयार करण्याची युक्ति निघाली असता देशी कापडाचा खप होऊन कोष्टी व महार लोकांचा रोजगार चालेल. असें मनांत आणून त्यानें हें यंत्र तयार केलें आहे. हें गांवठी मागापेक्षां फार उत्तम आहे. या यंत्रास एक चक्र लाविलें आहे, तें फिरविलें असतां कापड वि

मुंबईतील कांहीं वकील लोक काठेवाडांत वकिलीचें काम करण्याकरितां जाणार आहेत अशी बोलवा आहे.

शके १७९५ मध्यें ज्येष्ठ वद्यांत ८ व ९ आणि आषाढ शुद्धांत ४, ६, ९, व १२ असे एकंदर ६ मुहूर्त लग्नाचे आहेत.

हैदराबाद स्टेट रेलवेचा पन्नास मैल रस्ता पुढच्या महिन्याच्या अखेरीस जाण्या येण्याच्या कामीं चालू होईल असें कळतें.

जुनागडच्या हायस्कुलाच्या हेडमास्तराच्या जागेवर मि० रामचंद्र गोविंद अनगळ यांची नेमणूक झाली असें समजतें.

लखनौ येथील पोलिसमध्यें मि० नसरवानजी म्हणून एक पार्शी गृहस्थ होते. यांनीं चांगल्या कामगिऱ्या बजावल्या यामुळें त्यांस तेथील पोलिस सुपरिंटेंडेंटची जागा मिळाली.

रशियनची खिवावरची स्वारी–ढिस्क व कस्तान्स्कि या दोन टोळ्या ता० २४ एप्रील रोजीं चलाट येथें मिळाल्या. ता० २७ रोजीं खिवान लोकांनीं रशियाच्या पुढच्या टोळीवर चलाट जवळ हल्ला केला. रशियन लोकांचे दोन कर्नल मेले, परंतु खिवन लोकांची सर्व दाणादाण झाली. जनरल कॉफमान यांचा पराभव झाला म्हणून सेंटपिटर्सबर्ग येथें गप्प आहे.

इं. प्र.

## विलायत सरकारचें उत्पन्न

आपल्या हिंदुस्थान देशाची व इंग्रज लोकांच्या देशाची विस्तीर्णपणा व उत्पन्न या संबंधानें तुलना केली ह्मणजे मोठें आश्चर्य वाटतें. आपला देश मोठा व लोकवस्ती ही तशीच अतिशय मोठी असून आपल्या देशाचें उत्पन्न इंग्रज लोकांच्या देशाशीं ताडून पाहिलें ह्मणजे फारच कमी आहे असें दिसून येतें. इंग्रज लोकांचा देश फार लहान आणि लोक वस्तीही फारच कमी असें असतां त्यांचें उत्पन्न आमच्या उत्पन्नाच्या दिढीनें जास्त आहे. यंदाच्या अजमासाप्रमाणें पाहिलें तर आमचें एकंदर सर्व मिळून ४८,७७,१०,००० रु० आणि त्यांचें एकंदर ७३,७६,२०,००० रु० उत्पन्न होईल असें अनुमान आहे. इंग्लंडच्या राज्याच्या पैशाच्या संबंधाचें मुख्य कामगार लो साहेब यांनीं एकंदर उत्पन्नाचा अजमास ७६,६१,७०,००० रु० केला आहे. यांतपैकीं साखरेवरची पट्टी व प्राप्तीवरील कराचा दर कमी करण्याचा विचार केला होता त्या मानानें पाहिलें तर एकंदर उत्पन्न ७३,७६,२०,००० रुपये होते. आतां इंग्लंडचें एवढें मोठें उत्पन्न कोणत्या प्रकारावर होतें हें दाखविण्याकरितां त्याची मुख्य सदरवारी देतों.

कस्टम [येणाऱ्या जाणाऱ्या मालावरची जकात]........२१,०३,३०,०००
एक्सैज (दारूवगैरे देशांतील मालावरची जकात)........१९,७४,७०,०००
स्टांप........१०,०९,००,०००
जमीनीचा सारा व घरपट्टी मिळून रकम........२,३९,००,०००
प्राप्तीवरील कर........७,००,००,०००
पोस्ट हपीस........५,०१,२०,०००
तारायंत्र........१,२२,००,०००
क्रौनलाँडस (सरकारी जमिनी) ३७५००००
किरकोळ जमा........३,८३,००,०००

७६,६१,७०,०००

सदरील दिलेल्या तपशिला वरूनोवरून पतेंत जमिनीचें उत्पन्न घरपट्टी मिळून अगदींच थोडें ह्मणजे सारे दोन कोटी पस्तीस लक्ष आहे. तेव्हां त्या देशाचें मुख्य उत्पन्न जकातीचें आहे. जमिनी सर्व बड्या लोकांस वगैरे देऊन टाकल्या आहेत. अथवा प्रजेच्या ह्मणून समजलेल्या आहेत. आमच्या इकडच्या सारखें सरकार जमिनीचें मालक नाहीं. किरकोळ शेती करणारे तिकडे नाहींत. तेव्हां सर्व मोठें उत्पन्न काय तें जकातीचें आहे. कस्टम बद्दल आमच्या देशाचें उत्पन्न सारे दोन कोटी सत्तावन लक्ष आहे आणि त्याचें एकवीस कोटीवर आहे. याजवरून त्या देशाचा केवढा जबरदस्त व फायद्याचा व्यापार आहे हें स्पष्ट सिद्ध होतें. तसेंच एक्सैज ह्मणजे दारू व दुसरे पदार्थ यांजवरच्या जकाती बद्दल आमच्या इकडचें उत्पन्न २,२३,६०,००० आहे आणि त्यांचें १९,७४,७०,००० रु० आहे. या सर्व एवढ्या जकातीचें ओझें सोसण्याचें सामर्थ्य इंग्लंड देशास अगर लोकांस आहे याजवरून त्यांचा व्यापार व त्यांचा श्रीमानपणा हीं चांगलीं दिसून येतात. आतां त्या देशाच्या उत्पन्ना प्रमाणें खर्चही मोठा आहे. या सालचा एकंदर चालू खर्च ७१,८८,१०,००० रु० होईल असें अनुमान आहे. या शिवाय येत्या अकटोबर महिन्यांत इंग्रज सरकारास आलाबामा आगबोटीच्या तंट्याबद्दल अमेरिकन सरकारास ३,२०,००,००० रु० दंड देणें आहेत त्याज पैकीं निमे यंदाच्या उत्पन्नातून देऊन बांकी निमे कर्ज काढून देणार असें आहे. बाकीचें उत्पन्न साखर व प्राप्तीवरील कर यांचा दर कमी करण्याकडे लागणार ह्मणजे तितका वसूल मुळींच कमी होईल.

ने. ओ.

## इंडियन फिनान्स कमीटीचा रिपोर्ट.

हिंदुस्थानच्या उत्पन्न खर्चाच्या स्थितीविषयीं चौकशी करण्या करितां पार्लमेंट सभेनें नेमलेल्या कमीटीनें पार्लमेंट सभेस तारीख ९ माहे मे सन १८७३ रोजीं केलेल्या रिपोर्टाचा सारांश वाचकांस कळविला पाहिजे. आजपर्यंत कमीटी समोर बहुतकरून सरकारी नोकरांच्याच साक्षी झाल्या आहेत. असें जरी आहे तथापि हिंदुस्थानच्या राज्य संबंधी व उत्पन्न खर्चाविषयीं कित्येक चमत्कारिक गोष्टी बाहेर पडल्या आहेत. थोड्या दिवसां पूर्वींच्या टाइम्स आफ इंडियांत लंडनाहून आलेलें पत्र छापलें आहे त्यांत असें लिहिलें आहे कीं, इंडिया आफिसांत जाऊन तेथें तयारी करून मग कित्येक साक्षीदारांनीं कमीटीसमोर साक्षी दिल्या. साक्षीदारास प्रश्न कोणचे करावयाचे व त्यानें उत्तरें काय द्यावयाचीं हें अगोदर ठरविल्याचें कमीटीसमोर एक उदाहरण घडल्याचें वाचकांस आह्मी पूर्वीं कळविलें आहे. यामुळें व दुसऱ्या कित्येक गोष्टीवरून, आज पर्यंत कमीटीस मिळालेली माहिती सर्वांशी विश्वासनीय नाहीं असें कित्येकांचें मत झालें आहे. असा प्रकार आहे तेव्हां कमीटीचें हिंदुस्थानांत येणें होऊन या देशांत चौकशी झाली असती ह्मणजे बरें होतें. परंतु तसें आतां होईल असें दिसत नाहीं. नेटिवांच्या कमीटीसमोर साक्षी घेण्याविषयीं कमिटीनें पार्लमेंट सभेस केलेल्या आपल्या रपोटांत एणप्रमाणें लिहिलें आहे:–

आजपर्यंत कमीटीसमोर सरकारी नोकरांच्याच साक्षी झाल्या आहेत परंतु कमीटीसमोर योग्य नेटिवाच्या साक्षी झाल्या असतां फार चांगलें होईल व त्यांच्या साक्षी घेण्यास कमीटी तयार आहे. आज पर्यंत कमीटीसमोर नेटिव साक्षीदार आले नाहींत. परंतु चालू सेशनाच्या आरंभीं ईस्टइंडिया असोसिएशनचे सेक्रेटरी यांजकडून असें लिहून आलें कीं, मुंबई असोसिएशन व पुणें सार्वजनिकसभा आपल्या तर्फे नेटिव साक्षीदार पाठविण्यास तयार आहेत. यावरून व दुसऱ्या कित्येक गोष्टीवरून कमीटीच्या नजरेस असें आलें कीं, नेटिवाच्या साक्षी घेण्याची कमीटीची इच्छा आहे असें कदाचित नेटिवांस माहित नसेल. व साक्ष देण्यास्तव येण्याकरितां नेटिवांच्या मार्गांत काय अडचणी आहेत हें कमीटीस समजत नतेल या गोष्टीविषयीं संशय राहू नये व कमीटी नेटिवाच्या साक्षी घेण्यास इच्छित आहे असें, हिंदुस्थानांत हिंदुस्थान सरकारानें जाहीर करावें अशी तजवीज करविण्याच्या इच्छेनें कमीटीनें सेक्रेटरी आव स्टेट यांस मात्र लिहलें. याप्रमाणें तजवीज करण्यास्तव आह्मी हिंदुस्थान सरकारास कमीटीच्या सूचनेंप्रमाणें पत्र लिहिणार आहेत असें सेक्रेटरी आफ स्टेट यांचें उत्तर आलें. सेक्रेटरी आफ स्टेट यांणीं या बाबतींत आपलें असें मत कळविलें कीं, नेटिवांचा येण्या जाण्याचा खर्च दिल्या खेरीज साक्ष देण्याकरितां नेटिव लोक यावयाचे नाहींत सेक्रेटरी आव स्टेट यांच्या सदरहू पत्राचा हिंदुस्थान सरकाराकडून तारायंत्र द्वारें तारीख १८ माहे एप्रिल रोजीं असा जबाब आला कीं, नेटिवांच्या साक्षी घेण्याकरितां कमिटी तयार आहे असें प्रसिद्ध करूं नयें, व असें केलें तरी, विलायतेस साक्ष देण्याकरितां जाणाऱ्या नेटिवांस खर्च दिल्याखेरीज कोणी जावयाचे नाहीं. या करितां कमिटीनें प्रश्न पाठवावेत. हिंदुस्थानांत प्रश्न पाठवून माहिती मिळविणें बरोबर नाहीं असें कमिटीस वाटेल, व खर्च देण्याविषयीं हिंदुस्थान सरकारानें केलेल्या सूचनेविषयीं असा ठराव केला कीं, जे साक्षीदार कमिटी पसंत करील त्यांचा खर्च विलायत सरकारानें द्यावा.

खर्चाची एकंदर रकम एका लक्षा पेक्षा
जास्त होऊ नये. हा ठराव कमिटीनें वि
लायतचे खजिनदार यांजकडे पाठविला
परंतु ही गोष्ट खजिनदारानें कबूल केली
नाहीं. खजिनदार यांनीं असें लिहून पा
ठविलें की, हा खर्च विलायत सरकारा
वर घालणें वाजवी नाहीं. या सर्व गोष्टींचा
विचार करितां कमिटीचें मत असें आहे
कीं, नेटिवांच्या साक्षी घेणें महत्वाचें आ
हे म्हणून, ते साक्ष देण्यास्तव येण्याच्या मार्गां
त ज्या अडचणी असतील त्या दूर
केल्या पाहिजेत. या गोष्टीचा विचार करण्या
व्याविषयीं कमीटी (पार्लमेंट) स
सुचवीत आहे.

येणेंप्रमाणें कमिटीच्या रपोटाचें ता
त्पर्य आहे. आतां या गोष्टीचा पार्लमेंट सभा
विचार करून काय ठराव करणार
असेल तो असो. परंतु या कामीं क
मिटीच्या सूचनेप्रमाणें एक लक्ष रुपये खर्च
करण्याचा पार्लमेंट सभेनें जरी ठराव के
ला तथापि त्या पासून कमिटीचा हेतु
सिद्धीस जाईल असें आह्मास वाटत नाहीं.
एक लक्ष रुपयांत फार तर दहा वी
स नेटिव विलायतेस जाऊ शकतील.
अगोदर खर्च देऊन ही विलायतेस जा
णारे व साक्ष देण्यास योग्य असे
नेटिव विलायतेस जाण्यास तयार होतील
याचा मोठाच संशय आहे. कमिटी
चे सभासद जरी हिंदुस्थानांत आले असते
ते तरी बरें होतें. परंतु तसें ब
नाहीं. खर्च देऊन नेटिव साक्षीदार
न्याची तजवीज अगदीं फुकट
आहे हें उघडच दिसत आहे.
हिंदुस्थान सरकारच्या सूचनेंप्रमाणें कमि
टीनें प्रश्न जरी पाठविले असते
होते. परंतु ही गोष्ट कमिटीच्या मनांत
येत नाहीं. सारांश कमिटीसमोर
नच्या लोकांचें ह्मणणें जाण्याचा मार्ग
दिसत नाहीं ही दुःखाची गोष्ट
परंतु हा मजकूर संपविण्यापूर्वीं
नें एका गोष्टीविषयीं लिहिल्या
हवत नाहीं. ती अशी. हिंदुस्थानांतून वि
लायतेस जाणाऱ्या नेटिवांच्या खर्चा
करितां एक लक्ष रुपयांचा
त सरकारावर घालणें रास्त
विलायत सरकारच्या जामदारखान्याच्या
प्रधानानें सांगितलें हें पाहून
वाटतें! आह्मी सदरहू प्रधा
नास विचारतों कीं, तुर्कस्थानचे वकील विला
यतेस गेले होते त्या वक्तीं त
त सरकारानें मेजवानी करून
एक लक्ष रुपये हिंदुस्थानाच्या
वेळीं मेजवानींत खर्च
लागले कीं नाहीं व त्या वेळीं
णीकडे गेला होता? हा
रकारानें दिला नाहीं व
नेटिवांचें ह्मणणें कमिटीसमोर
तर, अथवा कमिटी हिंदुस्थानांत
असतां, त्याचा खर्च हिं
लागला तरी तो खर्च नेटिवांस
स कुरकुर करणार नाहींत
वाटतें. परंतु असें होणार

हें पत्र अकोला एथें
फडके यांचे वऱ्हाडसमाचार